सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित



## इंधन दर वाढीविरोधात काँग्रेसचे नागपुरात आंदोलन

नागपूर : पेट्रोल, डिझेल आणि सीएनजीच्या वाढत्या दरांविरोधात काँग्रेस पक्षाने शुक्रवारी नागपुरात आक्रमक आंदोलन करत राज्य आणि केंद्र सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

संविधान चौकातून सुरू झालेल्या या आंदोलनात काँग्रेसचे शेकडो कार्यकर्ते सहभागी झाले होते. काही कार्यकर्त्यांनी हातात दुचाकी तसेच वाहनांच्या पेट्रोल टाक्या उचलून आंदोलनात सहभाग नोंदवत सरकारच्या धोरणांविरोधात निषेध व्यक्त केला.

## विषारी दारु प्रकरण; देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडवर


पुणे : पुणे आणि पिंपरी चिंचवडमधे विषारु दारु प्यायल्याने आत्तापर्यंत ११ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे, तर अनेकांची प्रकती गंभीर आहे. पिंपरी-चिंचवडमधील दापोडी आणि फुगेवाडी भागात मिळून सहा जणांचा मृत्यू झाला आहे. तर पुण्यातील काळेपडळ भागात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. ही विषारी स्पिरिटयुक्त दारु योगेश वानखेडे याने बनवली होती. ती दारु पुणे आणि पिंपरी चिंचवडच्या वेगवेगळ्या भागांमधे मिळून विकली गेली. दापोडी, फुगेवाडी, हडपसर, काळेपडळ भागातील ज्यांनी दारु प्यायली ते तोंडाला फेस येऊन मृत्युमुखी पडले. या सर्व घटनेवर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ॲक्शन मोडवर आले आहेत. त्यांनी या घटनेबाबत मोठी माहिती दिली आहे.

# ‘तारीख पे तारीख’ला लागणार पूर्णविराम!

## हायकोर्टांना सुप्रीम कोर्टाची कडक डेडलाइन; राखीव निकाल ३ महिन्यांत देणे बंधनकारक

वृत्तसंस्था

नवी दिल्ली :देशातील न्यायालयांमध्ये प्रलंबित खटले आणि निकाल देण्यास होणारा विलंब यावर सुप्रीम कोर्टाने मोठे पाऊल उचलले आहे. न्यायप्रक्रियेला गती देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने महत्त्वपूर्ण आणि बंधनकारक मार्गदर्शक सूचना जारी करत हायकोर्टांना राखीव ठेवलेले निकाल जास्तीत जास्त तीन महिन्यांच्या आत देणे अनिवार्य केले आहे.मुख्य न्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने दिलेल्या आदेशात जामीन प्रकरणांमध्ये शक्यतो दुसऱ्याच दिवशी निकाल देण्याचे निर्देश दिले आहेत.




तसेच जामीन मंजूर झाल्यानंतर संबंधित आदेश तातडीने जेल प्रशासनाला कळवणेही बंधनकारक करण्यात आले आहे. सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले की, न्यायालयात निकालाचा केवळ मुख्य भाग तत्काळ जाहीर केला जाईल, मात्र त्यामागील सविस्तर कारणे सात दिवसांच्या आत न्यायालयाच्या संकेतस्थळावर अपलोड करणे आवश्यक असेल. जर ३० दिवसांच्या आत कारणे अपलोड झाली नाहीत, तर संबंधित प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे वर्ग करण्याचा पर्याय खुला राहील.तसेच, एखादा निकाल राखून ठेवण्यात आल्याची तारीख हायकोर्टाच्या वेबसाइटवर स्पष्टपणे दर्शवणे अनिवार्य करण्यात आले आहे.

जर तीन महिन्यांच्या कालावधीत निकाल दिला गेला नाही, तर रजिस्ट्रार जनरल हे प्रकरण मुख्य न्यायाधीशांसमोर मांडतील. त्यानंतर हायकोर्टाचे मुख्य न्यायाधीश आणखी दोन आठवड्यांची मुदत देऊ शकतील. तरीही आदेशाचे पालन न झाल्यास प्रकरण दुसऱ्या खंडपीठाकडे सोपवले जाऊ शकते.सुप्रीम कोर्टाच्या या आदेशामुळे न्यायप्रक्रियेला वेग मिळण्याची आणि नागरिकांना वेळेत न्याय मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## काँग्रेस ८, उबाठा ६, शरद पवार गट ३ जागा लढवणार

### लवकरच उमेदवार जाहीर करणार

तभा वृत्तसेवा

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांमधून विधानपरिषदेवर निवडून द्यायच्या रिक्त जागांसाठी महाविकास आघाडीचा (मविआ) जागावाटपाचा फॉर्म्युला अखेर निश्र्चित झाला आहे. महाविकास आघाडीच्या प्रमुख नेत्यांच्या बैठकीनंतर झालेल्या या तडजोडीत काँग्रेसला सर्वाधिक ८ जागा मिळाल्या असून, उबाठा ६ आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गट ३ जागांवर निवडणूक लढवणार आहे.

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी या जागावाटपाची अधिकृत माहिती दिली असून, मविआ सर्व १७ जागांवर पूर्ण ताकदीने लढणार असून लवकरच उमेदवारांची घोषणा केली जाईल, असे त्यांनी सांगितले.येत्या १ जून रोजी उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस असल्याने मविआच्या गोटात हालचालींना वेग आला आहे. चंद्रशेखर बावनकुळे विधानसभेत विजयी झाल्याने त्यांनी नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचा राजीनामा दिला होता, त्यामुळे जाहीर झालेल्या नागपूरच्या पोटनिवडणुकीसह एकूण ८ जागांवर काँग्रेस आपले नशीब आजमावणार आहे.

## जनतेच्या आरोग्याशी खेळणाऱ्यांची खैर नाही! तुकाराम मुंढेंचा धडाका!

### ३ दिवसांत ३३ अटक, राज्यभरात २७ आस्थापनांना FDAचे टाळे

तभा वृत्तसेवा

मुंबई : राज्याच्या अन्न व औषध प्रशासन विभागाचा पदभार स्वीकारताच आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे. पदभार स्वीकारल्यानंतर सोमवारीच त्यांनी राज्यभर विशेष तपासणी मोहीम राबवण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अवघ्या तीन दिवसांत अन्न व औषध प्रशासनाने राज्यभर धडक कारवाया करत ३३ आरोपींना अटक केली असून २७ आस्थापनांना सील ठोकण्यात आले आहे. २५ ते २८ मेदरम्यान राबवण्यात आलेल्या या मोहिमेत भेसळखोर, प्रतिबंधित गुटखा विक्रेते आणि नियमभंग करणाऱ्या आस्थापनांवर मोठ्या प्रमाणावर छापेमारी करण्यात आली.




बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर विभागांत कारवाया करण्यात आल्या.राज्यातील ५३ आस्थापनांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३४ ठिकाणी नियमभंग आढळून आला. याप्रकरणी २५ एफआयआर दाखल करण्यात आले आहेत. पाच वाहने जप्त करण्यात आली असून सुमारे २०.५७ लाख रुपयांचा मुद्देमालही हस्तगत करण्यात आला आहे. बृहन्मुंबई विभागात सर्वाधिक कारवाई झाली. येथे १९ आस्थापना सील करण्यात आली असून १९ जणांना अटक करण्यात आली आहे. जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्यांना कोणतीही माफी दिली जाणार नाही. भेसळ, प्रतिबंधित पदार्थांची विक्री आणि असुरक्षित अन्न उत्पादनाविरोधातील कारवाई अधिक कठोर आणि सातत्यपूर्ण असेल, असा इशारा आयुक्त तुकाराम मुंढे यांनी दिला.

## ‘कॉकरोच जनता पार्टी’ला दिल्ली उच्च न्यायालयाचा दणका

### सोशल मीडिया खाते पूर्ववत करण्याबाबत दिला मोठा निर्णय

वृत्तसंस्था

नवी दिल्ली : अभिजीत दीपके यांच्या नेतृत्वाखालील ‘कॉकरोच जनता पार्टी’ला दिल्ली उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. पक्षाचे सोशल मीडिया खाते तात्काळ पूर्ववत करण्याची मागणी न्यायालयाने फेटाळून लावली असून, या प्रकरणात केंद्र सरकार आणि संबंधित पक्षांचे म्हणणे ऐकल्यानंतरच पुढील निर्णय घेतला जाईल, असे स्पष्ट करण्यात आले आहे.





शुक्रवारी २९ मे रोजी न्यायमूर्ती पुरुषेंद्र कुमार कौर यांच्या खंडपीठासमोर या याचिकेवर सुनावणी झाली. यावेळी न्यायालयाने सीजेपीच्या सोशल मीडिया खात्यांवर करण्यात आलेल्या काही पोस्ट आणि लिखाणावर आक्षेप नोंदवला. खात्यांवरील मजकूर संवेदनशील आणि वादग्रस्त स्वरूपाचा असल्याचे निरीक्षण नोंदवत न्यायालयाने तातडीने कोणताही दिलासा देण्यास नकार दिला.

दरम्यान, अभिजीत दीपके यांनी दाखल केलेल्या याचिकेवर न्यायालयाने केंद्र सरकारला नोटीस बजावली आहे. केंद्र सरकारने राष्ट्रीय सुरक्षेचा हवाला देत ‘कॉकरोच जनता पार्टी’च्या ‘एक्स’ (पूर्वीचे ट्विटर) खात्यावर भारतात बंदी घातली होती. याच आदेशाला आव्हान देत दीपके यांनी दिल्ली उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

विशेष म्हणजे, पक्षाचे मूळ ‘एक्स’ हँडल २१ मे रोजी भारतात ब्लॉक करण्यात आले होते. त्यानंतर "COCKROACH IS BACK' या नावाने नवीन सोशल मीडिया हँडल सुरू करण्यात आले असून, त्याला अल्पावधीतच २.२७ लाखांहून अधिक फॉलोअर्स मिळाल्याची माहिती समोर आली आहे.




DAIKIN
WORLD'S LEADING AIR CONDITIONING COMPANY FROM JAPAN



सुपीरियर कूलिंग फॉर
केयरफ्रीसमर्स




55 डिग्रीमध्येही कूलिंग, 22M लांब एअर थ्रो,
आणि पॉवर चिल ऑपरेशन - जे तुम्हाला तीव्र उष्णतेपासून आराम देते.

#1 MOST TRUSTED Air Conditioners BRAND IN INDIA
TRA'S BRAND TRUST REPORT 2026 — Power of Trust

Daikin - द एअर स्पेशलिस्ट

5 YEARS# COMPREHENSIVE WARRANTY | Green Exchange Offer* UPTO ₹6000* | STANDARD INSTALLATION OFFER* | 5% CASHBACK* | EASY EMI | EXCLUSIVE BANK OFFERS AVAILABLE. Check offer with Daikin Authorized channel partner before purchase.

आता तुमच्या जवळच्या अधिकृत डायकिन डीलरशिपला भेट द्या

DAIKIN AIRCONDITIONING INDIA PVT. LTD.
BRANCH OFFICE: Office No. D-4/5, 4th Floor, Prozone Trade Centre, Near Prozone Mall, Chikalthana MIDC, Chhatrapati Sambhaji Nagar - 43100. Tel: 9156222645.
For service related queries: WhatsApp "Hi" at 987 140 9300, Call our Customer Contact Centre at 011-4031-9300/1860-180-3900, or write to us at customerservice@daikinindia.com.
Follow us on: www.facebook.com/daikinindia www.twitter.com/daikinindia www.instagram.com/daikinindia in.company/daikin-airconditioning-india-pvt.-ltd. www.youtube.com/user/DaikinACIndia
Daikin adheres to E-waste Rules notified by MoEF. For more information on E-waste disposal and exchange policy please contact our Customer Service Centre.
Product image is for representation only. The above features mentioned may vary in different AC Models. #~Check www.daikinindia.com/terms-conditions for further T&C. *Figure mentioned is for FTKF35.
Source: TRA Research - Brand Trust Report 2026, based on syndicated consumer research across 16 cities in india.

# गतीमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणालीसह आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा -अप्पर मुख्य सचिव विकास खारगे

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

महसूल विभाग हा समाजासाठी काम करणारा महत्त्वाचा घटक असल्याने अधिकारी-कर्मचाऱ्यांनी आपली जबाबदारी ओळखुन काम करत, गतिमान प्रशासनासाठी ई-ऑफिस प्रणाली आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करावा असे आवाहन महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी केले.

येथील जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित महसुल विभागाच्या आढावा बैठकीत श्री. खारगे बोलत होते. यावेळी बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जिल्हा पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी मनिषा देशपांडे, सुकेशिनी पगारे, सह जिल्हा निबंधक रामेश्वर रोडगे, जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख एम. पी. मगर, तहसिलदार छाया पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे पुढे म्हणाले की, नागरीकांना पारदर्शकपणे सेवा देण्यासाठी तसेच शासकीय कामकाजात गती आणुन कामाकाजातील प्रलंबितता कमी करण्यासाठी सर्व महसुल यंत्रणांनी ई-ऑफिस प्रणालीचा वापर करणे आवश्यक आहे. शासनाने ईज ऑफ डुइंग बिझनेसचे धोरण स्विकारले आहे. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून एक दिवस क्षेत्रीय दौरा करावा. यामुळे नागरिकांचे प्रश्न समजावून घेण्यास मदत होते. तसेच त्यांनी दिलेल्या निवेदनांवर सकारात्मक कारवाई करावी. तसेच विविध विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करुन, गुणवत्ता जाणून घेण्यास मदत होते. प्रशासनाने नागरिकामध्ये जावून काम करण्याचा प्रयत्न करावा.



नागरिकांच्या समस्या, तक्रारींचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था निर्माण करुन त्यांच्या तक्रारींचा पाठपुरावा घ्यावा. कोणताही पाणंद रस्ता घेण्यापूर्वी तो अतिक्रमणमुक्त असावा, तसेच भूमी अभिलेख कार्यालयाकडून त्याचे सीमांकन करुन घ्यावे. पाणंद रस्त्यांच्या दर्जेदार कामांवर लक्ष ठेवण्याचे आणि पावसाळ्यापूर्वी जास्तीत-जास्त रस्ते पूर्ण करण्याचे नियोजन करावे. तसेच शासकीय जमिनी अतिक्रमण विरहित कशा राहतील तसेच त्यांचे व्यवस्थापन कसे करता येईल याचे नियोजन करावे. शासकीय आणि खाजगी जागेची जबाबदारी महसुल विभागाकडे आहे. याकरीता सर्व सातबारा आणि मिळकत पत्रिका व्यवस्थित सुरक्षित ठेवाव्यात. तसेच नागरिकांना अनावश्यक त्रास होऊ नये, यासाठी सर्व अर्जांची वेळेत व पारदर्शक पद्धतीने पूर्तता करण्याचे आवाहन केले.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे यांनी त्यांनी जनगणना, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियान, शासकीय जमिनी वाटप व शर्तभंग प्रकरणे,पर्यायी वनीकरण,वन जमिनीचे ७/१२ अद्ययावत करणे, सिलिंग जमिन प्रकरणे, शेत व पाणंद रस्ते योजना, ई-पीक पाहणी, फेरफार नोंदी, वनहक्क दावे, अवैध गौण खनिज, घरकुलांना वाळू उपलब्ध करुन देणे आदी विषयांसह महसूल विषयक इतर कामांचाही आढावा घेतला. तसेच महसूल विभागातील प्रलंबित कामे, नागरिकांना दिल्या जाणाऱ्या सेवा तसेच प्रशासकीय कामकाज अधिक कार्यक्षम करण्याच्या सूचना दिल्या.

निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांनी सादरीकरणांद्वारे महसुल विभागातील विविध विषयांचा सविस्तर माहिती सादर केली. यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, तहसिलदार, उपअधिक्षक भूमि अभिलेख, सह दूय्यम निबंधक यांची ऑनलाईन उपस्थिती होती.

# पोस्टाद्वारे ऑनलाइन तलवार मागवणाऱ्या युवकास अटक; एक तलवार जप्त



**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

अवैधपणे शस्त्र बाळगून दहशत माजविणाऱ्या प्रवृत्तींविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत जालना पोलिसांच्या दहशतवाद विरोधी पथकाने एक महत्त्वपूर्ण कारवाई करत ऑनलाइन पद्धतीने तलवार मागविणाऱ्या युवकास अटक केली असून त्याच्याकडून एक तलवार जप्त करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू व अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी यांच्या सूचनेनुसार अवैध शस्त्रधारकांविरुद्ध विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने दहशतवाद विरोधी पथकाचे सपोनि. सचिन इंगवाड यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, शिवाजी पुलाजवळील पोस्ट ऑफिसमध्ये एक इसम ऑनलाइन पद्धतीने मागविलेली तलवार घेण्यासाठी येणार आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे पथकाने सापळा रचला. यावेळी पोस्ट ऑफिस परिसरात संशयित व्यक्ती तलवार ताब्यात घेत असताना त्यास पकडण्यात आले. चौकशीअंती त्याची ओळख सिद्धेश्वर एकनाथ राठोड (वय २४ वर्षे, रा. म्हाडा कॉलनी, आशा हॉस्पिटलच्या पाठीमागे, शिवाजीनगर, भोकरदन नाका, जालना) अशी पटली. पोलिसांनी आरोपीच्या ताब्यातून सुमारे ३ हजार ५०० रुपये किमतीची एक तलवार जप्त केली. या प्रकरणी भारतीय हत्यार कायद्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीस पुढील कायदेशीर कारवाईसाठी सदर बाजार पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली दहशतवाद विरोधी पथकाचे सपोनि. सचिन इंगवाड, पोउपनि. शिवकर, पोहेकॉ. गडधे, पोहेकॉ. सोनवणे आदींनी यशस्वीरीत्या पार पाडली. या कारवाईमुळे अवैध शस्त्र बाळगणाऱ्या व कायदा-सुव्यवस्थेला धोका निर्माण करणाऱ्या प्रवृत्तींना पोलिसांनी कडक इशारा दिला आहे.

## संक्षिप्त



### चार महिन्यांपूर्वी अल्पवयीन मुलीस पळवून नेणारा आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील खडावगाव येथून चार महिन्यांपूर्वी फूस लावून पळवून नेण्यात आलेल्या अल्पवयीन मुलीचा शोध घेत स्थानिक गुन्हे शाखेने आरोपीसह तिला सुरक्षित ताब्यात घेत मोठी यशस्वी कारवाई केली आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, खडावगाव (ता. बदनापूर, जि. जालना) येथील ३१ वर्षीय महिलेने ५ फेब्रुवारी २०२६ रोजी चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यांच्या अल्पवयीन मुलीस दीपक राजू जाधव (वय २५, रा. माळखेडा, ता. जि. जालना) याने अज्ञात कारणासाठी फूस लावून पळवून नेल्याची तक्रार देण्यात आली होती. त्यानुसार गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्ह्याचा तपास चंदनझिरा पोलीस ठाणे तसेच अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडून सुरू होता. मात्र पीडित मुलगी व आरोपी यांचा शोध लागत नसल्याने पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांनी २१ मे २०२६ रोजी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग केला. यानंतर पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव व त्यांच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण व गोपनीय माहितीच्या आधारे शोधमोहीम सुरू केली. तपासादरम्यान पीडित मुलगी व आरोपी हे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील गंगापूर तालुक्यातील राजणगाव-वालूज परिसरात असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तेथे सापळा रचून आरोपी दीपक जाधव व पीडित मुलीचा शोध घेत त्यांना माळुंजनगर, कमळपूर, राजणगाव (ता. गंगापूर) येथून ताब्यात घेतले. त्यानंतर पीडित मुलीची ओळख पटवून दोघांनाही पुढील तपासासाठी चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले. या प्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम १३७(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक तेघबीर सिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव, सपोनि. सचिन खामगळ, पोउपनि. राजेंद्र वाघ यांच्यासह पोलीस अंमलदार रमेश राठोड, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, प्रशांत लोखंडे, रेणुका बांडे, सोरभ मुळे तसेच सायबर पोलीस ठाणे जालना येथील पोलीस अंमलदार संदीप मांटे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

### समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद येथे जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्ताने शपथ

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग - जिल्हा समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परिषद नशाबंदी मंडळ महाराष्ट्र राज्य, सहारा सामाजिक विकास संस्था, तेजस जनविकास संस्था, यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक तंबाखु विरोधी दिनानिमित्ताने जिल्हा परिषद येथील यशवंतराव चव्हाण सभागृहात अधिकारी, कर्मचारी यांना तंबाखु मुक्तीची शपथ देण्यात आली यावेळी- नशा मुक्त भारत अभियांनाची या कार्यक्रमात नशाबंदी मंडळाच्या वतीने पोस्टर प्रदर्शने करण्यात आले. जिल्हा संघटक तथा सहारा संस्थेचे अध्यक्ष बिस्मिल्ला सय्यद यांनी तंबाखू विरोधी दिनाचे महत्त्व अधोरेखित करुन तंबाखूचे दुष्परिणाम व व्यसनामुळे होणाऱ्या गंभीर आजार विषयी माहिती दिली. यावेळी जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने हजर होते. या कार्यक्रमाचे संचलन तेजस जनविकास संस्थेचे अध्यक्ष शिवाजी तायडे यांनी केले तर आभार समाजकल्याणचे राम मांटे यांनी व्यक्त केले. समाज कल्याण विभागाचे सर्व कर्मचारी यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

# नितीन जेथलियांचे होणार राजकीय पूर्णवसन!

**तभा वृत्तसेवा**
**परतुर । प्रतिनिधी**



परतुर विधानसभा मतदार संघातील माजी आमदार स्वर्गीय सुरेशकुमार जेथलिया यांच्या आकसमात मृत्य नंतर युवा नेते नितीन जेथलिया यांनी राजकारणात सक्रिय व्हावे अशी मागणी मतदार संघातील सर्व सामान्य नागरिकांतून व्यक्त केली जात आहे . माजी आमदार स्वर्गीय सुरेश कुमार जेथलिया यांचे राजकीय वर्तुळात मोठा दबदबा निर्माण होता . विरोधी पक्षांसह सत्ताधारी पक्षातील नेते मंडळीसह त्यांचे जवळीक संबंध होते . माजी आमदार स्वर्गीय सुरेशकुमार जेथलिया यांनी परतुर - मंठा विधानसभा मतदार संघात नेहमी आपल्या चर्चेतुन मतदार संघाचा विकास आणि परतुर शहरातील विविध योजना राबवत त्यांनी त्यांच्या कार्यकाळात केलेल्या विकासाच्या नावाखाली पाऊलावर पाऊल टाकत परतुर - मंठा मतदार संघाच्या विकासाच्या दृष्टीने युवा नेते नितिन जेथलिया यांनी राजकारणात माजी आमदार स्वर्गीय सुरेश कुमार जेथलिया यांच्या निधनानंतर राजकारणात सक्रिय व्हावे यासाठी मतदार संघातील सर्व स्तरातील जणसामान्य माणसांच्या मनातील भावनांसह राजकीय वर्तुळात चर्चा व्यक्त होत आहेत .

# जालना मनपाच्या ढासळलेल्या कारभाराविरोधात शिवसेनेचे निवेदन मूलभूत सुविधांबाबत तातडीने आढावा बैठक घेण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेचा कारभार पूर्णपणे ढासळला असून नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचा आरोप करत शिवसेना पक्षाचे महानगरपालिका विरोधी पक्षनेते कमलेश खरे यांनी मनपा आयुक्तांना निवेदन सादर केले आहे. तसेच शहरातील विविध समस्यांबाबत तातडीने नियोजन व आढावा बैठक घेण्याची मागणी करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, सत्ताधारी भाजपमधील अंतर्गत गटबाजी, प्रशासनातील समन्वयाचा अभाव आणि नियोजनशून्य कारभारामुळे शहरातील अनेक प्रश्न गंभीर बनले आहेत. शहरातील अनेक भागांमध्ये पाणीपुरवठा अनियमित असून नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठा त्रास सहन करावा लागत आहे. तसेच विद्युत सुविधांमध्ये सातत्य नसल्याने दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. याशिवाय शहरातील मुख्य रस्ते आणि गल्लीबोळांमध्ये कचऱ्याचे ढीग साचल्याने स्वच्छतेचा प्रश्न गंभीर बनला आहे.



विविध विकासकामांमध्ये भ्रष्टाचार वाढल्याची भावना नागरिकांमध्ये असून अनेक कामे केवळ कागदोपत्री दाखवून बोगस नोंदी केल्या जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. जनतेच्या कराच्या पैशावर चालणारी महानगरपालिका नागरिकांच्या मूलभूत प्रश्नांकडे दुर्लक्ष करत असल्याचे दुर्दैवी चित्र निर्माण झाल्याचे खरे यांनी म्हटले आहे. त्यामुळे प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून नियोजनबद्ध पद्धतीने कारभार सुरळीत करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर हे लवकरच मनपा आयुक्त आणि सर्व विभागप्रमुखांसोबत स्वतंत्र नियोजन व आढावा बैठक घेणार असल्याची माहितीही निवेदनातून देण्यात आली आहे. या बैठकीत नागरिकांच्या मूलभूत सुविधांबाबत आवश्यक सूचना व आदेश दिले जाणार असल्याचे नमूद करण्यात आले आहे. शिवसेनेची भूमिका स्पष्ट असून राजकारणापेक्षा शहराचा विकास आणि नागरिकांच्या सुविधा यांना प्राधान्य दिले पाहिजे, असे निवेदनात म्हटले आहे. प्रशासनाने वेळेत कारभार सुधारला नाही तर जनतेच्या प्रश्नांसाठी शिव-सेना रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडेल, असा इशाराही कमलेश खरे यांनी दिला आहे.

# अटकेवर न्यायालयाचा सवाल; जाफराबाद पोलिसांना फटकार

**तभा वृत्तसेवा**
**जाफराबाद । प्रतिनिधी**

जाफराबाद पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्र. ५६/२०२६ प्रकरणात न्यायालयाने पोलिसांच्या कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित करत आरोपी प्रविण सुभाष पिंपळे याला तात्काळ जामीन मंजूर केला. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशांचे पालन का करण्यात आले नाही, याबाबत तपास अधिकाऱ्याकडून तीन दिवसांत स्पष्टीकरण मागविण्याचे आदेश न्यायालयाने दिले आहेत.

या प्रकरणात आरोपीला जाफराबाद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक. आर. डी. पठाडे यांनी न्यायालयासमोर हजर केले होते. आरोपीतर्फे ॲड. मनीष राऊत यांनी बाजू मांडली. सरकारी वकील व तपास अधिकाऱ्यांनी बनावट शिक्के आणि सील शोधून जप्त करण्यासाठी आरोपीचा दोन दिवसांचा पोलीस कोठडी रिमांड देण्याची मागणी केली होती. मात्र बचाव पक्षाने आरोपीला वीस मे रोजी मध्यरात्री अटक करण्यात आली असून ती अटक बेकायदेशीर असल्याचा दावा केला. न्यायालयाने रिमांड अहवाल, केस डायरी आणि तपास अधिकाऱ्याने सादर केलेली बीन्स कलम ३५(३) अंतर्गत नोटीस तपासली असता गंभीर विसंगती आढळून आली. न्यायालयाने नमूद केले की, आरोपीला वीस मे

## बनावट शिक्का प्रकरणात आरोपीला तात्काळ जामीन तपास; अधिकाऱ्याकडून तीन दिवसांत स्पष्टीकरण मागवले

रोजी सकाळी दहा वाजता चौकशीसाठी उपस्थित राहण्याची नोटीस देण्यात आली होती. मात्र त्याआधीच रात्री बारा वाजून चोवीस मी.वाजता आरोपीला अटक करण्यात आली. त्यामुळे उपस्थित राहण्यासाठी वेळ दिल्यानंतरही तत्काळ अटक करण्याची गरज काय होती? असा सवाल न्यायालयाने तपास अधिकाऱ्याला केला. तपास अधिकाऱ्याने आरोपी फरार होण्याची शक्यता असल्याचे कारण दिले.

मात्र न्यायालयाने हे कारण समाधानकारक नसल्याचे नमूद केले. तसेच आरोपी नोटीस स्वीकारत नसल्याचा दावा करण्यात आला होता; परंतु सादर नोटीशीवर आरोपीची सही असल्याने तपास अधिकाऱ्याचा दावा न्यायालयाने फेटाळला. तपास अधिकाऱ्याने तहसील कार्यालयाच्या पत्राचा उल्लेख करून आरोपीने बनावट शिक्का वापरल्याचा दावा केला होता. मात्र तहसीलदारांच्या पत्रात तसा स्पष्ट उल्लेख नसल्याचेही न्यायालयाच्या निदर्शनास आले. न्यायालयाने निरीक्षण नोंदविताना म्हटले की, या प्रकरणातील तपास मुख्यतः कागदपत्रांशी संबंधित असून सर्व गुन्ह्यांना कमाल सात वर्षांची शिक्षा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या अरेनेश कुमार विरुद्ध स्टेट ऑफ बिहार या निकालातील मार्गदर्शक सूचनांचे पालन झालेले दिसत नाही. त्यामुळे न्यायालयाने आरोपीला वैयक्तिक जामीन व हमी जामीन प्रत्येकी पंधरा हजार रुपयांवर मुक्त करण्याचे आदेश दिले. तसेच तपास अधिकाऱ्याने समाधानकारक स्पष्टीकरण न दिल्यास पुढील कारवाईसाठी प्रकरण पोलीस अधीक्षक, जालना यांच्याकडे पाठविण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. ही सुनावणी न्यायिक दंडाधिकारी प्रथम वर्ग, जाफराबाद यांनी भोकरदन येथे पार पाडली.

सर्वोच्च न्यायालयाने अरेनेश कुमार प्रकरणात अटकेसंदर्भात स्पष्ट मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. त्या सूचनांचे पालन न करता आरोपीला नोटीस देण्यापूर्वीच अटक करण्यात आली. न्यायालयाने याची गंभीर दखल घेत कायद्याच्या चौकटीत राहून आरोपीला दिलासा दिला आहे. कोणतीही अटक ही कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच व्हावी, हा या आदेशाचा महत्त्वाचा संदेश असल्याचे ॲड. मनीष राऊत महटले आहे.

# अखेर भोकरदनच्या बस स्थानकातील सीसीटीव्ही सुरू!

## सौ.अनिता जाधव यांच्या पाठपुराव्याला यश

**तभा वृत्तसेवा**
**भोकरदन । प्रतिनिधी**





बसस्थानक परिसरात दिवसेंदिवस वाढत चाललेल्या चोरी, महिलांच्या गळ्यातील सोन्याचे दागिने हिसकावणे, छेडछाड व संशयास्पद हालचालींमुळे महिला प्रवाशांमध्ये प्रचंड भीतीचे वातावरण निर्माण होऊन महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न अत्यंत गंभीर बनला असतांना भोकरदन बस स्थानकातील सीसीटीव्ही कॅमेरे बंद होते.ही बाब लक्षात येताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) च्या महिला पदाधिकारी सौ. अनिता अंकुश जाधव यांनी बसस्थानकात तात्काळ सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्याची मागणी वरिष्ठांकडे मागणी करत आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, त्यांच्या निवेदनाची दखल घेत रा. प. जाफ्राबाद आगाराचे आगार व्यवस्थापक यांनी तात्काळ विभागीय कार्यालय जालना यांना सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत कळविले होते. त्यांनी तात्काळ त्या करिता लागणारे साहित्य जाफ्राबाद आगारास पाठविले होते व तसे आगार व्यवस्थापक यांनी सौ अनिता जाधव यांना दि १६/०५/२०२६ रोजी पत्र देऊन कळविले होते. दरम्यान,भोकरदन बसस्थानकात दोन दिवसापूर्वीच सिसिटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. एसटी प्रशासनाने कॅमेरे बसविल्या बद्दल सौ अनिता जाधव व प्रवाशांनी समाधान व्यक्त केले आहे. कॅमेरे बसविल्याने महिलांचे दागिने, मोबाईल व पर्स चोरीस जाण्याच्या घटनावर आळा बसणार असल्याच्या भावना प्रवासातून व्यक्त होत आहेत.

# आमदार अर्जुनराव खोतकर यांनी विज कंपनीच्या अधिकाऱ्यांना घेतले फैलावर

## यापुढे वीज गायब होणार नसल्याचा दिला शब्द!

**तभा वृत्तसेवा**
**जालना । प्रतिनिधी**

पावसाच्या थोड्या सरी आल्या किंवा वारा आला तर लगेच वीज गायब होण्याचे प्रकार वाढल्याने जालनेकर नागरिक त्रस्त झाले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत बैठक घेऊन अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अक्षरशा फैलावर घेतले. यापुढे वीज गायब होणार नसल्याचा सर्वांनी शब्द दिल्यामुळे विजेच्या त्रासातून जालनेकरांची सुटका होणार आहे.



मागील काही दिवसांपासून जालना शहर आणि ग्रामीण भागात वीज गायब होण्याचे प्रकार वाढलेले आहेत. थोडा वारा आला, आभाळ आले किंवा गडगडाट झाला तरी वीज बंद केली जात होती. तीव्र उन्हामुळे जालनेकर नागरिकांची उकाड्यामुळे तगमग वाढली होती. वीज गायब होताच घरात उकाडा होत असल्याने लहान बाळांना घेऊन महिला रस्त्यावर येत होत्या. वयोवृद्ध व्यक्तींची दमछाक होत होती. दोन दोन तीन तीन तास वीज गायब असल्याने नागरिक अक्षरशः हैराण झाले होते. या पार्श्वभूमीवर आमदार अर्जुनराव खोतकर यांनी तातडीने अधीक्षक अभियंता श्री. सरग यांच्या उपस्थितीत वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कन्हैयानगर येथील कार्यालयात बैठक बोलावली. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, लाईट गेल्यावर लोक तुम्हाला जसे बोलतात तसेच मलाही लोकांचे फोन येतात. तुम्ही लोकांना फुकट विज देत नाहीत. लोकांना पैसे मोजावे लागतात. लोकांच्या रोशाला तुम्हाला जसे सामोरे जावे लागते त्यापेक्षा जास्त मला सामोरे जावे लागते. त्यामुळे यापुढे वीज गायब होणार नाही याची तुम्हाला काळजी घ्यावी लागणार आहे. तुमच्या अडचणी असतील तर मला सांगा. मी त्या दूर करतो. परंतु लोकांना त्रास व्हायला नको. महानगरपालिका झाडे तोडू देत नाहीत त्यामुळे झाडाच्या फांद्याला अडकून फ्युज उडतात असे सांगण्यात आले. याबाबत लगेच महानगरपालिकेला सांगून झाड तोडण्यापेक्षा फांद्या तोडून विजेच्या तारांचा अडथळा दूर करण्यासाठी सहकार्य करा असे सुचविले. यावेळी अधीक्षक अभियंता श्री. सरग यांनीही वीज गायब होत असल्याची कबुली देऊन यापुढे असे प्रकार होणार नाहीत असा सर्व अधिकारी कर्मचाऱ्यांच्या वतीने शब्द दिला. आमदार अर्जुनराव खोतकर म्हणाले की, मागील वर्षी सुद्धा आपण बैठक घेतली होती आणि तेव्हाही आपण माझा शब्द पाळला आणि वीज गायब होऊ दिली नाही. यावर्षीही पावसाळ्यात वीज गायब होणार नाही याची काळजी घ्यावी. अधीक्षक अभियंता श्री. सरग यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना सांगितले की, आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिलेल्या सूचना सहज घेऊ नका. त्यांचे आपल्याला खूप सहकार्य मिळते. त्यामुळे यापुढे कोणत्याही भागात वीज गायब झाली तर तातडीने दुरुस्ती करून वीज जोडणी करावी तसेच वीज गायब होणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा मी कारवाई करेल असे स्पष्ट शब्दात आपल्या कर्मचाऱ्यांना सुनावले. यावेळी उपस्थित अभियंता आणि सर्व लाईनमन यांनी गंभीर दखल घेत जालनेकरांना विजेचा त्रास होऊ देणार नाही असा शब्द दिला आहे. त्यामुळे यापुढे जालना शहरातील नागरिकांची विजेच्या त्रासातून सुटका होणार आहे. यावेळी अभिमन्यू खोतकर, अनिरूध्द खोतकर, भाऊसाहेब घुगे किशोर पांगरकर, निखिल पगारे,दुर्गेश काठोटीवाले ,कमलेश खरे दीपक राठोड यांच्यासह महावितरणचे कार्यकारी अभियंता पेन्सलवार,शहर अभियंता गुलाने शाखा अभियंता गव्हाणे उकांडे ग्रामीण उपाभियंता खिल्लारे व सर्व लाईनमन उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### खाटू श्याम दर्शनासाठी निघालेल्या हरंगुळच्या भाविकांच्या क्रुझरचा राजस्थानमध्ये भीषण अपघात; दोघांचा मृत्यू

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी तालुक्यातील हरंगुळ येथील भाविकांना घेऊन जाणाऱ्या क्रुझर (एमएच २२ यू. ००२८) वाहनाचा राजस्थानमध्ये भीषण अपघात होऊन दोन महिलांचा दुर्दैवी मृत्यू झाला. ही घटना बुधवारी सकाळी सुमारे ७ वाजण्याच्या दरम्यान जयपूर-सीकर राष्ट्रीय महामार्गावर घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, हरंगुळ येथील भाविक राजस्थानमधील प्रसिद्ध खाटू श्याम बाबा मंदिर येथे दर्शनासाठी जात होते. यावेळी त्यांच्या क्रुझर वाहनाने समोरील ट्रकला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, अपघातानंतर क्रुझर वाहन रस्त्यालगत असलेल्या एका हॉटेलमध्ये जाऊन आदळले. या भीषण अपघातात हरंगुळ येथील शालुबाई प्रल्हाद देशमुख (वय ७५) आणि मेघा अशोकराव देशमुख (वय ४०) यांचा जागीच मृत्यू झाला. तर क्रुझर चालक रितेश देशमुख हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. अपघाताची माहिती मिळताच देशमुख कुटुंबीय तातडीने राजस्थानकडे रवाना झाले आहेत. दरम्यान, या घटनेची बातमी हरंगुळ गावात पोहोचताच संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे.

दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी प्रिन्सिपल सेक्रेटरी राजकुमार सागर यांच्यासह रुग्णालयात जाऊन जखमींची भेट घेतली. त्यांनी जखमींची विचारपूस करून संबंधित प्रशासनाला आवश्यक सूचना दिल्या. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून राजस्थान पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

### अवैध सावकारीच्या विळख्यातून शेतकऱ्याची सुटका : दोन वर्षांच्या सातत्यपूर्ण लढ्याला यश

**जिंतूर,/प्रतिनिधी :** तालुक्यातील भोगाव साबळे येथील शेतकरी सय्यद अब्दुल यांची सात एकर शेती अवैध सावकारीच्या जोखडातून मुक्त करण्यात यश आले आहे. जवळपास दोन वर्षे सुरू असलेल्या कायदेशीर लढ्यानंतर मा. जिल्हा उपनिबंधक, परभणी यांनी सावकारी प्रकरणात अदलाबदलीत करण्यात आलेले खरेदीखत रद्द करण्याचे आदेश दिले आहेत.

महाराष्ट्रातील सावकारी प्रकरणांच्या इतिहासात अदलाबदलीच्या माध्यमातून करण्यात आलेले खरेदीखत रद्द करण्याचे हे आतापर्यंतचे एकमेव उदाहरण मानले जात आहे. या निर्णयामुळे अवैध सावकारीविरोधातील लढ्याला महत्त्वपूर्ण बळ मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. भोगाव साबळे येथील शेतकरी सय्यद अब्दुल यांची जमीन हेमंतकुमार कपूरचंद शर्मा यांच्या ताब्यात गेल्याचा आरोप होता. याविरोधात सातत्याने पाठपुरावा करून कायदेशीर लढा उभारण्यात आला.

या प्रकरणात ॲड. अनिल पेडगांवकर यांनी केलेल्या अभ्यासपूर्ण मांडणीमुळे प्रकरणाला यश मिळाल्याची भावना व्यक्त करण्यात आली. त्याबद्दल त्यांचा सत्कार करून आभार मानण्यात आले. यावेळी रवी देशमुख यांच्यासह मित्रपरिवार उपस्थित होता.


### अनधिकृत बॅनर, विनापरवाना बांधकामांवर आयुक्तांद्वारे कारवाईचे आदेश

**परभणी,/प्रतिनिधी :** शहरातील अनधिकृत बॅनर, विनापरवाना बांधकामे तसेच रस्त्यावर टाकण्यात आलेल्या बांधकाम साहित्याविरोधात तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश आयुक्त नितीन नार्वेकर आणि सहाय्यक आयुक्त तुकाराम कदम यांनी महानगरपालिका प्रशासनास दिले आहेत.

या आदेशानुसार परभणी महानगरपालिका अंतर्गत सर्व सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती अ, ब, क, शाखा अभियंता, कनिष्ठ अभियंता, सी.एस.आय. व एस.आय. यांना शहरातील राजकीय, धार्मिक तसेच व्यावसायिक स्वरूपाचे विनापरवानगी लावण्यात आलेले अनधिकृत बॅनर व फलक तात्काळ हटवून संबंधितांवर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच शहरातील विविध भागांत सुरू असलेल्या खाजगी बांधकामांची तपासणी करून संबंधित बांधकामांना अधिकृत परवाना आहे की नाही, याची पडताळणी करण्यास सांगण्यात आले आहे. विनापरवाना बांधकामे आढळल्यास नियमांनुसार कार्यवाही करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

याशिवाय, बांधकामासाठी वापरण्यात येणारे साहित्य रस्ते किंवा सार्वजनिक ठिकाणी टाकून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या घरमालकांना दोन दिवसांची नोटीस देण्यात येणार आहे. नोटीसनंतरही साहित्य हटविले नाही तर महानगरपालिका प्रशासनाकडून ते साहित्य उचलण्यात येईल आणि त्यासाठीचा खर्च संबंधित घरमालकांकडून वसूल करण्यात येणार असल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे. शहर स्वच्छ, सुरक्षित व शिस्तबद्ध ठेवण्यासाठी संबंधित विभागांनी तात्काळ कार्यवाही करावी, असेही निर्देश दिले आहेत.

### इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर शासकीय कामे थांबवून शेतकऱ्यांना पेरणीसाठी पुरेसे इंधन उपलब्ध करून द्या; अजय गव्हाणे यांची मागणी



**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यात निर्माण झालेल्या इंधन टंचाईच्या पार्श्वभूमीवर अत्यावश्यक नसलेली शासकीय कामे तात्पुरती थांबवून शेतकऱ्यांना पेरणीसाठी मुबलक प्रमाणात इंधन उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष अजय गव्हाणे यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

सध्या जिल्ह्यासह राज्यात इंधन टंचाईची परिस्थिती निर्माण झाली असून पेट्रोल व डिझेलच्या वाढत्या दरामुळे सर्वसामान्य नागरिक आणि शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग, राज्य महामार्ग, गावरस्ते तसेच विविध शासकीय बांधकामे मोठ्या प्रमाणावर सुरू असल्याने उपलब्ध इंधन साठ्यावर अतिरिक्त ताण पडत आहे. परभणी जिल्ह्यातील उपलब्ध इंधन साठ्यापैकी मोठा हिस्सा शासकीय कामांसाठी वापरला जात असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर इंधन मिळण्यात अडचणी निर्माण होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

सध्या शेती मशागतीचे व खरीप पेरणीपूर्व तयारीचे दिवस सुरू असून ट्रॅक्टर, पंप व इतर कृषी कामांसाठी डिझेलची मोठ्या प्रमाणावर आवश्यकता आहे. आगामी पेरणी हंगाम लक्षात घेता शेतकऱ्यांना इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

# ...आता अधिकमासात तीर्थक्षेत्रांना भेटी अर्ध्या तिकीटातच होणार

## एसटी संगे तीर्थाटन योजनेला प्रतिसाद, प्रवाशी वर्गाची संख्या वाढणार असल्यामुळे बसेसही वाढणार





**जिंतूर,/प्रतिनिधी:-** अधिकमासाच्या पवित्र महिन्यात भाविक मोठ्या संख्येने विविध तीर्थक्षेत्रांना भेट देत असतात. भाविकांची ही गर्दी आणि त्यांची सोय लक्षात घेता,राज्य मार्ग परिवहन महामंडळाने ''एसटी संगे तीर्थाटन ही विशेष योजना तीर्थाटन सुरू केली आहे. या योजनेंतर्गत भाविकांना आता अर्ध्या तिकिटात देवदर्शन घडणार असून, एसटीने या कालावधीत विशेष नियोजन केले आहे. या योजनेंतर्गत विविध तीर्थक्षेत्रांना भाविकांना भेटी देणे सोयीचे ठरत आहे.

सवलतींचा मोठा लाभ एसटी प्रशासनाने महिला आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी असलेल्या सवलती अधिक प्रभावीपणे लागू केल्या आहेत. यात महिला, मुले आणि ज्येष्ठांना बसच्या तिकिटात ५० टक्के सवलत (अर्धे तिकीट) दिली जात आहे. तसेच अमृत ज्येष्ठ नागरिक योजनेनुसार ७५ वर्षावरील नागरिकांना एसटीचा प्रवास मोफत आहे. या सवलतींमुळे अधिकमासातील तीर्थयात्रा आता अधिक सुखकर झाली आहे. काय आहे एसटी संगे तीर्थाटन योजना एसटी महामंडळाने तीर्थयात्रेला जाणाऱ्या भाविकांसाठी ही योजना सुरू केली आहे. यामध्ये महिला मंडळे, भजनी मंडळे, ज्येष्ठ नागरिकांचे गट, बचतगट किंवा ४० नागरिकांचा समूह एकत्र येऊन एसटी बस बुक करू शकतात. खासगी वाहनांच्या तुलनेत सुरक्षित आणि खिशाला परवडणारा प्रवास व्हावा, या उद्देशाने ही योजना राबवली जाते. योजनेचा लाभ कसा घ्यावा? ज्या भाविक गटांना किंवा मंडळांना या योजनेचा लाभ घ्यायचा आहे, मागणीनुसार बस उपलब्ध करून देण्याबाबत एसटीचे नियोजन पूर्ण झाले आहे. ४० प्रवासी गट त्यांना हव्या त्या मार्गावर बस उपलब्ध करून दिली जाते. '' अधिकमासात भाविकांची मोठी गर्दी लक्षात घेता एसटी महामंडळ सज्ज आहे. एसटी संगे तीर्थाटन योजनेमुळे भाविकांना सुरक्षित आणि किफायतशीर प्रवास करणे शक्य होणार आहे. ४० नागरिकांचा गट एकत्र आल्यास स्वतंत्र बसची सोय करून दिल्या जाते. प्रवाशांना सुरक्षित सेवा देण्यासाठी एसटी प्रशासन तत्पर असल्याची माहिती आनंद चव्हाण (आगार प्रमुख),स्थानक प्रमुख रामेश्वर सोनवणे,वाहतूक निरीक्षक शरद पाटील आदींनी दिले आहे. प्रवाशांच्या गटाला मिळणार गावात बस भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी जिंतूर आगाराने तीर्थक्षेत्रांसाठी विशेष वेळापत्रक आखले आहे. यामध्ये ४० जणांचा गट असल्यास त्यांना हव्या त्या मार्गावर बस उपलब्ध करून दिल्या जात असल्याची माहिती स्थानिक महामंडळ प्रशासनाने दिली आहे

## अवैध रेती उपशावर सोनपेठ पोलिसांचा छापा लोहिग्राम गोदापात्रातून किनी मशीनसह ट्रॅक्टर जप्त



**सोनपेठ,/प्रतिनिधी-** तालुक्यातील लोहीग्राम शिवारातील गोदावरी नदीपात्रात सुरू असलेल्या अवैध रेती उत्खननावर सोनपेठ पोलिसांनी छापा टाकून दि. २६ मे रोजी दुपारी धडक कारवाई केली यामध्ये किनी मशीन लावलेला ट्रॅक्टर, रेती उपशाचे साहित्य व रेतीसह एकूण दोन लाख आकरा हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.

गोपनीय माहितीच्या आधारे परभणी चे पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व गंगाखेड चे उपविभागीय पोलीस अधिकारी शिरतोडे यांच्या मार्गदर्शनाखाली सोनपेठ पोलीस स्टेशन चे पोलीस निरीक्षक अशोक गीते यांनी त्यांच्या पोलीस पथकासह मंगळवार दिनांक २६/०५/२०२६ रोजी दुपारी ३ वाजता लोहीग्राम शिवारातील गोदावरी नदीपात्रात छापा टाकून ही कारवाई केली.छापा कारवाईदरम्यान पोलिसांना पाहून काही इसम घटनास्थळावरून पसार झाले, तर अजय बालाजी आडे (वय १९ वर्षे, रा. सखाराम तांडा, ता. सोनपेठ) यास जागीच ताब्यात घेण्यात आले. चौकशीदरम्यान त्याने पांडुरंग ढाकणे, रा. लोहीग्राम यांच्या सांगण्यावरून किनीच्या सहाय्याने नदीपात्रातून अवैध रेती उपसा सुरू असल्याची माहिती दिली. तसेच रेती काढण्याच्या कामात इतर मजूर व ट्रॅक्टर चालकांचा सहभाग असल्याचेही निष्पन्न झाले. कारवाईदरम्यान घटनास्थळावरून प्लास्टिक टोपले, खोरे, वायर रोप, दोर, रेती उपशासाठी वापरण्यात येणारे लोखंडी साहित्य व अंदाजे एक ब्रास रेती असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.यानंतर ताब्यातील इसमाच्या माहितीवरून लोहीग्राम गावात पांडुरंग ढाकणे यांच्या घरासमोर उभा असलेला एमएच २२ एच ५०३३ क्रमांकाचा निळ्या रंगाचा किनी मशीन बसवलेला ट्रॅक्टर शोधून पंचासमक्ष जप्त करण्यात आला. सदर ट्रॅक्टरची अंदाजे किंमत दोन लाख रुपये इतकी आहे.या प्रकरणी अजय बालाजी आडे, रामेश्वर राठोड, बन्सीराम राठोड, मुंजा हिक्के व पांडुरंग ढाकणे यांच्याविरुद्ध कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता २०२३, कलम ४८(७)(८) महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम तसेच कलम ८, १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे.सदर कारवाईत पोह/७५१ कांबळे, पोशि/४६२ हुंडेकर, पोशि/७३५ देवकते, चालक पोशि/५१६ शिंदे व होमगार्ड कर्मचारी यांनी सहभाग घेतला.

### विधानपरिषदेसाठी एकूण ४० अर्ज विक्री

**परभणी,/प्रतिनिधी :** विधान परिषदेची परभणी-हिंगोली स्थानिक प्राधिकार मतदारसंघ निवडणूक-२०२६ साठी आज ४ जणांनी एकूण ११ उमेदवारी अर्ज घेतले. मात्र, एकाही उमेदवाराने अर्ज दाखल केलेला नाही. आजपर्यंत १६ व्यक्तींनी ४० अर्ज घेतले.

निवडणूक कार्यक्रमानुसार उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत १ जून २०२६ आहे. अर्जांची छाननी २ जून रोजी करण्यात येणार असून उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ४ जून निश्चित करण्यात आली आहे. या निवडणुकीसाठी मतदान १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेदरम्यान होणार आहे.

## कालव्यावरील आऊटलेट बुजवून बेकायदेशीर रस्ता; कारवाईची मागणी : खादगाव येथील शेतकऱ्याची पाटबंधारे विभागाकडे तक्रार

**सेलू,/प्रतिनिधी-** तालुक्यातील खादगाव येथील शेतकरी जगन्नाथ दौलतराव भाबट यांनी त्यांच्या शेतातील निम्न दुधना प्रकल्पाच्या डाव्या कालव्यावरील अधिकृत आऊटलेट बुजवून बेकायदेशीरपणे रस्ता तयार करण्यात आल्याचा गंभीर आरोप केला आहे. याप्रकरणी त्यांनी माजलगाव कालवा विभाग क्र. १०, परभणी येथे तक्रार दाखल करून संबंधितांवर महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे.

अर्जदार जगन्नाथ भाबट यांच्या म्हणण्यानुसार, खादगाव शिवारातील गट क्रमांक ४५ मध्ये त्यांची सुमारे ११ एकर शेती आहे. त्यातील काही क्षेत्र निम्न दुधना प्रकल्पासाठी अधिग्रहित करण्यात आले असून त्यांच्या शेताच्या पश्चिमेकडून डाव्या कालव्याची चारी गेलेली आहे. उर्वरित पूर्वेकडील शेताला पाणीपुरवठा करण्यासाठी पाटबंधारे विभागाने अधिकृत आऊटलेट बसविलेले असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, गट क्रमांक १०४ व १०५ मधील काही शेतकऱ्यांनी त्यांच्या शेतात जाण्यासाठी असलेला अधिकृत पांदण रस्ता बंद करून संगनमताने गट क्रमांक ४५ मधून बेकायदेशीर रस्ता तयार करण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप अर्जात करण्यात आला आहे. यासाठी महसूल विभागातील काही अधिकाऱ्यांची मदत घेतल्याचाही दावा करण्यात आला आहे. ४ जून २०२५ रोजी मंडळ अधिकारी व तलाठी यांनी केलेल्या पंचनाम्यात गट क्रमांक ४४ व ४५ यांची मोजणी होणे आवश्यक असल्याचे नमूद करण्यात आले होते. मात्र कोणतीही मोजणी किंवा संबंधित शेतकऱ्याला पूर्वसूचना न देता १३ मे २०२६ रोजी प्रत्यक्ष पंचनामा करून रस्ता मोकळा करण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप भाबट यांनी केला आहे.

तसेच, सदर रस्ता मोकळा करताना शेतातील कालव्याचा आऊटलेट पूर्णपणे बुजवून टाकण्यात आला असून रेखांकित लाईनिंगवरूनच रस्ता काढण्यात आल्यामुळे पाटबंधारे विभागाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात महसूल विभागाच्या आदेशाविरोधात अपील प्रलंबित असतानाही संबंधितांनी जबरदस्तीने रस्ता मोकळा करून दिल्याचा दावा अर्जदाराने केला आहे. त्यामुळे संबंधित अधिकारी व शेतकऱ्यांविरुद्ध महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६ अंतर्गत कठोर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी कार्यकारी अभियंत्यांकडे केली



### परभणी जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्यवीर सावरकर यांना अभिवादन

**परभणी,/प्रतिनिधी-** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांची जयंती जिल्हाधिकारी कार्यालयात साजरी करण्यात आली. नायब तहसीलदार प्रशांत वाकोडकर यांनी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सहाय्यक महसूल अधिकारी पठाण आबेदखॉ, यांच्यासह अर्चना निलवर्ण, गोपाळ पाटील, दिलीप डहाळे प्रकाश ठाकरे आदी कर्मचारी उपस्थित होते.

## जिल्ह्यात वनाच्छादित क्षेत्र वाढविण्यासाठी सामूहिक प्रयत्नांची गरज- जिल्हाधिकारी चव्हाण




**परभणी,/प्रतिनिधी:** जिल्ह्यात वनाच्छादित व वृक्षाच्छादित क्षेत्र वाढविण्यासाठी सर्व विभागांनी सामूहिक प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांनी केले. येत्या पावसाळ्यात मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड कार्यक्रम राबविण्याच्या अनुषंगाने आज जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत जिल्हाधिकारी श्री. चव्हाण बोलत होते.

या बैठकीला महानगर पालिका आयुक्त मिलिंद नार्वेकर, अपर जिल्हाधिकारी शोभा जाधव, उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चव्हाण, विभागीय वन अधिकारी एस. एस. पठाण, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी दौलत चव्हाण यांच्यासह विविध विभागांचे कार्यालय प्रमुख उपस्थित होते.

राज्यात ३०० कोटी वृक्षारोपण मोहिम तसेच इतर पायाभूत सुविधा उपक्रमांचे नियोजन, अंमलबजावणी व संनियंत्रणासाठी ''हरित महाराष्ट्र आयोग'' स्थापन करण्यास शासनाने मान्यता दिली आहे. सन २०२६ ते २०४७ या कालावधीत राज्यात ३०० कोटी वृक्षारोपण अभियान राबविण्याचा शासनाचा निर्धार असून, त्याअनुषंगाने आवश्यक नियोजन, जागेची उपलब्धता, रोपे, मनुष्यबळ तसेच विभागनिहाय कृती आराखडा तयार करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या एकूण भौगोलिक क्षेत्रापैकी ३३ टक्के क्षेत्र वनाच्छादित व वृक्षाच्छादित असणे अपेक्षित आहे. मात्र, सध्या जिल्ह्यात हे प्रमाण केवळ १.६ टक्के असून ते वाढविण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. यासाठी जिल्ह्यातील पोटखराब जमीन, रस्त्याच्या दुतर्फा, शाळा महाविद्यालय, मोकळ्या भूखंडांवर वृक्षलागवड करण्याचे नियोजन करण्यात यावे, असे जिल्हाधिकारी श्री. चव्हाण म्हणाले.

जिल्ह्यातील संबंधित यंत्रणांकडे सध्या २७ लाखांहून अधिक रोपे उपलब्ध असून, त्यापैकी जास्तीत जास्त रोपे प्राधान्याने ग्रामपंचायतींना उपलब्ध करून द्यावीत. त्यानंतर जिल्हा परिषद बांधकाम विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि कृषी विभागास रोपांचे वितरण करण्यात यावे, अशा सूचना त्यांनी दिल्या. जायकवाडी, येलदरी व मासोळी प्रकल्प, नदीकाठच्या पूरप्रवण गावांमध्ये पूरनियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवडीचे नियोजन करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी संबंधित यंत्रणांना दिले. तसेच परभणी जिल्ह्यातील स्थानिक वृक्षप्रजातींबाबतची माहिती वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाकडून घेऊन त्यानुसार स्थानिक प्रजातींच्या वृक्षलागवडीस प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या. जिल्हा परिषदेमार्फत ग्रामपंचायती स्तरावर ''जास्तीत जास्त वृक्षसंवर्धन'' स्पर्धा आयोजित करून तीन किंवा पाच वर्षांनंतर किती वृक्ष जिवंत राहिले याचे मूल्यमापन करण्यात यावे, असेही त्यांनी सांगितले. प्रत्येक शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याच्या नावाने एक झाड लावून त्या झाडाच्या संगोपनाची जबाबदारी संबंधित विद्यार्थ्यावर देण्याचे नियोजन करावे. तसेच प्रत्येक स्मशानभूमीत मृत व्यक्तींच्या स्मरणार्थ एक झाड लावून त्याचे संगोपन करण्याचे आवाहनही जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी यावेळी केले.

# संपादकीय

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख...

# शुद्ध, पवित्र आणि पारदर्शक!

लोकशाहीचा सर्वांत मोठा उत्सव म्हणून ज्याचे वर्णन केले जाते, त्या निवडणुकांची पालखी मतदारयाद्यांच्या खांद्यावरून पुढे जात असते. गेल्या काही वर्षांत देशात विरोधकांकडून मतदारयाद्यांच्या आणि निवडणूक प्रक्रियेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्हे उमटविण्याचे अनेक प्रयत्न झालेत. मतदारयादी, ईव्हीएम, व्हीव्हीपॅट यांच्या तांत्रिक विश्वासार्हतेवर जाहीरपणे आक्षेप घेतले गेले आणि हे वाद थेट न्यायालयांपर्यंत पोहोचले. निवडणुकांचा उत्सव ज्यांच्या अधिकाधिक सहभागातून साजरा करावयाचा असतो, त्या मतदारांच्या वैधतेवर प्रश्नचिन्हे उमटविली जात असल्याचा आक्षेपही घेतला गेला. निवडणूक आयोगास सरकारच्या ताटाखालचे मांजर ठरवून मतदारांमध्ये आयोगाच्या स्वायत्ततेबाबत संभ्रम पसरविण्याचाही प्रयत्न झाला. या गदारोळाला आता पूर्णविराम मिळेल अशी अपेक्षा करावयास हरकत नाही. निवडणूक आयोगाने बिहार आणि अन्य राज्यांत पार पाडलेली मतदारयाद्यांची विशेष सखोल पडताळणी मोहीम ही निःसंदिग्धपणे शुद्ध कायदेशीर प्रक्रिया आहे आणि ती रद्द केली जाऊ शकत नाही, असा स्पष्ट निर्वाळा सर्वोच्च न्यायालयाने दिल्याने, या प्रक्रियेच्या विरोधात सातत्याने गरळ ओकून लोकशाहीचा उत्सव निर्भेळपणे साजरा करण्याच्या सद्हेतूवर शंका उमटविण्याचे प्रयत्न आता थंडावतील.

गेल्या वर्षी जूनच्या पहिल्या आठवड्यात काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी काही मुद्रित माध्यमांत निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर ताशेरे ओढून महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीविषयी संशय व चिंता व्यक्त करणारे लेख प्रसिद्ध केले होते. त्याआधी फेब्रुवारी महिन्यात लोकसभेतही त्यांनी हाच सूर आळवला होता. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकीत मतदारयाद्यांमध्ये बनावट नावे घुसविल्याचा आक्षेप घेत राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगाविरुद्ध जोरदार मोहीम उघडली होती. निवडणूक आयोगाने राहुल गांधींच्या आरोपांतील प्रत्येक मुद्दा सप्रमाण खोडून काढत त्याचे शब्दशः खंडन केल्यानंतरही हा वाद चिघळत ठेवण्याची मोहीम विरोधकांनी सुरू केली होती. राहुल गांधींच्या अशाच आक्षेपाच्या सुरात सूर मिसळणारी एक याचिका त्या दरम्यान सुनावणीसाठी उच्च न्यायालयासमोर होती आणि प्रकाश आंबेडकर यांनी हा सूर हिरिरीने न्यायालयातही आळविला होता. पण न्यायालयानेही हे सारे आक्षेप फेटाळून तर लावलेच, पण अशी याचिका केवळ संभ्रम पसरविण्याच्या व न्यायालयाचा वेळ वाया घालविण्याच्या उद्देशाने केली गेल्याचा ठपका ठेवत याचिकाकर्त्याचे कानही उपटले होते. खरे म्हणजे, निवडणुका, मतदारयाद्यांची स्पष्टता व निवडणूक आयोगाची भूमिका याबाबत चालविल्या गेलेल्या मोहिमेतून पसरणाऱ्या संभ्रमांचे पितळ तेव्हाच उघडे पडले होते. वस्तुतः, बिहारमधील विधानसभेच्या निवडणुकीआधी निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या मतदारयाद्यांच्या शुद्धीकरण मोहिमेमुळे विरोधकांत अस्वस्थता माजण्याचे काहीएक कारण नव्हते. सुमारे चार दशकांत मतदारयादीमध्ये नोंदविल्या गेलेल्या मतदारांच्या नावांची काटेकोर छाननी सुरू झाल्यानंतर या याद्यांमध्ये नेपाळी, बांगलादेशी, म्यानमारच्या रोहिंग्यांची मतदार म्हणून घुसखोरी झाल्याचेही स्पष्ट झाले आणि निवडणुका जिंकण्याच्या नीतीचे किती अधःपतन झाले याची चुणूकही दिसू लागली. अशी छाननी वेळीच झाली नसती, तर बिहारच्या निवडणुकीत विजयी होऊन लोकप्रतिनिधी म्हणून विधिमंडळात दाखल झालेले नेते नक्की कोणाचे प्रतिनिधित्व करतात, याची उत्तरेही कधीच मिळाली नसती. त्यामुळे छाननी प्रक्रियेचे स्वागत होणे अपेक्षित असताना प्रत्यक्षात मात्र आयोगाच्या या मोहिमेवरच आक्षेप घेण्यामागची धास्ती नेमकी कशापायी याचे उत्तर लपून राहिले नव्हते.

अशी पडताळणी करण्याचा निवडणूक आयोगाचा अधिकार अबाधित असल्याचा निर्वाळा देऊन सर्वोच्च न्यायालयाने आता या प्रक्रियेवरील सर्व आक्षेपांमधील हवा काढून घेतल्याने दोन बाबी स्पष्ट झाल्या आहेत. पहिली म्हणजे, निवडणूक आयोगाच्या अधिकारावर उमटविली गेलेली प्रश्नचिन्हे, सातत्याने घेतले जाणारे आक्षेप आता पुसले जाणार असून, या देशातील लोकप्रतिनिधी निवडण्याचा अधिकार केवळ या देशातील पात्र मतदार असलेल्या नागरिकांनाच असल्याने, बेकायदा घुसखोरांचे या अधिकारांवरील अतिक्रमण हटणार आहे. अशा घुसखोरीमुळे आतापर्यंतच्या निवडणुकांमध्ये किती गढूळपणा मिसळला असेल, याचा अंदाज करणे काहीसे अवघड आहे, पण सर्वोच्च न्यायालयाने निःसंदिग्ध निर्वाळा देऊन या प्रक्रियेस वैधता बहाल केल्यामुळे आता शुद्धीकरणाची ही प्रक्रिया भारताच्या लोकशाहीस सुदृढ करण्यास साह्यभूत ठरेल यात शंका नाही. मतदारयाद्यांची सखोल पडताळणी ही कायदेशीर प्रक्रिया आहे आणि ही प्रक्रिया हाती घेण्याचा निवडणूक आयोगास घटनात्मक अधिकारदेखील आहे असे स्पष्ट करून न्यायालयाने या प्रक्रियेची वैधता पूर्णपणे ग्राह्य धरली आहेच, शिवाय मुक्त, निष्पक्ष आणि न्याय्य निवडणुकांना चालना देण्यासाठी ही प्रक्रिया अनिवार्य असल्याने रद्द केली जाऊ शकत नाही, असेही स्पष्ट केले आहे. मतदारयादीत नाव नसलेली व्यक्ती नागरिक नाही असे नव्हे, पण मतदारयादीत नाव असलेली प्रत्येक व्यक्ती भारताची नागरिक आहे किंवा नाही याची प्राथमिक चौकशी करण्याचा अधिकार मात्र निवडणूक आयोगास असल्याने, मतदान करण्याचा अधिकार हा अमूल्य असला तरी तो अनिर्बंध नाही, याची जाणीवदेखील या निकालाने करून दिली आहे. न्यायालयाच्या या भूमिकेमुळे केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगास सातत्याने आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करून त्यांच्यावर प्रश्नचिन्हे लादण्याच्या राजकारणास आता लगाम बसायला हवा. कारण या निकालातूनच विरोधकांचे आक्षेप फेटाळले गेले असून आयोगास आणि केंद्र सरकारला फार मोठा कायदेशीर विजय मिळवून दिला आहे. देशातील १६ राज्ये आणि तीन केंद्रशासित प्रदेशांमध्ये मतदारयाद्यांच्या विशेष सखोल तपासणी मोहिमेचा तिसरा टप्पा सुरू करण्याच्या गेल्या १४ तारखेस आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशांनुसार महाराष्ट्रातील सुमारे नऊ कोटी ८६ लाख ६४ हजार मतदारांच्या नोंदी अद्ययावत केल्या जाणार आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर आता महाराष्ट्रात सुरू होणाऱ्या एसआयआर मोहिमेची वाटचाल अत्यंत संवेदनशील आणि राजकीयदृष्ट्या महत्त्वाची ठरणार आहे. मतदारांची प्रारूप यादी ५ ऑगस्ट रोजी प्रसिद्ध करण्यात येईल, तेव्हा आपल्या नावातील बदल, दुरुस्ती किंवा नवीन नाव नोंदणीचे दावे व हरकती सादर करण्याची प्रक्रिया सुरू होईल, असे आयोगाने त्या निर्देशात स्पष्ट केले आहे. त्यामुळे, मतदारयाद्या अंतिम स्वरूपात सिद्ध होतील तेव्हा त्या परिपूर्ण आणि निर्दोष राहतील याची काळजी घेण्याची जबाबदारी केवळ आयोगावरच नव्हे, तर राजकीय पक्ष आणि मतदारांवरही असणार आहे. म्हणजे, कायदेशीर लढाईत न्यायालयाने मतदारयाद्यांच्या तपासणी मोहिमेवरील विरोधकांचे आक्षेप दूर केले असल्याने आता विरोधकांना प्रत्यक्ष मैदानात उतरावे लागेल. मतदारयादीतून आपल्या मतदारांची नावे चुकीच्या पद्धतीने वगळली जाणार नाहीत, याची काळजी घेण्यासाठी राजकीय पक्षांना आपापले बुथ लेव्हल एजंट्स सक्रिय करावे लागतील. वगळण्यात आलेल्या मतदारांची यादी राजकीय पक्षांना उपलब्ध करून देण्याचे आणि छाननीसाठी मुदत देण्याचे सुरक्षा कवच जाहीर करून निवडणूक आयोगाने राजकीय वाद टाळण्याचा पारदर्शक प्रयत्न केला आहे. त्याचा काटेकोर वापर करत या शुद्धीकरण मोहिमेस हातभार लावून कालपरवापर्यंत सुरू ठेवलेल्या संभ्रम पसरविण्याच्या मोहिमांना विरोधकांनी पूर्णविराम दिला, तर विश्वासार्हता जपण्यासाठी ते महत्त्वाचे ठरेल. कारण ही मोहीम म्हणजे केवळ कागदोपत्री दुरुस्तीचाच उपक्रम नाही, तर लोकशाहीच्या शुद्धीकरणाचा एक महत्त्वाचा टप्पा आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्वाळ्याने या मोहिमेला कायदेशीर पावित्र्य दिले आहे. एकही वैध मतदार मतदानापासून वंचित राहू नये आणि एकही अवैध मतदार यादीत असू नये, या दोन्ही तत्त्वांचा समतोल राखून हे पावित्र्य जपण्याची जबाबदारी आता सर्वांचीच राहणार आहे.

## अर्थविशेष

# आय. टी. आर. भरताना ही चूक करू नका!


### मूल्यांकन वर्ष २०२६-२७ मधील बदल आणि योग्य आय. टी. आर. निवडीचे महत्त्व

हितेश पारसे

आयकर रिटर्न भरण्याचा हंगाम सुरू झाला की बहुतांश करदात्यांसमोर एकच प्रश्न उभा राहतो- ''मला कोणता आय. टी. आर. भरायचा?'' अनेक वेळा लोक इंटरनेटवरील माहिती, मित्रांचा सल्ला किंवा मागील वर्षाचा अनुभव वापरून रिटर्न भरतात. काही वेळा 'सोपे आहे' म्हणून आय. टी. आर. -१ निवडला जातो, तर काही जण फक्त फॉर्म १६ पाहून रिटर्न फाईल करतात. मात्र, योग्य आय. टी. आर. निवडणे ही केवळ एक औपचारिकता नसून संपूर्ण कर अनुपालन प्रक्रियेतील सर्वांत महत्त्वाची पायरी आहे. चुकीचा आय. टी. आर. निवडल्यास भविष्यात नोटीस, परतावा मिळण्यास विलंब, अतिरिक्त कर, दंड आणि काही प्रकरणांमध्ये संपूर्ण रिटर्न अवैध ठरण्याची शक्यता निर्माण होऊ शकते. त्यामुळे रिटर्न भरण्यापूर्वी ''कोणता आय. टी. आर. माझ्यासाठी योग्य आहे?'' हा प्रश्न विचारणे अत्यंत आवश्यक झाले आहे. मूल्यांकन वर्ष २०२६-२७ साठी आयकर विभागाने आय. टी. आर. -१ मध्ये काही महत्त्वाचे बदल केले आहेत. या बदलांमुळे अनेक करदात्यांना दिलासा मिळणार असला तरी योग्य आय. टी. आर. निवडण्याची जबाबदारी अधिक वाढली आहे. पूर्वी

आय. टी. आर. -१ हा फॉर्म मुख्यतः पगारदार व्यक्ती, पेन्शनधारक आणि मर्यादित उत्पन्न असलेल्या करदात्यांसाठी वापरला जात असे. मात्र आता दोन घराची मालमत्तापर्यंतची माहिती आय. टी. आर. -१ मध्ये देता येणार आहे. त्यामुळे स्वतःचे एक घर आणि दुसरे भाड्याने दिलेले घर असलेल्या व्यक्तींना किंवा दोन निवासी मालमत्ता असलेल्या कुटुंबांना याचा फायदा होणार आहे. वाढत्या शहरीकरणामुळे आणि गृहकर्जाच्या उपलब्धतेमुळे अनेक कुटुंबांकडे दोन मालमत्ता असतात. त्यामुळे हा बदल मोठ्या प्रमाणात मध्यमवर्गीय करदात्यांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

याचबरोबर, शेअर मार्केट आणि म्युच्युअल फंडमध्ये गुंतवणूक करणाऱ्या करदात्यांसाठीही एक महत्त्वाचा बदल करण्यात आला आहे. पूर्वी लहान प्रमाणात दीर्घकालीन भांडवली नफा असतानाही अनेक करदात्यांना आय. टी. आर. -२ भरावा लागत होता. आता कलम ११२अ अंतर्गत १.२५ लाखांपर्यंत दीर्घकालीन भांडवली नफा असल्यास आणि काही अटी पूर्ण होत असल्यास आय. टी. आर. -१ वापरण्याची परवानगी देण्यात आली आहे. एसआयपी, इक्विटी म्युच्युअल फंड आणि शेअर बाजारातील गुंतवणूक वाढत असताना हा बदल मोठ्या प्रमाणात पगारदार गुंतवणूकदारांसाठी




दिलासादायक ठरू शकतो. मात्र, यामध्ये भांडवली तोटा पुढे नेणे नसणे आणि इतर प्रकारचे भांडवली नफा नसणे यासारख्या अटी लक्षात घेणे आवश्यक आहे.

मात्र, आय. टी. आर. -१ मध्ये सवलती वाढल्या म्हणजे प्रत्येकासाठी आय. टी. आर. -१ योग्य ठरेल असे नाही. अनेक वेळा करदाते फक्त सोयीसाठी किंवा कमी माहितीमुळे चुकीचा फॉर्म निवडतात. उदाहरणार्थ, एखाद्या व्यक्तीकडे भांडवली नफा, परकीय मालमत्ता, कंपनी संचालक पद, असूचीबद्ध शेअर्स किंवा व्यावसायिक उत्पन्न असेल आणि तरीही त्यांनी आय. टी. आर. -१ भरला, तर पुढे गंभीर अडचणी निर्माण होऊ शकतात. आज आयकर विभाग एआयएस, फॉर्म २६एएस, टीडीएस डेटा, म्युच्युअल फंड व्यवहार, मालमत्ता नोंदणी, व्याज उत्पन्न आणि इतर अनेक माहिती स्रोत एकत्र करून परत सत्यापित करा करतो. त्यामुळे चुकीची माहिती किंवा चुकीचा फॉर्म वापरणे सहज लक्षात येते.

चुकीचा आय. टी. आर. भरल्यास सर्वांत प्रथम सदोष परतावा सूचना येण्याची शक्यता असते. कलम १३९(९) अंतर्गत विभाग सदोष परतावा घोषित करू शकतो आणि ठरावीक कालावधीत दुरुस्ती करण्यास सांगू शकतो. वेळेत सुधारणा केली नाही तर अवैध परत करा होण्याचा धोका निर्माण होतो. याचा अर्थ असा की जणू परतावे भरलाच गेला नाही. त्यानंतर विलंब शुल्क, व्याज आणि नॉन-फाइलिंगचे परिणाम लागू होऊ शकतात. काही प्रकरणांमध्ये परतावा प्रक्रिया देखील थांबू शकते. अनेक करदाते परतावा का अडकला हे शोधत असतात, परंतु त्यामागे चुकीचा

आय. टी. आर. किंवा माहितीतील जुळत नाही हे कारण असते.

आज ए. आय. एस आणि फॉर्म २६एएस चे महत्त्व प्रचंड वाढले आहे. अजूनही अनेक करदाते फक्त फॉर्म १६ वर आधारित परतावे भरतात, परंतु ही सवय धोकादायक ठरू शकते. बँकेवरील व्याज, म्युच्युअल फंड रिडम्प्शन, लाभांश उत्पन्न, मालमत्ता व्यवहार किंवा इतर व्यवहार ए. आय. एस.मध्ये दिसत असतात. त्यामुळे परतावे भरण्यापूर्वी ए. आय. एस., टी. आय. एस. फॉर्म २६एएस, बँक स्टेटमेंट आणि भांडवली नफा विवरण तपासणे अत्यंत आवश्यक आहे.

योग्य आय. टी. आर. निवडण्यासाठी एक साधा नियम लक्षात ठेवणे आवश्यक आहे- ''उत्पन्नाचा स्रोत आय. टी. आर. ठरवतो, सोय नाही.'' फक्त पगार, व्याज उत्पन्न आणि मर्यादित घराच्या मालमत्तेचे उत्पन्न असल्यास आय. टी. आर. -१ योग्य ठरू शकतो. भांडवली नफा, एकाधिक मालमत्ता किंवा परकीय उत्पन्न असल्यास आय. टी. आर. -२ लागू होऊ शकतो. व्यवसाय किंवा व्यवसाय असल्यास

आय. टी. आर. -३ किंवा अनुमानित योजना असल्यास आय. टी. आर. -४ लागू होऊ शकतो. चुकीचा

आय. टी. आर. भरून नंतर सुधारित परतावा करण्यापेक्षा सुरुवातीपासून योग्य परतावे भरणे अधिक सुरक्षित असते. आज आय. टी. आर. हा केवळ कर अनुपालन दस्तावंज राहिलेला नाही. गृह कर्ज, व्यवसाय निधी, व्हिसा प्रक्रिया, सरकारी निविदा, मालमत्ता व्यवहार आणि बँकिंग उद्देश साठी आय. टी. आर. महत्त्वाचा दस्तऐवज बनला आहे. त्यामुळे चुकीचा आय. टी. आर. भविष्यात आर्थिक विश्वासार्हतेवरही परिणाम करू शकतो. मूल्यांकन वर्ष २०२६-२७ मधील बदलांमुळे काही करदात्यांसाठी प्रक्रिया अधिक सुलभ झाली असली तरी एक गोष्ट स्पष्ट आहे- योग्य आय. टी. आर. निवडणे ही केवळ तांत्रिक बाब नाही, तर आर्थिक सुरक्षिततेची गरज आहे. रिटर्न भरण्यापूर्वी सर्व उत्पन्न स्रोत तपासा, योग्य माहिती पडताळा आणि आवश्यक असल्यास तज्ज्ञांचा सल्ला घ्या. कारण एक चुकीचा आय. टी. आर. हा केवळ एक फॉर्म नसून भविष्यातील अनेक अडचणींची सुरुवात ठरू शकतो.

९०९६३३२३५३

(लेखक कर व मालमत्ता हस्तांतरण सल्लागार आहेत.)

## वेध

# साराजेवो सफारी

रेवती जोशी-अंधारे

आपण भारतीय (अपवाद वगळता) नीतिमूल्ये मानणारे, देवाधर्माचे करणारे थोडक्यात पापभिरू असतो. सुखाच्या आणि आनंदाच्या आपल्या कल्पना खूप काही जगावेगळ्या नसतात. कुटुंबासोबत फिरायला जायचा विचार आला की, पहिला विचार असतो सफारीचा! सफारी म्हणताच डोळ्यांपुढे येते ती गर्द वनराई, रुबाबदार पण हिंस्त्र श्वापदांची डौलदार चाल, एखादा नवा पदार्थ, मोकळी हवा, भरपूर फोटोज आणि क्षणभर विश्रांती! पण, जगात सर्वत्र असे नाही. ज्या युरोपला शिस्त, स्वच्छता आणि आधुनिकतेसाठी आदर्श मानले जाते तिथे 'साराजेवो सफारी' हा बीभत्स प्रकार अस्तित्वात आला.

गेल्याच आठवड्यात बोस्निया युद्धातील गुन्ह्यांची सुनावणी नव्याने सुरू झाली आणि साराजेवो सफारी पुन्हा चर्चेत आली. साराजेवो हे युरोपातील एक सुंदर शहर! पहिल्या महायुद्धाची ठिणगी जिथे पडली ते साराजेवो! बोस्निया आणि हर्जगाव्हिना या दोन देशांची सामायिक राजधानी असलेल्या साराजेवोला १९९२ ते १९९५ दरम्यानच्या घटनाक्रमाने वॉर टुरिझमचे केंद्र म्हणून ओळख मिळाली. या काळात साराजेवोत मृत्यूने थैमान घातले. एकीकडे भीषण युद्धाला तोंड फुटले असताना, साराजेवोमध्ये मात्र महिला आणि लहान मुलांच्या हत्यांना ऊत आला होता. शहराच्या बाहेर असलेल्या डोंगरांवर बसून, स्नायपर दुर्बिणीने रस्त्यावर दिसलेल्या माणसांना टिपून त्यांची 'शिकार' करायची, असा हा श्रीमंती शौक! या खुल्या हत्यांसाठी हजारो डॉलर्स मोजले जात होते. स्नायपर सफारी सुरू असताना, घराबाहेर निघणे एवढाच त्या बिचाऱ्यांचा गुन्हा होता. सुरुवातीला कोण, कुठून आणि कशाला गोळ्या घालतंय? याचा काही अंदाजच येत नव्हता. विदेशातून आलेले गर्भश्रीमंत पण अमानुष लोक गंमत म्हणून या लोकांना मारत होते. भारतात राजेरजवाडे शिकारीला जात, तसे हे माणसांची शिकार करत होते. पैसे देऊन, स्नायपरने निशाणा लावायचा. शिकार मिळाली



तर छानच पण, नाही मिळाली तर आणखी पैसे देऊन खेळ सुरू ठेवायचा. बोस्नियाच्या सैन्याने ४ वर्षे साराजेवोला घेराव घातला होता आणि याच काळात साराजेवो सफारी सुरू झाली आणि फोफावली. त्यावेळी, युगास्लोव्हाकीयापासून वेगळे होऊन स्वतंत्र राष्ट्र बनण्यासाठी बोस्नियाचे लोक प्रयत्नशील होते. पण, बोस्नियाई सर्ब सैन्य मात्र याविरोधात होते. नागरिकांवर सूड उगविण्याची ही अमानुष पद्धत सर्ब सैन्याधिकाऱ्यांनी अमलात आणली. घराबाहेर निघणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण! शाळा-ऑफिसेस तर कधीच बंद पडलीत. दैनंदिन वस्तूंचा तुटवडा झाला. वेळेवर औषधं न मिळाल्यानेही मृत्यू झाले. शहरातील 'स्नायपर ऐली' नावाच्या रस्त्यावर सर्वाधिक मृतदेह सापडल्याची नोंद झाली.

या नृशंस हत्याकांडावर खरी चर्चा सुरू झाली ती २०२२ मध्ये आलेल्या 'साराजेवो सफारी' या माहितीपटानंतर! स्लोव्हेनियाच्या मिरान झुपनिक याने प्रत्यक्षदर्शींचे अनुभव, मारल्या गेलेल्यांच्या कुटुंबीयांच्या मुलाखती, शहरातील इमारतींमध्ये रुतलेल्या गोळ्या असे सगळे जगासमोर आणले आणि या घटना खोट्या असल्याचे दावे फोल ठरले. पत्रकार दोमगाज मार्गेटीक यांच्या 'पे ॲण्ड शूट' या पुस्तकाने ऑस्ट्रियामध्ये ही चर्चा आणि खुल्या तपासाला सुरुवात झाली. गेल्या वर्षी इटलीच्या मिलानमध्ये या संदर्भातील गुन्हे नोंदविण्यात आले. चार वर्षे चाललेल्या शहराच्या घेरावात ११ हजारांवर लोक मारले गेले. यात वृद्ध, महिला आणि मुलांची संख्या लक्षणीय होती. गंमत म्हणून माणसाची शिकार करणाऱ्यांमध्ये अमेरिकन, ऑस्ट्रियन आणि इटलीची बडी धेंडं हौशीने सहभागी झालीत. शहराची घेराबंदी आणि शहराबाहेरच्या डोंगरांवर बसलेले हौशी शिकारी अशा दुहेरी कात्रीत निष्पाप नागरिक फसले होते. या सफारीच्या माध्यमातून सर्ब सैन्याधिकाऱ्यांनी जबर कमाई केली. एका स्नायपर टुरिस्टकडून महिला-मुलांची शिकार करण्यासाठी ९० हजार डॉलर्स घेतले जात होते. हे 'शिकारी' आज ८०-९० वर्षांचे आहेत आणि त्यांची चौकशी सुरू आहे, यापेक्षा दुर्दैव आणखी काय असेल? दरम्यान, यापैकी एकही घटना कोणत्याही न्यायालयात सिद्ध होऊ शकलेली नाही. पण, लोकांचे अनुभव माणुसकीला काळिमा फासणारे आहेत. आपल्या मुंबईत ६० च्या दशकात रामण राघव या देशातील पहिल्या सीरियल किलरने दहशत निर्माण केली होती. थंड डोक्याने ४१ हत्या करणारा राघव मानसिक रुग्ण होता. तो एक होता पण, साराजेवोमध्ये येऊन माणसांना टिपणारे त्याच्यासारखे कित्येक इतिहासाच्या उदरात गडप झाले. सध्याचे फ्री फायर आणि पब जीसारखे खेळ 'क्रेझीनेस'च्या नावाखाली मनोरुग्णांची पिढी घडवत आहेत का?

९८५०३३९२४०

## विशेष

# शहरातील 'सर्क्युलर इकॉनॉमी'

प्रा. सुखदेव बखळे

आधुनिक महानगरांचे स्वरूप एका विलक्षण विरोधाभासाचे प्रतीक बनले आहे. ही शहरे स्वतःचा विस्तार करताना एकाच वेळी स्वतःची उभारणी आणि स्वतःचे विघटनही करत असतात. एका बाजूला नवीन इमारती, उड्डाणपूल, मेट्रो मार्ग, महामार्ग आणि व्यावसायिक संकुले उभी राहत असतात, तर दुसऱ्या बाजूला जुनी बांधकामे जमीनदोस्त केली जात असतात. या अखंड चक्रातून निर्माण होणारा बांधकाम आणि पाडकाम कचरा म्हणजेच 'कन्स्ट्रक्शन ॲण्ड डिमॉलिशन वेस्ट' (सी ॲण्ड डी वेस्ट) हा आजच्या शहरीकरणाचा सर्वांत मोठा; पण सर्वांत कमी गांभीर्याने घेतला गेलेला प्रश्न ठरत आहे. भारतात दरवर्षी निर्माण होणाऱ्या या कचऱ्याचे प्रमाण १५० दशलक्ष टनांपासून ५०० दशलक्ष टनांपर्यंत असल्याचे विविध अंदाज सांगतात. या आकडेवारीतील प्रचंड तफावतच एक गंभीर समस्या अधोरेखित करते, ती म्हणजे आपण शहरांचा विकास मोजतो आहोत; पण त्या विकासातून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे अचूक व्यवस्थापन अजूनही आपल्या हाताबाहेर आहे. वेगाने होणारे नागरीकरण आणि सातत्याने सुरू असलेली बांधकामे यामुळे दिल्ली दररोज सुमारे बारा हजार पाचशे टन घनकचरा निर्माण करते. यातील जवळपास पन्नास टक्के हिस्सा 'सी ॲण्ड डी' कचऱ्याचा असल्याचे मानले जाते. विशेष म्हणजे या कचऱ्यामध्ये पुनर्वापराची मोठी क्षमता आहे. दिल्ली महानगरपालिका या कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी बक्करवाला, बुराडी, शास्त्री पार्क आणि राणीखेडा येथे चार पुनर्प्रक्रिया प्रकल्प चालवते. त्यांची एकत्रित क्षमता पाच हजार टन प्रतिदिन इतकी आहे. याशिवाय ओखला येथील टेकखंड परिसरात आणखी एक हजार टन क्षमतेचा प्रकल्प उभारला जात आहे.

ही केवळ कचरा प्रक्रिया केंद्रे नाहीत, तर शहरी व्यवस्थापनाच्या नव्या विचारसरणीची प्रतीके आहेत. याउलट, नवी दिल्ली महानगरपालिका अधिक विकेंद्रित पद्धतीने हा प्रश्न हाताळत आहे. येथे दररोज निर्माण होणारा ३५ ते ४० टन 'सी ॲण्ड डी' कचरा स्वतंत्र यंत्रणेद्वारे गोळा करून शास्त्री पार्क पुनर्प्रक्रिया प्रकल्पात वैज्ञानिक पद्धतीने प्रक्रिया केला जातो. या दोन वेगवेगळ्या मॉडेल्समधून एक महत्त्वाचा संदेश मिळतो, तो म्हणजे 'सी ॲण्ड डी' कचरा व्यवस्थापनासाठी एकच सार्वत्रिक उपाय असू शकत नाही. प्रत्येक शहराच्या लोकसंख्येची घनता, प्रशासनाची क्षमता आणि उपलब्ध संसाधने यानुसार वेगवेगळ्या पद्धती विकसित कराव्या लागतील. गुरुग्राम आणि फरिदाबाद यासारख्या शहरांमध्येही या दिशेने प्रयत्न सुरू आहेत; पण त्यांची प्रगती वेगवेगळ्या टप्प्यांवर आहे. गुरुग्राममध्ये दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे दीड हजार टन 'सी ॲण्ड डी' कचऱ्यापैकी ८० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया केली जाते, तर उर्वरित अंतर भरून काढण्यासाठी नवीन प्रकल्प प्रस्तावित आहेत. दुसरीकडे, फरिदाबादमध्ये जमीननिश्चिती आणि नियोजन पूर्ण झाले असले, तरी प्रत्यक्ष प्रक्रिया केंद्र अद्याप कार्यान्वित झालेले नाही. यावरून स्पष्ट होते की धोरणात्मक इच्छाशक्ती असली तरी पायाभूत क्षमता उभारणे ही वेळखाऊ आणि गुंतागुंतीची प्रक्रिया आहे.

भारत सरकारने २०२५ मध्ये जाहीर केलेले 'सी ॲण्ड डी वेस्ट मॅनेजमेंट रुल्स' या संदर्भात अत्यंत महत्त्वपूर्ण ठरतात. या नियमांमध्ये प्रथमच 'एक्सटेंड प्रोड्युसर रिस्पॉन्सिबिलिटी' (ईपीआर) म्हणजेच बांधकाम करणाऱ्यांवरच कचरा व्यवस्थापनाची जबाबदारी टाकण्यात आली आहे. २०२५-२६ मध्ये २५ टक्के पुनर्वापराचे उद्दिष्ट ठेवून २०२८-२९ पर्यंत ते शंभर टक्क्यांपर्यंत नेण्याचा निर्धार करण्यात आला आहे. एक एप्रिलपासून हे नियम लागू झाले आहेत. या धोरणात्मक बदलामागील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे कचरा निर्माण करणारा आणि त्याच्या पुनर्वापराची जबाबदारी स्वीकारणारा यांच्यातील तुटलेला संबंध पुन्हा जोडण्याचा प्रयत्न; मात्र केवळ नियम बनवून प्रश्न सुटत नाहीत. अनेकदा प्रशासनाची भूमिका 'कचरा हटवा' म्हणण्याइतपतच मर्यादित राहते. पंतप्रधान कार्यालय आणि गृहनिर्माण तसेच शहरी व्यवहार मंत्रालयाने मार्च २०२६ मध्ये दिल्लीतील एक लाख मेट्रिक टन 'सी ॲण्ड डी' कचरा हटवण्याचे अभियान राबवले; परंतु प्रक्रिया आणि पुनर्वापर यंत्रणा सक्षम नसेल, तर हा कचरा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवण्यापलीकडे फारसा फरक पडत नाही. म्हणूनच स्थानिक प्रशासनाच्या पातळीवर अधिक कठोर आणि परिणामकारक धोरणांची आवश्यकता आहे. दिल्ली महानगरपालिकेने नोव्हेंबर २०२५ मध्ये स्वतःच्या बांधकाम आणि देखभाल प्रकल्पांमध्ये पुनर्प्रक्रिया साहित्याचा वापर अनिवार्य करण्याचा निर्णय घेतला. ही बाब अत्यंत महत्त्वाची आहे, कारण पुनर्प्रक्रिया उद्योगाला सर्वांत मोठी गरज असते, ती स्थिर बाजारपेठेची.

सरकारी प्रकल्पांनीच पुनर्प्रक्रिया साहित्य स्वीकारल्यास खाजगी गुंतवणूक आणि प्रक्रिया पायाभूत सुविधा वेगाने विकसित होऊ शकतात. याचबरोबर कठोर अंमलबजावणीही आवश्यक आहे. गुरुग्राम महानगरपालिकेने २४ तास देखरेख, दंडात्मक कारवाई आणि निश्चित संकलन केंद्रांची व्यवस्था करून अनधिकृत डम्पिंगवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला आहे. चेन्नईमध्ये तर २०२६ पासून नियम मोडणाऱ्यांवर प्रति टन पाच हजार रुपयांपर्यंत दंड, वाहन जप्ती आणि 'रिअल-टाईम मॉनिटरिंग' यासारखी कठोर पावले उचलण्यात आली आहेत. हे बदल सूचित करतात, की भारतातील शहरी प्रशासन आता केवळ स्वच्छतेच्या पलीकडे जाऊन संसाधन व्यवस्थापनाच्या व्यापक चौकटीत विचार करू लागले आहे. तथापि, सर्वांत मोठे आव्हान मानसिकतेचे आहे. अनेकांना पुनर्प्रक्रिया साहित्य म्हणजे कमी दर्जाचे साहित्य अशीच धारणा आहे. त्यामुळे त्याचा वापर प्रामुख्याने भराव, लॅण्डफिल किंवा कमी मूल्याच्या कामांपुरताच मर्यादित राहतो. भारतामध्ये विकासाची व्याख्या दीर्घकाळ नव्या इमारती, रुंद रस्ते, उड्डाणपूल आणि मोठ्या पायाभूत प्रकल्पांपुरती मर्यादित राहिली; परंतु आता विकासाच्या या पारंपरिक संकल्पनेत मोठा बदल घडताना दिसत आहे. 'सर्क्युलर इकॉनॉमी' किंवा पुनर्वापराधारित अर्थव्यवस्था ही संकल्पना वेगाने केंद्रस्थानी येत आहे. विशेषतः बांधकाम आणि पाडकामातून निर्माण होणारा कचरा म्हणजेच 'सी ॲण्ड डी वेस्ट' हा केवळ टाकाऊ अवशेष नसून भविष्यातील पायाभूत विकासासाठी एक महत्त्वाचा संसाधनसाठा ठरू शकतो, ही जाणीव आता धोरणकर्त्यांना आणि उद्योगक्षेत्रालाही होऊ लागली आहे. भारतासारख्या झपाट्याने नागरीकरण होत असलेल्या देशात ही जाणीव अत्यंत महत्त्वाची आहे. काही वर्षांपूर्वीपर्यंत शहरांमधील बांधकाम कचरा प्रशासनासाठी डोकेदुखी मानली जात होती. रस्त्यांच्या कडेला, मोकळ्या भूखंडांवर, नाल्यांमध्ये किंवा शहरांच्या बाहेरील भागांमध्ये हा कचरा अनियंत्रितपणे टाकला जात असे. त्यामुळे प्रदूषण, धूळ, वाहतूक अडथळे आणि पर्यावरणीय हानी वाढत होती; परंतु आता या कचऱ्याकडे 'वेस्ट' म्हणून नव्हे, तर 'रिसोर्स' म्हणून पाहण्याची दृष्टी विकसित होत आहे. यामागे केवळ पर्यावरणीय कारणे नाहीत, तर आर्थिक आणि पायाभूत गरजाही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. नैसर्गिक खनिज संसाधने मर्यादित आहेत, बांधकाम साहित्याच्या किमती वाढत आहेत आणि शहरांमध्ये कचरा व्यवस्थापनाची समस्या गंभीर होत आहे. अशा वेळी पुनर्प्रक्रिया केलेल्या बांधकाम कचऱ्याचा वापर हा शाश्वत पर्याय ठरू शकतो.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वाचक पत्रे

### लग्नाची समस्या विक्राळ रूप धरतेय

सध्या लग्नसराई सरत आली असली तरी गुडघ्याला बाशिंग बांधून असणाऱ्या कित्येक तरुण मुलांचे लग्न जुळत नसल्याने कुटुंबापुढे एक नवा पेच उभा राहिल्यासारखा झाला आहे. त्या तुलनेने कमी असलेल्या मुलींच्या कुटुंबीयांच्या अपेक्षा वाढल्याने कित्येक सुशिक्षित तरुणांनी लग्नाच्या प्रतीक्षेत पस्तीशी ओलांडल्याचे चित्र दिसून येत आहे. मात्र, ही समस्या इतकी विक्राळ रूप धारण करेल की कुणी मुलगा आपल्या आईला जिवंत जाळेल असे वाटले नव्हते. धुळे येथे प्रदीप पाटील नावाच्या ४५ वर्षीय व्यक्तीने लग्न होत नसल्याच्या रागातून स्वतःच्या ६५ वर्षीय आईलाच कारणीभूत ठरवून तिला थीनर टाकून पेटवून दिल्याची घटना नुकतीच घडली. जन्मदात्या आईसाठी ज्या डोळ्यांतून सुखाचे थेंब गळायला हवे होते, त्या डोळ्यांत अशी खुनशी आग पाहून येणारा काळ किती भयंकर असेल, याची चाहूल या निमित्ताने लागलेली आहे.

**लीलाधर दवंडे**/८४१२८७७२२०

### मराठी भाषेबाबत उदासीनता नको

मराठीचा अभिमान हवा. कारण आपण महाराष्ट्रात राहतो. आपली मातृभाषा आहे तिच्यावर आपले प्रेम असावे. पण चित्र अगदी उलट आहे. व्यवहार करताना उदा. भाजीवाला, रिक्षावाला आधी हिंदीत बोलतात. मग आपण त्यांच्याशी मराठीत बोललो तर ते मराठीत बोलतात. बोर्डाच्या निकालात मराठीत नापास होणारे जास्त आहेत. याची कारणे खूप आहेत. महत्त्वाचे कारण आहे भाषेविषयीचे अज्ञान.

शाळेत लक्ष दिले जात नाही. सर्व स्तरांतून विद्यार्थी येतात. प्रत्येक कुटुंबात वेगळी बोलीभाषा बोलली जाते. शुद्ध भाषा शिकायचा प्रयत्नच केला जात नाही. मित्रांमध्ये मराठी सोडून इतर भाषांमध्यं बोलले जाते. संवाद नाही. शब्दसामर्थ्य नाही. बरेच शब्द माहिती नाही. आणखी एक म्हणजे कुटुंबात आपापसात बोलणे कमी झाले आहे. शेवटचे म्हणजे इंग्रजी माध्यम शाळा. पालक इंग्रजी माध्यम शाळाच निवडतात. मग मराठी दुय्यम होते. मराठीच्या तासिकांकडे लक्षच दिले जात नाही. परीक्षेच्या वेळी कशीतरी तयारी केली जाते. मग गुण कसे मिळणार? मराठी भाषेकडे लक्ष दिले पाहिजे. फक्त मराठी भाषादिनी खूप चर्चा करायची आणि नंतर विसरून जायचे. त्यामुळे मराठीविषयी उदासीनता दिसून येते. मराठी टिकवा, त्याचा अभिमान बाळगा.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

### अपघातग्रस्त कुटुंबांना आधार देणे शासनाचे कर्तव्य

जनगणनासारख्या अत्यंत महत्त्वाच्या राष्ट्रीय कर्तव्याच्या कामासाठी उन्हाच्या तीव्रतेत काम करताना राज्यात एका शिक्षिकेसह इतर चार शिक्षकांच्या विविध कारणांनी मृत्यूच्या घटना या बातम्या जीवाला चटका लावून गेल्या. राष्ट्रउभारणी हातभार, भावी पिढीच्या भविष्यातील तरतुदी अशा अनेक राष्ट्र विकास धोरणांच्या अंमलबजावणीसाठी जनगणना मोहीम देशपातळीवर राबवली जात आहे. अनेक शिक्षक, सरकारी कर्मचारी अत्यंत प्रामाणिकपणे, जबाबदारीने आपले कर्तव्य सध्या बजावीत आहेत. मानसिक, शारीरिक ताण सहन करीत पुरुष आणि महिला कर्मचारी दिवसभर जनगणना कामासाठी आपल्या कुटुंबापासून दूर अंतरावर प्रवास करीत असताना उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे, हृदयविकाराच्या झटक्यामुळे तसेच वाहनांच्या अपघातामुळे या चार शिक्षकांचा जीव जाणे म्हणजे त्या कुटुंबासाठी दुःखाचा डोंगर कोसळल्यासारखेच आहे. असह्य मानसिक, भावनिक धक्का, आर्थिक विवंचना, अस्थिरता, सामाजिक, कौटुंबिक संघर्ष, पुढे मदतीसाठी शासकीय, प्रशासकीय दिरंगाईचा त्रास, अशा अनेक कठीण परिस्थितीचा सामना या कुटुंबाला करावा लागतो. जनगणना या राष्ट्रीय कर्तव्यावर असणाऱ्या सर्वच कर्मचाऱ्यांनी स्वतःच्या आरोग्याची काळजी घ्यावी, वाहतूक सुरक्षा पाळावी. शासनाने सुद्धा दुर्दैवी घटना घडलेल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी खऱ्या अर्थाने सामाजिक आणि नैतिक कर्तव्य पार पाडावे जेणेकरून ते कुटुंब आर्थिक आणि सामाजिक पातळीवर स्थिरावू शकेल.

**नितीन कुंभार**/पिंपरी, पुणे

### चायनिज पदार्थ आरोग्यासाठी हानिकारकच

भारतीयांना चिनी गोष्टींचे पूर्वीपासूनच आकर्षण आहे. अगदी चिनी वस्तूंपासून पदार्थांपर्यंत सर्वच गोष्टी भारतीयांना आवडतात. त्यातही चायनिज पदार्थांची तर सर्वांना चटक लागलेली आहे. बाहेर जेवायला जायचे म्हटले तर बरेच जण चायनिज पदार्थांचाच बेत करतात. मात्र भारतात आणि चीनमध्ये मिळणाऱ्या पदार्थात खूप फरक आहे. भारतात चायनिज पदार्थांच्या नावाखाली जिभेला पूरक ठरतील असे चवीचे पदार्थ तयार केले जातात. रस्त्याशेजारी, फुटपाथवर, गल्लीबोळात स्वस्त आणि सहज मिळणारे गडावरील चायनिज पदार्थ खाण्याकडे सर्वांचा कल असतो. त्यातही या गाड्यांवर तरुणाईच अधिक दिसते. हॉटेल आणि रेस्टॉरेंटच्या तुलनेत येथे स्वस्तात पदार्थ मिळतात हे त्या मागचे मुख्य कारण आहे. मात्र हे पदार्थ स्वस्तात देण्यासाठी अनेक तडजोडी कराव्या लागतात. त्यात निकृष्ट भाज्या आणि तेल वापरले जाते. त्यामुळे चायनिज पदार्थांचे सेवन आरोग्यासाठी हानिकारकच आहे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या कुशल नियोजनातून भाजपचा महाप्रशिक्षण वर्ग यशस्वी संपन्न

मीरा भाईंदर (मुंबई) : रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी, मीरा भाईंदर (मुंबई) येथे भारतीय जनता पार्टी, बीड जिल्हाच्या वतीने आयोजित पंडित दीनदयाळ उपाध्याय महाप्रशिक्षण अभियानाचा जिल्हा वर्ग दि. २६ व २७ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात यशस्वीरित्या संपन्न झाला. राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वात आणि भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या प्रभावी नियोजन व संघटन कौशल्यामुळे हा वर्ग अत्यंत शिस्तबद्ध, प्रेरणादायी आणि यशस्वी ठरला.

या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गासाठी मा. ना. पंकजाताई मुंडे, खासदार प्रितमताई मुंडे, आ. नमिता मुंदडा, माजी आ. बदामराव पंडीत, प्रदेश प्रवक्ते राम कुलकर्णी गेवराई विधानसभा नेते बाळराजे पवार, राज्य परिषद सदस्य सर्जेराव तांदळे जि.प.बांधकाम सभापती युधाजीत पंडीत जि.प.समाजकल्याण सभापती संतोष हंगे बीड विधानसभा नेते डॉ. योगेश क्षिरसागर, माजलगाव विधानसभा नेते माधव निर्मळ यांची विशेष उपस्थिती लाभली होती.

प्रशिक्षण वर्गात पक्षाची विचारधारा, संघटनात्मक कार्यपद्धती, सोशल मीडिया, व्यवहारिक सत्र, केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजना, बूथ व्यवस्थापन, 'मन की बात' उपक्रम तसेच प्रभावी जनसंपर्क अशा विविध विषयांवर सखोल मार्गदर्शन करण्यात आले. विविध मान्यवर वक्त्यांनी कार्यकर्त्यांना पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन केले. यामध्ये माजी खासदार प्रितमताई मुंडे, आमदार श्रीकांत भारतीय, आमदार माधवी नाईक, आमदार संजय केळकर, बीड जिल्हा प्रभारी माजी आमदार सुनील राणे, प्रदेश सचिव प्रविण घुगे, भाजप प्रदेश प्रवक्ते नवनाथ बन, राम कुलकर्णी, विलास साठे, सूरज आव्हाड, तेजस मालवीय आदी मान्यवरांचा समावेश होता. याचवेळी बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र स्वर्गीय प्रमोदजी महाजन यांच्या पत्नी श्रीमती रेखा महाजन यांनी प्रशिक्षण वर्गास सदिच्छा भेट दिली. यावेळी बीड जिल्ह्यातील महिला कार्यकर्त्यांच्या वतीने त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. श्रीमती रेखा महाजन यांनी भाजपच्या संघटनात्मक कार्याचे कौतुक करत कार्यकर्त्यांनी समाजाशी नाळ जोडून पक्ष विचार अधिक प्रभावीपणे जनतेपर्यंत पोहोचवावा, असे मार्गदर्शन केले. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले.

मा. ना. पंकजाताई मुंडे यांनी केंद्र व राज्य शासनाच्या लोककल्याणकारी योजनांवर सखोल मार्गदर्शन करताना कार्यकर्त्यांनी शासनाच्या योजना शेवटच्या घटकापर्यंत प्रभावीपणे पोहोचवाव्यात, असे आवाहन केले. त्यांच्या प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले.

या वर्गाच्या यशस्वी आयोजनामध्ये जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी जिल्ह्यातील सर्व पदाधिकारी, मंडळ अध्यक्ष व कार्यकर्त्यांशी सातत्याने संपर्क साधून उपस्थिती सुनिश्चित केली. तसेच जिल्ह्यातील विविध पदाधिकाऱ्यांना सूत्रसंचालन, वक्त्यांचा परिचय, स्वागत, सत्राध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या देऊन प्रत्येकाला संघटनात्मक कार्याची संधी उपलब्ध करून दिली. त्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होऊन संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत झाली.

या महाप्रशिक्षण वर्गामध्ये बीड जिल्ह्यातील तब्बल १४७ कार्यकर्ते व पदाधिकारी सहभागी झाले होते. दोन दिवस चाललेल्या या वर्गामध्ये भारतीय जनता पार्टीची विचारसरणी, संघटनात्मक बांधणी, सामाजिक कार्य आणि प्रभावी जनसंपर्क याविषयी सखोल प्रशिक्षण देण्यात आले.

संघटनाला प्राधान्य देत ना.पंकजाताई व प्रितमताई दोन दिवस वर्गात उपस्थित

राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री मा. ना. पंकजाताई मुंडे आणि खासदार प्रितमताई मुंडे यांनी आपल्या अत्यंत व्यस्त राजकीय व शासकीय कार्यक्रमातून वेळ काढून या दोन दिवसीय प्रशिक्षण वर्गात संपूर्ण वेळ उपस्थित राहत कार्यकर्त्यांना मोठे बळ दिले. संघटन हेच भारतीय जनता पार्टीचे खरे सामर्थ्य असल्याचे सांगत त्यांनी प्रत्येक सत्रात उपस्थित राहून कार्यकर्त्यांशी संवाद साधला. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे आणि आत्मीयतेचे वातावरण निर्माण झाले. वरिष्ठ नेतृत्वाने संघटनात्मक बांधणीला दिलेले प्राधान्य कार्यकर्त्यांसाठी प्रेरणादायी ठरले.

*जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांनी प्रशिक्षण वर्गामध्ये प्रत्येक कार्यकर्त्याला व्यासपीठावर व वरिष्ठ नेतृत्वासमोर जाण्याची संधी उपलब्ध करून दिली. सूत्रसंचालन, स्वागत, वक्त्यांचा परिचय, सत्राध्यक्ष अशा विविध जबाबदाऱ्या देऊन त्यांनी कार्यकर्त्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण केला. त्यामुळे अनेक कार्यकर्त्यांनी जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या संघटन कौशल्याचे व सर्वसमावेशक नेतृत्वाचे विशेष अभिनंदन केले. जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख यांच्या नेतृत्वाखाली आणि नामदार पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झालेला हा प्रशिक्षण वर्ग बीड जिल्ह्यातील भाजप संघटनेला नवी ऊर्जा, दिशा आणि बळ देणारा ठरल्याची भावना उपस्थित कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

## ओंकार शुगर्सने फिरवली पाठ; ऊस बिल प्रश्नी शेतकऱ्यांची दिशाभूल

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा मुख्य आर्थिक स्रोत असलेल्या ओंकार शुगर युनिट क्र ८ पांगरीने मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊसाची देयक घोषित दरानुसार अदा करावीत या मागणीला घेत ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती लढा देत असून ओंकार कडून वारंवार आश्वासणाची बोळवण केली जात असल्याने समितीने या महिन्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार पूर्ण ऊस देयक शेतकऱ्यांच्या ख्याती वर्ग करण्यात यावी अशी मागणी निवेदनात द्वारे केली. ऊस देयक अदा न झाल्यास दि १ जून पासून साखर कारखान्यासमोर बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला.

ओंकार शुगर्स कडून मार्च अखेरीस गाळप केलेल्या ऊस देयक प्रश्नी ऊस उत्पादक शेतकरी संघर्ष समिती वेळोवेळी निवेदने, आंदोलने करत आलेली असून दि ८ मे रोजी केलेल्या बेमुदत सत्याग्रह आंदोलन प्रसंगी कारखाना प्रशासनाने दि २५ मे पर्यन्त घोषित केलेल्या २९५० रु प्रमाणे सर्व शेतकऱ्यांना ऊस देयक अदा करण्यात येतील असे लेखी अभिवचन देत १८०० रु वर्ग देखील केली.एकाच गळीत हंगामात सुरुवातीला २९५० दर पश्चात १८०० रुपये देयक दिली. मात्र मे महिना संपत आला तरी कारखाना प्रशासनाकडून घोषित केलेल्या गाळप केलेल्या ऊसाबाबत शेतकऱ्यांना घोषित दरानुसार देयक अदा करण्याबाबत चालढकल होत असल्याने परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी बुधवार दि २७ रोजी कारखान्यासमोर घोषणाबाजी करत आपल्या मागण्याचे निवेदन कारखाना प्रशासनाला देत या महिण्याखेर जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक अदा न केल्यास दि १ जून पासून बेमुदत सत्याग्रह आंदोलन करण्याचा इशारा दिला. परिसरातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांसोबत संघर्ष समितीचे ॲड. अजय बुरांडे, ॲड.श्रीनिवास मुंडे, कॉ.मुरलीधर नागरगोजे, हनुमंत सोळंके कॉ.भगवान बडे, रघुनाथ दादा देशमुख हनुमंत लोंढे, कृष्णा कराड , धोंडीबा दिवटे, अशोक शिंदे, दत्तात्रय तिडके, प्रभाकर मुंडे, मनोहर मुंडे, बिभीषण गित्ते,अविनाश मुंडे, शरद गित्ते सूर्यकांत तिडके यांच्या सह अनेक शेतकरी आंदोलक उपस्थित होते.

जिल्ह्यात ऊस गळीत हंगाम सुरू होण्यापूर्वी ३०५० रु सर्वात जास्त ओंकार शुगर्सने दर जाहीर करत पहिला हप्ता २९५० रु व दीपावली सणासाठी १०० रुपये प्रमाणे २९५० प्रमाणे सुरुवातीच्या काळातील काही शेतकऱ्यांचे ऊस बिल अदा केली. नियमानुसार गाळपानंतर पंधरा दिवसात बिल देणे अपेक्षित असताना तीन-चार महिने विलंब केल्याने दि ९ मे रोजी शेतकऱ्यांनी सत्याग्रह आंदोलन पश्चात केवळ १८०० रुपये प्रति टनाप्रमाणे देयक अदा केले. गेले उर्वरित ११५० रुपये हे दि २५ मे पर्यंत संपूर्ण गाळप झालेल्या शेतकऱ्यांना २९५० प्रमाणे पैसे देण्याचं लेखी कबूल केलं. असे असताना सुद्धा अद्याप १८०० रुपये सुद्धा संपूर्ण शेतकऱ्यांना दिले गेले नाहीत.सर्व बाबतीत ओंकार शुगर कडून शेतकऱ्यांची वारंवार दिशाभूल केली जात आहे. नियमानुसार ऊस उत्पादक शेतकऱ्यांना वेळेवर देयके अदा करावीत असे स्पस्ट आदेश असताना नियमाला हडताल पुसणाऱ्या राज्यातील ५४ साखर कारखान्यावर साखर आयुक्तांनी सुनावणी घेत कारवाई केली असताना जिल्ह्यातील साखर कारखान्याबाबत राज्यसरकार साखर आयुक्त, जिल्हा प्रशासन व लोकप्रतिनिधी मूक गिळून गप्प का असा प्रश्न शेतकऱ्यांना निर्माण झाला आहे. जाहीर केलेल्या दरानुसार ऊस देयक मिळावीत अशी ठाम भूमिका संघर्ष समितीने घेतली आहे.

## स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार सदैव प्रेरणादायी - डॉ. हेमंत वैद्य

### सावरकर महाविद्यालयात अभिवादन कार्यक्रम

बीड (प्रतिनिधी) महान देशभक्त, क्रांतिकारक स्वातंत्र्यवीर सावरकरांचे समग्र जीवन आणि साहित्य सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य यांनी केले.

येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयात सावरकरांची १४३ वी जयंती साजरी करण्यात आली. यावेळी संस्थेचे प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, केंद्रीय कार्यकारणी सदस्य उमेश जगताप,माध्यमिक विभागाचे अध्यक्ष प्रमोद कुलकर्णी, प्राथमिक विभागाचे अध्यक्ष प्रा. एन. एन. कुलकर्णी, प्राचार्य डॉ.सुहास मोराळे,उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, विकास उमापूरकर, कांतराव खडकीकर यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना डॉ. हेमंत वैद्य म्हणाले वीर सावरकरांनी समरसतेचा विचार मांडला, आपल्या साहित्यातून त्यांनी युवकांना स्वातंत्र्यलढ्यात उडी घेण्यासाठी प्रेरित केले.त्यांचे साहित्य आणि जीवन कार्य सदैव प्रेरणादायी आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात प्राचार्य सुहास मोराळे म्हणाले की स्वातंत्र्यवीर सावरकरांचे रत्नागिरी मधील सामाजिक कार्य प्रेरणादायी आहे.पतीत पावन मंदिराची उभारणी करून त्यांनी आदर्श निर्माण केला. 'स्वातंत्र्यवीर सावरकर आणि आजची स्थिती' या विषयावर बोलताना डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर म्हणाले की जयिष्णुता आणि सहिष्णुता यांचा समन्वय म्हणजे सावरकर विचार आहे. सर्व व्यापक अशी हिंदुत्वाची संकल्पना सावरकरांनी मांडली. राष्ट्र प्रथम हा संदेश आपल्या साहित्यातून दिला. त्याग समर्पणाची प्रेरणा आपल्या कृतीतून दिली.त्यांचे क्रांतिकार्य भाषाशुद्धी, लिपी सुधारणा,विज्ञानवाद हा समाजाला पुढे घेऊन जाणारा आहे.

## पेट्रोल डिझेल रॉकेल गॅस दरवाढ तात्काळ रद करा : वसंत मुंडे

मुंबई ( प्रतिनिधी ) : आर एस एस च्या विचारधारेचे भाजपचे केंद्र व राज्यातील त्रिमूर्ती सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणांमुळे पेट्रोल, डिझेल रॉकेल व घरगुती गॅसच्या दरामध्ये सातत्याने वाढ होत असून इंधन टंचाई प्रचंड वाढलेली आहे.सर्वसामान्य नागरिक, शेतकरी, कामगार, विद्यार्थी व मध्यमवर्गीय जनतेचे जीवन जगणे अत्यंत कठीण झाले आहे. महागाईमुळे जनतेमध्ये प्रचंड असंतोष निर्माण झाला आहे. अन्यायकारक दरवाढीच्या निषेधार्थत राज्यभर काँग्रेस कार्यकर्ते आंदोलन करत आहे. दरवाढ रद्द करण्याचे आदेश केंद्र व राज्य सरकारने तात्काळ काढावेत व सामान्य जनतेला न्याय द्यावा अशी मागणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे सुरेश पाटील खेडे प्रकाश जाधव कुंदा सोनवणे शरद सोनवणे इत्यादी कार्यकर्त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव यांना निवेदनाद्वारे केली आहे.

## मान्सूनपूर्व सरस्वती नदीची त्वरित सफाई करा; अश्विन मोगरकर





परळी वैजनाथ:शहरातील प्रभाग क्रमांक ५ अंतर्गत येणाऱ्या सरस्वती नदीची मान्सूनपूर्व सफाई तातडीने युद्धपातळीवर करण्यात यावी, या प्रमुख मागणीसाठी भारतीय जनता पार्टीचे शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले व यावर तात्काळ कारवाई करण्याचा आग्रह धरला.

पावसाळा अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही नदीच्या पात्रामध्ये मोठ्या प्रमाणावर कचरा आणि प्लास्टिकचे ढीग साचले आहेत. योग्य वेळी पात्राची स्वच्छता न झाल्यास परिसरातील नागरिकांना गंभीर समस्यांना तोंड द्यावे लागेल, अशी भीती या वेळी व्यक्त करण्यात आली.

सध्या सरस्वती नदीच्या पात्राला एका नाल्याचे स्वरूप आले असून, त्यात ठिकठिकाणी झाडे-झुडुपे वाढली आहेत. प्लास्टिक आणि कचरा अडकून पडल्यामुळे पाण्याचा प्रवाह पूर्णपणे खंडित झाला आहे. साचलेल्या दूषित पाण्यामुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून, डासांचा प्रादुर्भाव मोठ्या प्रमाणावर वाढला आहे. यामुळे प्रभाग क्र. ५ मधील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, डेंग्यू, मलेरिया सारखे आजार पसरण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे.

पाऊस सुरू होण्यापूर्वी ही झाडेझुडपे आणि साचलेला कचरा उपसला नाही, तर पहिल्याच मुसळधार पावसात नदीचे पाणी पात्राबाहेर पडेल. नदीकाठच्या वस्त्यांमध्ये आणि नागरिकांच्या घरात पुराचे पाणी शिरून मोठे आर्थिक नुकसान होऊ शकते. संभाव्य जीवित व वित्तहानी टाळण्यासाठी प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता तत्काळ 'जेसीबी' व स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून नदीचे पात्र मोकळे करावे अशी मागणी भाजपा शहर सरचिटणीस अश्विन मोगरकर यांनी नप मुख्याधिकारी यांना केली आहे.

## परळीतील "अधीक्षक अभियंता बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ" कार्यालयाचे परभणीला स्थलांतर

### येत्या 1 जून पासून परभणी मुख्यालयातून चालणार कामकाज



परळी वैजनाथ ( प्रतिनिधी) : गेल्या अनेक वर्षांपासून परळी वैजनाथ येथे कार्यरत असलेले 'अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ' हे महत्त्वाचे कार्यालय अखेर परभणी येथे स्थलांतरित करण्यात आले आहे. या कार्यालयाच्या स्थलांतराबाबतच्या हालचाली सुरू असल्याच्या बातम्या यापूर्वी सातत्याने प्रकाशित झाल्या होत्या. मात्र, अखेर परळीकरांना या महत्त्वाच्या कार्यालयाला मुकावे लागले आहे,

गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळाच्या अंतर्गत येणाऱ्या विविध मंडळांच्या आणि विभागीय कार्यालयांच्या मुख्यालयांमध्ये प्रशासकीय कारणास्तव मोठे फेरबदल करण्यात आले असून, १ जून २०२६ पासून नवीन ठिकाणाहून कामकाज सुरू होणार आहे. परळी वैजनाथ येथील 'अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथ' हे कार्यालय या भागातील सिंचन आणि पाटबंधारे प्रकल्पांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे केंद्र होते. हे कार्यालय येथून हलवले जाणार असल्याचे संकेत आधीच मिळाले होते आणि त्याबाबत प्रसारमाध्यमांनी आवाजही उठवला होता. परंतु, याबाबत शासनाने दाखवलेली अनास्था आणि प्रशासकीय उदासीनतेमुळे अखेर हे कार्यालय परभणी येथे हलवण्याचा अंतिम निर्णय झाला आहे.

प्रशासकीय सुसूत्रता आणि 'एक मंडळ, एक जिल्हा' या धोरणानुसार इतरही अनेक कार्यालयांमध्ये मोठे बदल करण्यात आले आहेतः मुख्य अभियंता (जसे), जलसंपदा विभाग, छ. संभाजीनगरः नवीन मुख्यालय नांदेड, अधीक्षक अभियंता, बीड पाटबंधारे प्रकल्प मंडळ, परळी वैजनाथः नवीन मुख्यालय परभणी, अधीक्षक अभियंता, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प मंडळ, नांदेडः नवीन मुख्यालय - हिंगोली, कार्यकारी अभियंता, गोदावरी पाटबंधारे विभाग, अहिल्यानगरः नवीन मुख्यालय लोणी, अहिल्यानगर, कार्यकारी अभियंता, धाराशिव लघु पाटबंधारे विभाग, धाराशिवः नवीन मुख्यालय छ. संभाजीनगर (नदीजोड प्रकल्पासाठी), कार्यकारी अभियंता, ऊर्ध्व पैनगंगा प्रकल्प (भू.ज.) विभाग, नांदेडः नवीन मुख्यालय - लोणी, अहिल्यानगर (नदीजोड प्रकल्पासाठी), उपविभागीय अभियंता, पूर्णा आधुनिकीकरण उपविभाग, हट्टा कॅम्पः नवीन मुख्यालय नाशिक (नदीजोड प्रकल्पासाठी) असा बदल करण्यात आला आहे.

दरम्यान, कार्यकारी संचालक (गो.म.पा.वि.म., छ. संभाजीनगर) यांनी दिलेल्या आदेशानुसार, सर्व संबंधित प्रभारी अधिकाऱ्यांनी ०१ जून २०२६ या नवीन सिंचन वर्ष सुरू होण्याच्या तारखेपासून आपले कामकाज नवीन निश्चित केलेल्या मुख्यालयातून सुरू करायचे आहे. कार्यालयाच्या स्थलांतराबाबतचा आवश्यक तो पूर्तता अहवाल तात्काळ महामंडळ कार्यालयास सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

## देशमुख गल्ली – फुले चौक – होळकर चौक परिसरात नवीन पाईपलाईन कामास सुरुवात

### शहरातील नवीन पाईपलाईनचे अनेक कामे लवकरच सुरू करणार : वैजनाथ सोळंके

**परळी वैजनाथ** | प्रतिनिधी...

शहरातील जुन्या गाव भागातील देशमुख गल्ली, फुले चौक, होळकर चौक, बाबारामदेव मंदिर लाइन परिसरातील नागरिकांना अनेक वर्षांपासून नळाच्या पाण्याच्या कमी दाबाच्या समस्येला सामोरे जावे लागत होते. जुन्या पाईपलाईनवर अवलंबून असलेल्या या भागात नियमित आणि पुरेशा दाबाने पाणीपुरवठा होत नसल्याने नागरिकांना पाणीटंचाईचा झळा सोसाव्या लागत. अखेर या समस्येची दखल घेत नगरपालिकेच्या वतीने माजी मंत्री आ. धनंजयजी मुंडे, नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, पाणी पुरवठा सभापती जयश्री रविंद्र गित्ते यांनी उखळवेस येथील नवीन पाण्याच्या टाकीवरून नवीन पाईपलाईन टाकण्याच्या कामास सुरुवात करण्यास आदेशित केल्या बद्दल त्यांचे आभार तसेच कालरात्री देवी मंदिर रोहन नगर, प्रबुद्ध नगर या परिसरातही लवकरच पाईप लाईन टाकण्यात येईल अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसचे नगरपालिकेचे गटनेते तथा प्रभाग क्रमांक पाचचे नगरसेवक वैजनाथ सोळंके यांनी दिली.

याबाबत सविस्तर माहिती अशी की, या परिसरात आतापर्यंत नगरपालिकेच्या मेरुगिरी डोंगराजवळील नगरपरिषदेच्या जुन्या साठवण टाकीवरून पाणीपुरवठा केला जात होता. मात्र अनेक वर्षानंतर जुनी पाईपलाईन कालबाह्य झाल्याने आणि अनेक ठिकाणी गळती होत असल्याने नागरिकांना नळाचे पाणी मिळत नव्हते. तसेच कालरात्री देवी मंदिर परिसर,रोहन नगर, प्रबुद्ध नगर, या परिसरात नवीन वस्ती असल्याने नळाची पाईप लाईन नाही विशेषतः उन्हाळ्यात या समस्येची तीव्रता अधिक जाणवत असल्याने. नागरिकांकडून वारंवारनळाचे पाणी मिळावे ही मागणी होत असल्याने



अखेर नवीन पाईपलाईन योजनेला मंजुरी देण्यात आली.

नगरपालिकेच्या वतीने प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्यात आली असून उखळवेस भागातील नवीन टाकीवरून या परिसराला पाणीपुरवठा केला जाणार आहे. नवीन पाईपलाईनमुळे पाण्याचा दाब वाढून नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होण्यास मदत मिळणार आहे. तसेच भविष्यातील वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन ही योजना महत्त्वाची ठरणार असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. नगरपालिकेचे गटनेते तथा या भागाचे नगरसेवक वैजनाथ सोळंके यांनी परिसरातील नागरिकांना सहकार्य करण्याचे आवाहन केले असून हे काम लवकरात लवकर पूर्ण करून नागरिकांना दिलासा देण्याचा प्रयत्न असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नवीन पाईपलाईनमुळे परिसरातील अनेक वर्षांची पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात सुटण्याची अपेक्षा स्थानिक नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## अंबाजोगाई येथील घरफोडी करणाऱ्या सराईत आरोपीस स्थानिक गुन्हे शाखेने ठोकल्या बेड्या



अंबाजोगाई : अंबाजोगाई शहरातील घरफोडी प्रकरणाचा स्थानिक गुन्हे शाखा व अंबाजोगाई शहर पोलिसांनी अवघ्या काही दिवसांत छडा लावत सराईत आरोपीस अटक केली असून, चोरीस गेलेल्या सोन्याच्या दागिन्यांपैकी सुमारे दीड लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरातील नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत आहे.

पोलीस ठाणे अंबाजोगाई शहर हद्दीत दि. १३ मे २०२६ रोजी सकाळी ४ वाजल्यापासून ते दि. १८ मे २०२६ रोजी रात्री ९ वाजेच्या दरम्यान अज्ञात चोरट्यांनी प्रभाकर रघुनाथ मुंडे, रा.अंबाजोगाई यांच्या बंद घराचे कुलूप तोडून घरात प्रवेश केला होता. चोरट्यांनी घरातील सोन्याचे दागिने लंपास केले होते. याप्रकरणी दि. १९ मे २०२६ रोजी अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपीविरुद्ध गुन्हा ...

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# वैद्यकीय महाविद्यालयातील एमआरआय सेंटर चालकास ताकीद

## रूग्णाच्या तक्रारीची जिल्हाधिकाऱ्यांकडून तत्परतेने दखल



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ मे**

हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील एमआरआय विभागात रुग्णांची आर्थिक लूट होत असल्याच्या तक्रारीनंतर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी २९ मे शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक घेत सेंटर चालकाला चांगलेच फटकारले. रुग्णांची लुट झाल्यास गंभीर परिणाम होतील असा सज्जड दम त्यांनी दिला. त्यानंतर सेंटर चालकाच्या वरिष्ठांनी माफी मागितल्यानंतर वादावर पडदा पडला.

हिंगोली शहरातील तिरुपती नगर भागातील रहिवासी वसंत यांनी त्यांची पत्नी सुवर्णा वाघ यांना २७ मे बुधवारी एमआरआय करण्यासाठी शासकीय रुग्णालयात आणले होते. यावेळी वसंत वाघ यांनी सकाळी ९:३० वाजता एमआरआय कक्षात विचारणा केली असता, त्यांना प्रथम १७०० रुपये भरण्यास सांगण्यात आले. त्यानंतर पुन्हा २१५० रुपयांची मागणी केली तर तिसऱ्यावेळी ६४०० रुपये लागतील असे सांगितले. त्यानुसार त्यांच्याकडून सदर रक्कमही घेण्यात आली. या प्रकारानंतर वसंत वाघ यांनी वैद्यकीय रुग्णालय प्रशासनाकडे निवेदन देऊन रुग्णांची आर्थिक लुट होत असल्याचा आरोप केला.

सदर प्रकरण जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी गांभीर्याने घेऊन या प्रकरणात २९ मे बुधवार रोजी तातडीने बैठक घेतली. यावेळी तक्रारदार वाघ यांच्यासह रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. चक्रधर मुंगल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नितीन तडस तसेच एमआरआय सेंटरच्या कृष्णा डायग्नोस्टीकचे राज्याचे अधिकारी उपस्थित होते. यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सर्व परिस्थिती जाणून घेतली. त्यानंतर तक्रारदार वसंत वाघ, अधिष्ठाता डॉ. मुंगल यांच्याकडे विचारणा केली. त्यानंतर कृष्णा डायग्नोस्टीकच्या अधिकाऱ्यांचे म्हणणे ऐकून घेतले. यावेळी त्यांनी सेंटर चालकाला चांगलेच फटकारले.

शासकिय वैद्यकिय महाविद्यालयात एमआरआयसाठी आलेल्या रुग्णांची गैरसोय व आर्थिक लुट होता कामा नये. यापुढे असे प्रकार होऊ नये याची दक्षता घ्यावी अन्यथा त्याचे गंभीर परिणाम भोगावे लागतील अशा शब्दात त्यांनी सज्जड दम दिला. त्यानंतर सेंटर चालकांनी माफी मागितली. यानंतर असे प्रकार होणार नाही असे सांगितले. त्यानंतर या वादावर पडदा पडला आहे.

# डिझेल अभावी रूग्णवाहीका न मिळाल्याने बाळ दगावले

## गर्भवती महिलेच्या नातेवाईकांचा आरोप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ मे**

औंढा नागनाथ तालुक्यातील नालेगाव येथील गरोदर महिलेस वेळेवर रूग्णवाहीका मिळाली नसल्याने खाजगी रूग्णवाहीकेद्वारे हिंगोलीच्या वैद्यकीय महाविद्यालयात आणले मा९ येथे सिझेरियन शस्त्रक्रियेनंतर बाळ दगावल्याचा आरोप महिलेच्या नातेवाईकांनी केला तर दुसरीकडे डिझेल होते पण चालक नसल्याने अडचण झाल्याचा दावा आरोग्य प्रशासानाने केला आहे.

नालेगाव येथील महिला मनिषा इंगळे ह्या दुसऱ्यांदा गरोदर होत्या. सात महिने झाले असतांना त्यांना अचानक पोटात त्रास होऊ लागला होता. त्यामुळे मंगळवारी दि मे रोजी त्यांना नालेगाव ते जवळाबाजार या पाच किमी अंतरापर्यंत दुचाकीवर आणण्यात आले. त्यानंतर जवळाबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल करण्यात आले. वैद्यकी अधिकारी डॉ. पुरजळकर यांनी महिलेची तपासणी केल्यानंतर त्यांना पुढील उपचारासाठी हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलविण्याचा सल्ला दिला. त्यानुसार त्यांच्या नातेवाईकांनी तातडीने १०२ क्रमांकावर संपर्क साधून रूग्णवाहीकेची मागणी केली. मात्र त्यांना डिझेल नसल्याचे सांगण्यात आले. तर १०८ क्रमांकावरूनही तातडीने प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे महिलेस खाजगी रूग्णवाहीकेद्वारे हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आल्याचे नातेवाईकांनी सांगितले.

हिंगोलीच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात तपाणी केल्यानंतर मनिषा यांच्या गर्भाशयात प्रमाणपेखा जास्त पाणी असल्याने तातडीने सिझेरियन शस्त्रक्रिया करण्यात आली. मात्र यामध्ये बाळ दगावले. केवळ डिझेल अभावी वेळेवर रूग्णवाहीका न मिळाल्याने बाळ दगावल्याचा दावा नातेवाईकांनी केला आहे.

दुसरीकडे तालुका आरोग्य अधिकारी डॉ चव्हाण यांनी सांगितले की, डिझेल होते परंतु चालक नव्हता मात्र १०८ रूग्णवाहीका पोहोचण्यातच होती. त्यापूर्वीच त्यांनी खाजगी रूग्णवाहीकेद्वारे महिलेस हिंगोलीला नेले. याशिवाय महिलेच्या गर्भाशयात प्रमाणापेक्षा जास्त पाणी झाले होते. बाळाला व्यंग असल्यानंतर असा हा प्रकार होतो. त्यामुळेच बाळाचा मृत्यू झाला आहे. याप्रकरणी वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी होणारच आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ कैलाश शेळके यांनी सांगितले की, या प्रकरणात बाल मृत्यूची चौकशी केली जाईल. तसेच जवळाबाजार येथे आरोग्य पथक पाठवून चौकशी केली जाणार असून सविस्तर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सादर केला जाणार आहे. चौकशीनंतर दोषींवर कारवाई होणार आहे.

# पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्यावतीने खा श्रीकांत शिंदेंचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ मे**

संसदरत्न खा.डॉ.शीकांत शिंदे व राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आंबिटकर यांचा सत्कार पत्रकार वेल्फेअर सोसायटी हिंगोलीच्या वतीने करण्यात आला. यावेळी सोसायटीच्या वतीने पत्रकारांच्या कुटूंबियांचा विमा, निःशुल्क संपुर्ण आरोग्य तपासणी शिबिर आदी विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले. यावेळी खा.डॉ. शिंदे यांनी लागलीच तातडीने निवेदनातील मागण्याची अंमलबजावणी करित येत्या ऑगस्ट महिन्यामध्ये संपुर्ण आरोग्य तपासणी व कुटूंबियांचा विमा या संदर्भात शिबिर घेण्याचे आदेशीत केले.

गुरुवार दि.२८ मे रोजी महावीर भवन येथे पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्या पदाधिकारी व सदस्यांनी खा.डॉ.शीकांत शिंदे व राज्याचे आरोग्य मंत्री प्रकाश आंबिटकर यांची भेट घेऊन निवेदन दिले. त्या अगोदर खा.डॉ.शिंदे यांना छत्रपती शिवरायांचा पुतळा स्नेह भेट देऊन हिंगोलीत सन्मान करण्यात आला. यावेळी आ.संतोष बांगर, आ.बाबुराव कदम कोहळीकर, शिवसेना गटनेते श्रीराम बांगर, आनंदराव जाधव, माजी मंत्री डॉ.जयप्रकाश मुंदडा, माजी आ.भाऊराव पाटील गोरेगावकर, युवा जिल्हा प्रमुख राम कदम, राजु चापके यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

खा.डॉ.शीकांत शिंदे यांना पत्रकार वेल्फअर सोसायटीच्या वतीने जिल्हयातील पत्रकारांच्या कुटूंबियांकरिता विमा पॉलिसी काढण्यात यावी, समवेत निःशुल्क संपुर्ण आरोग्य तपासणी करण्यात यावी, शासनाकडून पत्रकारांच्या गृहसंकुलाकरिता शासकीय पातळीवर मदत मिळावी यासाठी निवदेनाद्वारे विनंती करण्यात आली. खा.डॉ.शिंदे यांनी तातडीने निवेदनाची दखल घेत मुंबई येथील कार्यालयास निवेदनातील मागण्याची अंमलबजावणी करण्याविषयी आदेशीत केले. अवघ्या दहा मिनिटात शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाचे मंगेश चिवटे यांनी संपर्क करुन येत्या ऑगस्टमध्ये आरोग्य तपासणी शिबिर घेण्यासाठी दुजोरा दिला. सत्कार प्रसंगी पत्रकार वेल्फअर सोसायटीचे अध्यक्ष कल्याण देशमुख, सचिव सुनिल पाठक, कोषाध्यक्ष विजय गुंडेकर, उपाध्यक्ष सुधाकर वाढवे, संचालक प्रकाश इंगोले, गजानन मगर, रवि शिखरे यांच्यासह राजेंद्र हलवाई, शंशाक रामेश्वरे, गोपाल सरनायक, प्रशांत गुप्ता, विशाल शितळे, गजानन पाटील, दिलीप हळदे यांच्यासह पत्रकार सदस्य मोठया संख्येने उपस्थित होते.



हिंगोली– येथील पत्रकार वेल्फेअर सोसायटीच्यावतीने शिवसेनेचे खा श्रीकांत शिंदे व मंत्री आबिटकर यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अध्यक्ष कल्याण देशमुख, सचिव सुनील पाठक, कोषाध्यक्ष विजय गुंडेकर, प्रकाश इंगोले, सुधाकर वाढवे, राजेंद्र हलवाई आदींची उपस्थिती होती. छाया– सुनील पाठक

## संक्षिप्त वृत्त

### वि दा सावरकर जयंतीनिमित्त अभिवादन



हिंगोली–येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी नायब तहसीलदार सी. आर. गोळेगावकर यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

### येडूद येथील अतिक्रमण काढण्याची मागणी



हिंगोली–औंढा नागनाथ तालुक्यातील येडूद येथील सरकारी गायरान गट क्रमांक २७२ मधील अतिक्रमण तात्काळ काढून टाका या संदर्भात ग्रामस्थांनी तहसील कार्यालयात वेळोवेळी निवेदन दिले असले तरीही अद्याप अतिक्रमण काढण्यात आलेले नाही. त्यामुळे शुक्रवार दि २९ रोजी येडूद येथील ग्रामस्थांनी तहसीलदार हरीश गाडे यांची भेट घेऊन तात्काळ गावातील अतिक्रमण काढा अशी मागणी केली आहे. मौजे येडुद गावालगत गट क्र.२७२ मधील क्षेत्र ०० हे ८० आर एवढी गायरान जमीन असुन त्यामध्ये आमच्या गावातील व्यक्तींनी २ ते ३ गुंठ्यामध्ये दगडीपौळ टाकुन अतीक्रमण केले. तसेच पत्राचे शेड करुन पिठाची गिरणी टाकली. पानपट्टी टाकुन अतीक्रमण केले आहे. सदर गायरान जमीनीवर कायम स्वरुपी व पक्के स्वरुपाचे बांधकाम करण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे सदरील अतीक्रमण तात्काळ काढा अन्यथा ग्रामस्थांना उपोषण करावे लागेल असा इशारा देखील ग्रामस्थांनी निवेदनाद्वारे दिला आहे. यावेळी संदीप घुगे, कैलास घुगे, संजय घुगे, मदन घुगे, कैलास काशिनाथ घुगे, विनोद घुगे, संतोष घुगे, जगन घुगे,बालाजी घुगे यांच्यासह ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

### १७३ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली– अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १७३ वाहनचालकांवर पोलिसांनी कारवाई करीत १ लाख ७८ हजार ५५० दंड वसूल केला आहे.

# वसमतमधील नुसरतपूर सिराज कॉलनीत जलजीवन मिशनचा फज्जा

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २९ मे**

नसरतपूर येथील सिराज कॉलनीमध्ये २०२२ साली केंद्र शासनाच्या 'जल जीवन मिशन' अंतर्गत लाखो रुपये खर्च करून पाईपलाईन टाकण्यात आली होती. घराघरांत नळजोडण्या देण्यात आल्या, मोठमोठे दावे करण्यात आले; मात्र धक्कादायक बाब म्हणजे आजपर्यंत नळांना पाण्याचा एक थेंबही आला नसल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

तीन वर्षांपूर्वी करण्यात आलेल्या या कामावर मोठा निधी खर्च झाला, पण प्रत्यक्षात नागरिक अजूनही पाण्यासाठी त्रस्त आहेत. अनेक ठिकाणी नळ बसवून काम पूर्ण दाखवण्यात आले, मात्र प्रत्यक्ष पाणीपुरवठाच सुरू झाला नाही. त्यामुळे जलजीवन मिशनच्या कामाच्या गुणवत्तेवर आणि नियोजनावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दरम्यान, सिराज कॉलनीमध्ये नगरपरिषदेकडून पुन्हा नवीन पाईपलाईन टाकण्याचे काम सुरू करण्यात आले आहे असल्याचे बोलले जात आहे. मात्र नागरिकांमध्ये एकच चर्चा सुरू आहे नवीन पाईपलाईन करून खरोखर नळाला पाणी येणार का? की जलजीवन मिशनप्रमाणे हे नळही पुन्हा कोरडेच राहणार? स्थानिकांच्या मते, आधीच्या योजनेचे अपयश लपवण्यासाठीच आता नवीन काम सुरू करण्यात येत आहे. जर २०२२ मध्ये झालेले काम योग्य होते, तर पुन्हा नवीन पाईपलाईनची गरज का पडली? जुने काम निकृष्ट होते, तर त्याची चौकशी व जबाबदारावर कारवाइ का होत नाही? असे सवाल नागरिक उपस्थित करत आहेत.

नागरिकांनी असा आरोपही केला की, योजनांच्या नावाखाली लाखो रुपयांची कामे दाखवली जातात; मात्र प्रत्यक्षात सामान्य नागरिकांना पाणी मिळत नाही. त्यामुळे पाईपलाईनपेक्षा प्रत्यक्ष पाणीपुरवठा महत्त्वाचा अशी भावना नागरिकांमध्ये तीव्र होताना दिसत आहे.

या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जलजीवन मिशनअंतर्गत झालेल्या खर्चाचे ऑडिट करावे, दोषींवर कारवाई करावी आणि सिराज कॉलनीतील नागरिकांना नियमित पाणीपुरवठा सुरू करावा, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# डिझेलसोबत पेट्रोलची लिंकींग, पेट्रोलपंप चालकांची तक्रार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ मे**

हिंगोली जिल्ह्यात काही पेट्रोलपंपावर डिझेल देण्यासाठी कंपनीकडून पेट्रोलची लिंकींग केल्या जात असल्याची तक्रार दि २९ मे रोजी पेट्रोलपंप चालकांनी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेकडे केली. जिल्ह्यात अत्यावश्यक सेवेसाठी तातडीने डिझेल उपलब्ध करून देण्याच्या सुचना जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

औंढा नागनाथ तालुक्यातील नालेगाव येथील गरोदर महिलेला वेळेवर रूग्णवाहीका मिळाली नाही. केवळ इंधन नसल्याने रूग्णवाहीका मिळाली नसल्याने त्यांच्यावर वेळेवर उपचार झाले नाही. त्यामुळे बाळ दगावल्याचा आरोप नातेवाईकांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्ह्यातील पेट्रोल पंप चालकांची बैठक घेतली. यावेळी जिल्हापुरवठा अधिकारी अप्पासाहेब पाटील, पेट्रोल पंप चालक सुमीत चौधरी, कैलास बांगर, ललीत खुराणा, अजिंक्य देशपांडे, राहुल नाईक, अनिल वर्मा यांच्यासह जिल्ह्यातील पेट्रोल पंप चालक उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी पेट्रोल पंप चालकांच्या अडचणी जाणून घेतल्या. खरीप हंगाम पूर्व काम अंतिम टप्प्यात आहेत. त्यानंतर पेरणीला सुरूवात होईल त्यासाठी ट्रॅक्टर चालकांना पेरणी व इतर कामांसाठी इंधन उपलब्ध करून देण्याच्या सूचना गुप्ता यांनी दिल्या. रूग्णालयांसह विकास कामे प्रामुख्याने रस्ते व पूलाच्या कामाचा समावेश आहे. सदर कामे पावसाळ्यापूर्वी होणे आवश्यक आहेत त्यासाठी कंत्राटदारांनी त्यांच्या कामाबाबत आवश्यक कागदपत्रे दाखविल्यानंतर त्यांना तातडीने इंधन द्यावा. यावेळी कपंनीकडून डिझेलचा आवश्यक पुरवठा होत नसल्याची तक्रार पेट्रोलपंप चालकांनी केली. यासंदर्भात कंपनीच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करण्याचे आश्वासन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

# रूग्णांच्या नातेवाईकांसाठी सलग १५ वर्षापासून अविरत सुरू आहे अन्नछत्र सेवा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २९ मे**

तहानलेल्यांना पाणी आणि गरजवंतांना कपडे या संत शिरोमणी साईबाबांच्या पवित्र शिकवणीचा वारसा जपत, हिंगोली शहरातील जिल्हा सामान्य रुणालय परिसरात 'अक्षय साईपात्र अन्नछत्र सेवा' मागील १५ वर्षांपासून एकही दिवस खंड पडू न देता अविरतपणे सुरू आहे. जात, पात, धर्म यापलीकडे जाऊन 'सर्वधर्मसमभाव' जपणाऱ्या या अन्नछत्राने हजारो गरीब रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना मोठा आधार दिला आहे. या सेवायज्ञात अधिक मासाचे औचित्य साधून शहरातील नामांकित उद्योजक जगजितराज खुराणा आणि अजिंक्य नागरे यांनी सलग ३३ दिवस दररोज एका विशेष खाद्यपदार्थाचे वाटप करून रुग्णांची व त्यांच्या नातेवाईकांची क्षुधा भागवली. त्यांच्या या अनोख्या सत्कर्माने हिंगोलीच्या दातृत्व परंपरेत मानाचा तुरा रोवला आहे.



दानशूर दात्यांच्या बळावर 'अक्षय' सेवा

साई माऊली मंदिर (रिसाला बाजार) यांच्या वतीने जिल्हा रुग्णालय परिसरात हे अन्नछत्र चालवले जाते. शासकीय रुग्णालयात संपूर्ण जिल्ह्यातून अत्यंत गरीब आणि गरजू रुग्ण उपचारासाठी येतात. अनेकदा रुग्णांच्या सोबतीला आलेल्या नातेवाईकांना पैशांभावी उपाशी राहण्याची वेळ येते. अशा वेळी 'अक्षय साईपात्र' त्यांच्यासाठी अन्नदात्याच्या भूमिकेत उभे राहते. हे केवळ शहरातील आणि जिल्ह्यातील संवेदनशील, दानशूर व्यक्तींच्या आर्थिक आणि मानसिक सहकार्यामुळेच शक्य झाले आहे. दिल्याने कधीही कमी होत नाही, उलट त्याचा परतावा म्हणून ईश्वरी शक्ती आपल्या आयुष्यात सुख, शांती आणि समृद्धी देते, हा विश्वास या संस्थेने आपल्या पारदर्शक कार्यातून निर्माण केला आहे. दानाचा कोणताही दुरुपयोग न करता, प्रत्यक्ष भुकेलेल्याच्या मुखात घास जावा यासाठी संस्था अहोरात्र झटत असून, संपूर्ण हिंगोलीकर याचे प्रत्यक्ष साक्षीदार आहेत.

अधिक मासात ३३ दिवस अनोखा उपक्रम

हिंदू धर्मात अधिक मासाला (धोंड्याचा महिना) विशेष धार्मिक आणि आध्यात्मिक महत्त्व आहे. या पवित्र महिन्याचे निमित्त साधून शहरातील प्रसिद्ध उद्योजक जगजितराज खुराणा आणि अजिंक्य नागरे यांनी सामाजिक बांधिलकीचे एक वेगळेच उदाहरण प्रशासनासमोर आणि समाजासमोर ठेवले. त्यांनी अधिक मासाच्या संपूर्ण ३३ दिवसांत अन्नछत्राला भेट देऊन, दररोज एका वेगवेगळ्या चवदार खाद्यपदार्थाचे नियोजन केले. स्वतः उपस्थित राहून त्यांनी रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांना या पदार्थांचे आपुलकीने वाटप केले. त्यांच्या या उपक्रमामुळे रुग्णालयातील वातावरणात एक वेगळाच आनंद पाहायला मिळाला.

अमुल्य क्षण सत्कर्माने साजरे करण्याचे आवाहन

आपल्या जीवनातील अविस्मरणीय क्षण जसे की– जन्मदिवस, लग्नाचा वाढदिवस, किंवा प्रियजनांची जयंती व पुण्यतिथी, हे हॉटेलमध्ये किंवा इतरत्र वायफळ खर्च करून साजरे करण्याऐवजी, अशा पवित्र अन्नछत्रात येऊन स्वहस्ते अन्नदान करून साजरे करावेत, असे आवाहन अन्नछत्र सेवा समितीच्या वतीने करण्यात आले आहे. यामुळे मनाला मिळणारे समाधान अतुलनीय असते.

उद्योजक जगजितराज खुराणा आणि अजिंक्य नागरे यांनी दाखवलेल्या या संवेदनशीलतेचे संपूर्ण हिंगोली शहरात कौतुक होत असून, भविष्यातही दानशूरांनी आपल्या आशीर्वादाचे आणि सहकार्याचे छत्र या अन्नछत्रावर असेच अबाधित ठेवावे, अशी अपेक्षा संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली आहे.

# इंधन दरवाढ विरोधात काँग्रेसचे निषेध आंदोलन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मे -**

मागील पंधरा दिवसात पेट्रोल डिजेलच्या किंमत मध्ये जवळपास आठ ते दहा रुपयांची दरवाढ झाली असून इंधन टंचाई देखील मोठ्या प्रमाणात निर्माण झाल्याच्या निषेधार्थ दक्षिण जिल्हाध्यक्ष तथा खा. रवींद्र चव्हाण यांच्या सूचनेनुसार काँग्रेस जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफार यांच्या नेतृत्वात शहर व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शहरातील महात्मा फुले व सावित्रीबाई फुले स्मारक आयटीआय ते नजिकच्या पेट्रोल पंप परिसरात शुक्रवार (ता. २९) रोजी जोरदार निषेध आंदोलन करण्यात आले. नवनिर्वाचित जिल्हाध्यक्ष व महानगराध्यक्ष यांच्या नेतृत्वातील पहिल्याच आंदोलनात कार्यकर्त्यांमध्ये मोठे नवचैतन्य दिसून आले.


छायाचित्र नरेंद्र गड्डप्पा

पेट्रोल डिजेल दरवाढीच्या निषेधार्थ प्रारंभी आयटीआय चौकात केंद्र सरकारचा निषेध करत जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. दरम्यान महिलांनी चुलीवर भाकरी थापून गॅस टंचाई विरोधात रस्त्यावर प्रतिकात्मक आंदोलन केले. बैलगाडीवर दुचाकी ठेवून नजिकच्या पेट्रोल पंपावर इंधन भरण्यासाठी जाऊन आंदोलन केले यादरम्यान पंपावर मेलीडी चॉकलेट वाटप करण्यात आले. यावेळी जिल्हाध्यक्ष डॉ. विठ्ठल पावडे, महानगराध्यक्ष अब्दुल गफार, माजी आ. इश्वरराव भोसिकर, सुरेशदादा गायकवाड, सुरेंद्र घोडसकर, एकनाथ मोरे, डॉ. रेखाताई चव्हाण, तिरुपती कोंडेकर, बालाजी गाढे, मुन्ना अब्बास, भगवान मनुरकर, श्रीनिवास मोरे, शिवाजी पाटील पाचपिंपलीकर, सत्यपाल सावंत, सुरेश हटकर, आनंद कल्याणकर, चांदोजी सूर्यवंशी, अनिल कदम, कुमार कुर्तडीकर, गणेश ढगे, अतुल पेदेवाड, शंकर शिंदे, जसपालसिंग तबेलेवाले, सरदार बीटूसिंग, रामराम पाटील, संजय वाघमारे, बापूसाहेब पाटील, मधुकर सोनटक्के, मुकेश पटणे, तोलबाजी जानकवाडे, सुरज पाटील शिंदे, दीपकसिंग हुजुरीया, गगन यादव, आंबादास रातोळे, निरंजन पावडे, रियाज शेख, विजय सोंडारे, सत्यजित बिराजदार, विलास पावडे, नसीम पठाण, ललिता कुंभार, ज्योती कदम, सुरेखा वैद्य, शितल जोंधळे, सोनु पाटील, शामराव मनाठकर, मुरलीधर कल्याणकर, गंगाधर आडेराव, कलीम शेख, नईम शेख, रिजवान पटेल, गौतम शिरसाट, नागराज सुलगेकर, रमेश चित्ते, शिवसंभो स्वामी, ज्ञानेश्वर राजेगोरे, मधुकर दिघे, माणिक चव्हाण, गोविंद पाटील, प्रकाश दिपके, एस पी कुंभारे, गणेश कोकाटे, विष्णू पावडे, नईम शेख, अझर शेख, सचिन कानोडे, धनंजय उमरीकर, सय्यद वासे, अझर शेख आदीसह इतर पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**उत्पादन शुल्क कमी करुन दरवाढ आटोक्यात आणावी**

गेल्या बारा वर्षात केंद्र सरकारने पेट्रोलियम उत्पादनांवरील कर व उत्पादन शुल्काच्या माध्यमातून जनतेच्या खिशातून ४३ लाख कोटी रुपयांचा नफा कमावला आहे. ही नफेखोरी जनतेच्या खिशावर दरोडा टाकून केली आहे. त्यामुळे आता कर व उत्पादन शुल्क कमी करुन दरवाढ आटोक्यात आणावी अशी मागणी उत्तर जिल्हाध्यक्ष विठ्ठल पावडे व महानगराध्यक्ष अब्दुल गफार यांनी केली.

## सर्वसामान्य कार्यकर्ता हाच शिवसेनेचा कणा : खा. श्रीकांत शिंदे




**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. २९ मे -**

आगामी होऊ घातलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवसेनेने ग्रामीण भागात संघटन मजबुतीचा नारळ फोडला असून, हदगाव येथे झालेल्या तीन विधानसभा मतदारसंघांच्या संयुक्त कार्यकर्ता आढावा मेळाव्यात सेनेने थेट विरोधकांना राजकीय इशारा दिला. आगामी निवडणुकांत जिल्हा परिषदांवर भगवा फडकवल्याशिवाय कार्यकर्त्यांनी स्वस्थ बसू नये, असा दमदार संदेश संसदीय गटनेते खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी दिला.

हदगाव, किनवट आणि भोकर या तीन मतदारसंघांतील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत झालेला हा मेळावा म्हणजे आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकांचे रणशिंग मानले जात आहे. राज्यभर पक्षबांधणी वेगाने सुरू असून शाखाप्रमुखांपासून सर्व पदाधिकाऱ्यांनी गावागावांत संघटन मजबूत करण्याचे आदेशच डॉ. शिंदे यांनी दिले

हा पक्ष सर्वसामान्यांना न्याय देणारा पक्ष आहे. राज्यसभा निवडणुकीत सर्वसामान्य कुटुंबातील डॉ. ज्योतीताई वाघमारे यांना संधी देत पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी कार्यकर्त्यांचा सन्मान काय असतो हे दाखवून दिले, असे सांगत डॉ. शिंदे यांनी पक्षासाठी झटणाऱ्या प्रत्येक सैनिकामागे शिवसेना भक्कमपणे उभी राहील, अशी ग्वाही दिली.

त्याचवेळी मतदार याद्यांमधून सेनेच्या मतदारांची नावे गहाळ होऊ नयेत यासाठी बीएलए पदाधिकाऱ्यांनी गावपातळीवर सक्रिय राहण्याचे निर्देशही त्यांनी दिले. निवडणूक फक्त सभांवर जिंकत नाही; मतदार यादीपासून बूथपर्यंत काम करणारा कार्यकर्ता विजय मिळवतो, असा राजकीय मंत्रही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.मेळाव्यातील सर्वाधिक चर्चेचा मुद्दा ठरला तो म्हणजे किनवट विधानसभा मतदारसंघाच्या नव्या जबाबदारीची घोषणा. हदगाव-हिमायतनगरमध्ये आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी केलेले संघटनात्मक काम, कार्यकर्त्यांशी असलेली नाळ आणि पक्षनिष्ठा लक्षात घेता आता किनवट मतदारसंघाची जबाबदारीही त्यांच्याकडे सोपवण्यात येत आहे, अशी घोषणा डॉ. श्रीकांत शिंदे यांनी करताच सभागृह घोषणांनी दणाणून गेले.यावेळी आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी भावनिक भाषण करत विरोधकांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. लोकसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतरही माझ्यावर विश्वास ठेवून उमेदवारी देणारे एकनाथ शिंदे हेच खरे कार्यकर्त्यांचे नेते आहेत. शेतकऱ्याच्या घरातील मुलगा आज आमदार म्हणून उभा आहे, ते केवळ त्यांच्या विश्वासामुळे, असे सांगताना कोहळीकर भावूक झाले.

कार्यकर्ते आर्थिकदृष्ट्या सक्षम व्हावेत म्हणून माझ्याकडे येणारा निधीही मी त्यांच्या कामासाठी वापरत आहे, असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांशी असलेले नाते अधोरेखित केले.

या वेळी मंत्री प्रकाश आबिटकर, माजी. खा.सुभाष वानखेडे, आमदार हेमंत पाटील, संपर्कप्रमुख आनंद जाधव,जिल्हाप्रमुख विवेक देशमुख, सह संपर्कप्रमुख सांभराव लांडगे, गटनेते गोपाल सारडा, माजी जिल्हा परिषद सदस्य अनिल पाटील बाभळीकर, गंगाधर पाटील चाभरेकर, युवा नेते भास्करदादा वानखेडे, माजी शहर प्रमुख प्रताप सोळंके, शहर प्रमुख बबन माळोदे, माजी उपशहर प्रमुख अतुल राऊतराव, आमदार कोहळीकर यांचे खाजगी सचिव बबन कदम यांच्यासह महिला पदाधिकारी व युवा सेना पदाधिकारी यांच्यासह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## किनवट येथे दहा दिवसीय श्रामणेर बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

**किनवट**-भारतीय बौद्ध महासभा, तालुका शाखा किनवट यांच्या वतीने ता . ५ जून ते १४ जून २०२६ या कालावधीत एम.के.टी. स्कूल (एस.ओ.एस.) कोठारी येथे दहा दिवसीय श्रामणेर बौद्धाचार्य प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. बौद्ध धम्माचा प्रचार-प्रसार, धार्मिक संस्कारांची जोपासना तसेच समाजात सक्षम आणि प्रशिक्षित धम्मकार्यकर्ते निर्माण करण्याच्या उद्देशाने हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात गोकुंदा व किनवट परिसरातील भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, ग्राम शाखा व वार्ड शाखांचे पदाधिकारी, बौद्ध उपासक-उपासिका, इयत्ता १० वी व १२ वी शिक्षण पूर्ण केलेले युवक-युवती, समाजकार्यामध्ये सक्रिय असलेले कार्यकर्ते, शिक्षक, डॉक्टर तसेच विविध क्षेत्रातील व्यावसायिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. शिबिरादरम्यान पूज्य भंते आणि केंद्रीय स्तरावरील तज्ज्ञ शिक्षकांकडून बौद्ध धम्म, त्रिशरण पंचशील, बुद्ध व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार, बौद्ध संस्कार पद्धती, धम्मप्रसाराची तत्त्वे, सामाजिक नेतृत्व विकास तसेच संघटनात्मक कार्य याबाबत सखोल मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय सहभागींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या प्रशिक्षणामुळे समाजातील युवकांना धम्मकार्याची दिशा मिळणार असून बौद्ध समाजात प्रशिक्षित बौद्धाचार्यांची नवीन पिढी तयार होण्यास मदत होणार आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक असून इच्छुकांनी वेळेत आपली नोंदणी करून या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन भारतीय बौद्ध महासभा, तालुका शाखा किनवट यांच्या वतीने करण्यात आले आहे.

## डॉ. आंबेडकरांच्या पुतळ्यासाठी साखळी उपोषण; 'बहुजन संघर्ष सेनेचा पाठिंबा!

**नांदेड** -भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणीस परवानगी मिळावी यासाठी मुदखेड येथील सामाजिक कार्यकर्ते मा. मारोती शिवाजी डुबुकवाड हे गेल्या १७ दिवसांपासून साखळी उपोषणास बसले आहेत. वारंवार अर्ज व निवेदने देऊनही नगरपरिषद प्रशासन व मुख्यमंत्र्यांकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याने, आता प्रशासनाचा तीव्र निषेध नोंदवत थेट न्यायालयात दाद मागण्याचा इशारा आंदोलकांनी दिला आहे. या आंदोलनाची दखल घेत 'बहुजन संघर्ष सेना' चे संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांनी प्रत्यक्ष उपोषण स्थळाला भेट देऊन आपला सक्रिय व सर्वांगीण जाहीर पाठिंबा दिला आहे. बहुजन संघर्ष सेना मुदखेड शहरात गेल्या १० -१५ वर्षा पासून विविध आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला आहे . संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांनी प्रशासनास इशारा दिला आहे . डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा तात्काळ बसवण्यात यावा अन्यथा बहुजन संघर्ष सेनेतर्फे तीव्र आंदोलन करण्यात येईल व याची सर्व जबादारी प्रशासनाची राहील

## नारायण मेहता यांचे निधन; नरसी परिसरात शोककळा

**नायगाव** -नरसी येथील ज्येष्ठ नागरिक तथा गेल्या पन्नास वर्षांपासून हॉटेल व्यवसायाच्या माध्यमातून सर्वसामान्यांशी जिव्हाळ्याचे नाते



जपणारे नारायण वालजी मेहता (वय ७५) यांचे बुधवार दि. २७ मे रोजी रात्री १०:४५ वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने नरसी परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. नारायण मेहता यांनी मागील सुमारे पाच दशकांपासून नरसी येथे हॉटेल व्यवसाय करत प्रामाणिकपणा, मनमिळाऊ स्वभाव आणि सेवाभावी वृत्तीच्या जोरावर स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली होती. साधी राहणी, प्रेमळ वागणूक आणि ग्राहकांशी आत्मीयतेने जपलेले संबंध यामुळे ते सर्व समाजघटकांमध्ये आदराचे स्थान मिळवून होते. व्यवसायासोबतच सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी अनेकांशी स्नेहाचे संबंध निर्माण केले होते. त्यांच्या निधनाची वार्ता समजताच परिसरातील व्यापारी, मित्रपरिवार व नागरिकांनी शोक व्यक्त केला. त्यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. नरसी येथील प्रसिद्ध लक्ष्मी केक बेकरीचे संचालक अर्जुन मेहता व मोहन मेहता यांचे ते वडील होत. त्यांच्या पार्थिवावर गुरुवार दि. २८ मे रोजी नरसी (ता. नायगाव) येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले

## शांताबाई सखाराम गुंडेकर यांचे निधन

**भोकर** -शहरातील शेख फरीद नगर येथील रहिवासी शांताबाई सखाराम गुंडेकर यांचे दिनांक २८ मे २०२६ रोजी सकाळी ७ वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. मृत्युसमयी त्या ६७



वर्षांच्या होत्या.त्यांच्या पार्थिवावर दिनांक २८ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता हिंदू स्मशानभूमी भोकर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दोन मुली, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ गुंडेकर व भारतीय सैनिक अनिल गुंडेकर यांच्या मातोश्री होत.शांताबाई गुंडेकर यांच्या निधनाबद्दल विविध स्तरातून शोक व्यक्त केला गेला आहे.

## ज्येष्ठ स्त्रीरोगतज्ञ डॉ. ज्योती देशमुख यांचे निधन

**नांदेड** -शहरातील ज्येष्ठ आणि सुप्रसिद्ध स्त्रीरोगतज्ञ डॉ. ज्योती देशमुख यांचे दि. २६ मे रोजी पहाटे ४ वाजण्याच्या दरम्यान नांदेड येथील एका खासगी रुग्णालयात उपचार सुरू असताना निधन झाले. त्या ८३ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने वैद्यकीय, शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. डॉ. ज्योती देशमुख यांनी आयुष्यभर वैद्यकीय सेवेसोबतच शिक्षण आणि महिला सक्षमीकरणासाठीही उल्लेखनीय कार्य केले.

# २९ वर्षांनंतर पुन्हा भरली शाळा; १९९६ च्या बॅचचा स्नेहमेळावा भावुक वातावरणात

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २८ मे -**

काळ पुढे सरकत गेला, प्रत्येकजण आपल्या आयुष्याच्या वाटेवर दूर निघून गेला पण तब्बल २९ वर्षांनंतर रविवारी (ता.२४) जांब येथील नीती निकेतन विद्यालय पुन्हा एकदा जुन्या मित्रांच्या हास्याने, आठवणींनी आणि भावनांनी गजबजून गेले. १९९६-९७ च्या दहावीच्या बॅचचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात आणि आपुलकीच्या वातावरणात संपन्न झाला.

सुमारे ६५ माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी अनेक वर्षांनंतर एकमेकांना भेटले. शाळेच्या प्रांगणात पाऊल ठेवताच प्रत्येकाच्या चेहऱ्यावर आनंद होता, तर डोळ्यांत जुन्या आठवणी दाटून आल्या होत्या. कधीकाळी ज्याठिकाणी स्वप्नं रंगवली, त्या वर्गखोल्या, फळा, घंटा आणि बसायच्या जागा पाहून अनेकजण भावूक झाले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अनिल कोल्हे, सदाशिव क्षेत्री, श्री. मोरे, प्रह्लाद जोगदंड, जिल्हा परिषद शाळेचे जीवनराव गोंड, शिराज मुजावर या सेवानिवृत्त शिक्षकांसह सामाजिक कार्यकर्ते जयपाल गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती होती. आपल्या जुन्या विद्यार्थ्यांना पुन्हा एकत्र पाहून शिक्षकांच्याही भावना अनावर झाल्या. त्यांनी विद्यार्थ्यांच्या शालेय आठवणींना उजाळा देत त्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त केले.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर प्रत्येक मित्र-मैत्रिणीने स्वतःचा जीवनप्रवास सांगत जुन्या आठवणींना उजाळा दिला. ते दिवस पुन्हा जगायला मिळाले अशी भावना अनेकांनी व्यक्त केली. स्नेहभोजनातही जुन्या गप्पा, चेष्टा-मस्करी आणि आठवणींचा रंग भरला होता. या स्नेहमेळाव्यात पुणे येथे वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून जांबचे नाव मोठे करणारे डॉ. ऋषभ कर्णावट यांचा मित्रपरिवाराच्या वतीने विशेष सन्मान करण्यात आला. विशेष म्हणजे, माजी विद्यार्थिनींचीही लक्षणीय उपस्थिती कार्यक्रमाचे आकर्षण ठरली.

दिवसभर विविध उपक्रम, आठवणींचा प्रवास आणि भावनिक क्षणांनी हा स्नेहमेळावा प्रत्येकाच्या मनात कायमस्वरूपी घर करून गेला. वय वाढलं, जबाबदाऱ्या वाढल्या पण शाळेतील मैत्री आजही तितकीच जिवंत आहे, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी डॉ. ऋषभ कर्णावट, प्रल्हाद मोरे, शिवाजी गायकवाड, संदीप राऊतवाड, दिलीप गोंड, नागनाथ गोंड, मसना जाधव, रामदास मोरे, संतोष राऊतवाड, दत्ता पांपटवार, अरुण मोरे, बालाजी मोरे, सुनील नर्मितवार, विजय गोनागे, मुनीर मुजावर, मनोहर यरपूरवाड, बालाजी जाधव, गोवर्धन शृंगारे, अंजुम मुजावर, मीना क्षेत्री, ज्योती निलेगावे, अनुसया कटाळे, मौलानाबी शेख, संगीता इबितवार, बबिता शिंदे, रुक्मिणी कुंभार, निलावती कुंभार, कमल शिंदे, शिवनंदा धुळशेट्टे, मंगल गोंड, जयश्री गोंड, अनिसाबी शेख आदींसह मोठ्या संख्येने माजी विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी गायकवाड यांनी केले.

# तोटावाड नर्सिंग हॉस्पिटलला बांधकाम परवानगीच नाही!

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मे -**

शहरात मोठ्या प्रमाणात टोलेजंग इमारती बांधून रुग्णालय सुरू करण्यात आले आहेत. परंतु यापैकी बहुतांश रुग्णालयांच्या इमारतींना परवानगी नसल्याचे उघड होत असून आता कौठा येथील तोटावाड नर्सिंग हॉस्पिटलला बांधकाम परवानगी नसल्याचे सचिन पाटील यांनी माहिती अधिकारातून उघड केले आहे.

### माहिती अधिकारात झाले उघड

शहरातील कौठा येथील विजयनगर हाऊसिंग सोसायटीमध्ये तोटावाड नर्सिंग हॉस्पिटल नावाने रुग्णालय सुरू करण्यात आले असून या रुग्णालयाच्या बांधकाम परवानगी बाबतची माहिती शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख सचिन पाटील यांनी माहिती अधिकारात मागवली होती. या पत्रला उत्तर देत महापालिकेच्या नगररचना विभागाने तोटावाड नर्सिंग हॉस्पिट ची बांधकाम परवानगी आढळून आली नसल्याचे नमूद केले असून अभिलेख संचिका, दिनांक किंवा परवाना क्रमांक नोंदविल्यास माहिती देणे सोयीचे होईल असे सांगत टाळाटाळ केली आहे. त्यामुळे तोटावाड नर्सिंग हॉस्पिटलला बांधकाम परवानगी नसल्याचे सिद्ध झाले असून महापालिका यावर आता काय कारवाई करेल याकडे लक्ष लागले आहे.

# 'स्वारातीम' विद्यापीठातील पाच विद्यार्थ्यांची एमईसीएल साठी निवड; ३ लाखांचे मानधन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मे -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने मिनरल एक्सप्लोरेशन अँड कन्सल्टन्सी लिमिटेड (एमईसीएल), नागपूर यांच्यासोबत केलेल्या सामंजस्य कराराच्या माध्यमातून आणखी एक महत्त्वपूर्ण यश संपादन केले आहे. ऑगस्ट, २०२५ मध्ये झालेल्या या करारानंतर विद्यापीठाच्या भूशास्त्र संकुलातील एम.एस्सी. भूगर्भशास्त्र शाखेच्या पाच विद्यार्थ्यांची एमईसीएल, नागपूर येथे प्रतिष्ठित इंटर्नशिपसाठी निवड झाली असून त्यांना वार्षिक ३ लाख रुपये मानधन मिळणार आहे.

निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये सिद्धार्थ शिरसाठे, शरन्या ठवकर, अमित लोहारे, यशवंत चव्हाण आणि राहुल गायकवाड यांचा



समावेश आहे.

ही निवड विद्यापीठ आणि उद्योग क्षेत्रातील सशक्त सहकार्याचे उत्तम उदाहरण ठरत असून विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यासाठी तसेच प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव मिळवून देण्यासाठी विद्यापीठाच्या प्रयत्नांना मोठे यश मिळाले आहे.

या यशासाठी डॉ. पराग खडके, डॉ. टी. विजयकुमार तसेच भूशास्त्र संकुलातील सर्व प्राध्यापक आणि संशोधकांचे विशेष योगदान लाभले. या उपक्रमाचे सकारात्मक परिणाम लक्षात घेऊन कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन, डॉ. एम. के. पाटील, डॉ. सुरेंद्रनाथ रेड्डी आणि डॉ. शैलेश वढेर यांनी विद्यार्थ्यांचे व संबंधित विभागाचे अभिनंदन केले.

यावेळी कुलगुरू डॉ. मनोहर चासकर म्हणाले, विद्यापीठ आणि उद्योग यांच्यातील प्रभावी सहकार्याचे हे उत्कृष्ट उदाहरण आहे. या शिष्यवृत्तीमुळे विद्यार्थ्यांना आर्थिक पाठबळासोबतच प्रत्यक्ष खनिज सर्वेक्षण व संशोधनाचा मौल्यवान अनुभव मिळणार आहे. त्यामुळे त्यांच्या शैक्षणिक ज्ञानाला व्यावहारिक दिशा मिळेल आणि भविष्यात अधिकाधिक विद्यार्थ्यांना अशा संधी उपलब्ध होतील.

विद्यापीठ प्रशासनाने या यशाबद्दल सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून भविष्यातही उद्योगाभिमुख उपक्रमांना प्राधान्य दिले जाईल, असे नमूद केले.

# विस्तारित क्षेत्रातील कोळी महादेव, मल्हार कोळीसह अन्य जमातीला उध्वस्त करण्याचा घाट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २९ मे -**

महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी मंत्रालयाने दि. २६ मे २०२६ रोजी एक परिपत्रक काढून उच्च न्यायालयाने जात प्रमाणपत्र पडताळणी समितीच्या आदेशाविरोधात याचिका कर्त्याच्या बाजूने निकाल दिल्यास त्या निकालाच्या विरोधात उच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका अथवा सर्वोच्च न्यायालयात अनुज्ञा याचिका दाखल करण्याचे आदेश देऊन विस्तारित क्षेत्रातील कोळी महादेव, मल्हार कोळी, टोकरे /ढोर कोळी जमातीला कोणत्याही परिस्थितीत जात वैधता प्रमाणपत्र मिळू न देता उद्धस्त करण्याचा घाट घातला असून पुरोगामी फुले, शाहू, आंबेडकरांच्या महाराष्ट्रला कलंकित करण्याचे काम केले आहे, असा आरोप आद्य क्रांतीकारक रागोजी भांगरे संघर्ष समितीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. बाळासाहेब बळवंतराव यांनी केला आहे.

महाराष्ट्र शासन आदिवासी विभाग शासन परिपत्रक क्र. न्यायप्र/ प्र.क्र.७२ / इ१६२८७६६ /का-१० मंत्रालय मुंबई दि. २६ मे २०२६ रोजी परिपत्रक काढून जर जात प्रमाणपत्र पडताळणी समितीत्याच्या आदेशा विरोधात याचिकाकर्त्याने उच्च न्यायालयात याचिका दाखल केली असेल आणि मा उच्च न्यायालयाने जात पडताळणी समितीच्या विरोधात निकाल देऊन याचिकाकर्त्याला जात प्रमाणपत्र वैधता प्रमाणपत्र देण्याचा आदेश दिला, तर अशा या याचिकाकर्त्याला न्यायालयाच्या आदेशानुसारही जातवैधता प्रमाणपत्र मिळू द्यायचे नाही. या वाईट उद्देशाने आदिवासी मंत्रालयाने वरीलप्रमाणे आदेश काढून याचिकाकर्त्याच्या विरोधात महाराष्ट्र शासनाच्या वतीने उच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका व मा. सर्वोच्च न्यायालयात अनुज्ञा याचिका दाखल करावी त्यासाठी कालमर्यादा घालून दिली असून शासनस्तरावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घ्यावेत, असा आदेश काढल्याने विस्तारित क्षेत्रातील कोळी महादेव, मल्हार कोळी, टोकरे /ढोर कोळी जमातीत खळबळ माजली असून महाराष्ट्रात असंतोष पसरला आहे. महाराष्ट्र शासनाच्या विरोधात तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत. या आदेशाची अंमलबजावणी फक्त आदिवासी क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या ठराविक जमातीच्या विरोधातच केली जाते हे विशेष आहे.

या आदेशाची अंमलबजावणी करायची असेल तर आदिवासी क्षेत्रात राहणारे ज्या जमातींना व आदिवासी आमदार, खासदार यांना जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने जातवैधता प्रमाणपत्र दिली आहेत, त्यांच्याही प्रमाणपत्राचे पुनर्विलोकन झाले पाहिजे व त्यांच्या विरोधात मा. उच्च न्यायालयात पुनर्विलोकन याचिका व मा. सर्वोच्च न्यायालयात अनुज्ञा याचिका पहिल्यांदा दाखल केली पाहिजे, अशी मागणी ही केली आहे.

२०११ च्या जनगणनेनुसार आदिवासी क्षेत्र व आदिवासी क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या महाराष्ट्राच्या सर्व जिल्हयातील आदिवासींची लोकसंख्या १ कोटी ५ लाख १० हजार २१३ एवढी आहे. ही लोकसंख्या महाराष्ट्राच्या एकूण लोकसंख्येच्या ९.३५% असल्याने ९% प्रमाणे राजकीय आरक्षण दिले आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील ही लोकसंख्या गृहीत धरून ९% प्रमाणे २५ आमदार विधानसभेवर व ४ खासदार लोकसभेवर निवडून जातात. ९.३५% प्रमाणे २१ हजार कोटी रुपयेची ट्रायबल डेव्हलपमेंट फंडाची तरतूद अर्थसंकल्पात केली जाते. जर का संपूर्ण महाराष्ट्राची लोकसंख्या गृहीत धरून राजकीय आरक्षण घेतले जाते, फंडाची तरतूद केली जाते तर संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासी जमातींना जात प्रमाणपत्र आणि वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी अडचण काय? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे.

स्वातंत्र्यानंतर एससी लोकसंख्येप्रमाणे रोटेशन पद्धतीने एसटी मतदारसंघाची फेररचना न झाल्यामुळे विस्तारित क्षेत्रातील आदिवासी जमातीला लोकसंखेच्या प्रमाणात राजकीय प्रतिनिधित्व न मिळाल्याने त्याच त्या भागातून तेच ते आमदार व खासदार निवडून येतात. अशा या प्रतिगामी, आरक्षणविरोधी, स्वार्थी लोकांनी आदिवासी विभागावर कब्जा केला असून समाजात सामाजिक तेढ, अशांतता, भेदभाव व अन्याय करणारी परिपत्रके काढून आदिवासी क्षेत्राच्या बाहेर राहणाऱ्या कोळी महादेव, मल्हार कोळी, टोकरे/ढोर कोळी जमातीला अत्यंत सूक्ष्म प्लॅनिंग करून संपवण्याचा घाट घातला जात आहे. आदिवासी विभागात काय चालले आहे हे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांना माहिती नाही का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. हे परिपत्रक त्वरित रद्द करावे अन्यथा महाराष्ट्राच्या विस्तारित क्षेत्रातील आदिवासी आतंकवादी बनतील समाजाचे युवक हातात दांडके घेऊन रस्त्यावर उतरतील, कोणत्याही क्षणी आंदोलनाचा भडका उडेल, कायदा सुव्यवस्था व शांततेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी हे महाराष्ट्र शासन जबाबदार राहील, असा इशारा त्यांनी दिला असून मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनी याकडे लक्ष घालावे व विस्तारित क्षेत्रातील आदिवासींना न्याय द्यावा, अशी मागणी आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे संघर्ष समितीचे राज्य उपाध्यक्ष प्रा. बाळासाहेब बळवंतराव यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

## ७ सीटर सीएनजी मोबिलिटी शक्य होणार

मुंबई: निसान मोटर इंडिया प्रायव्हेट लिमिटेडने (एनएमआयपीएल) आज ऑल-न्यू निसान ग्रॅव्हाइटसाठी सरकार-मान्यताप्राप्त सीएनजी रेट्रोफिटमेंट किट सादर करण्याची घोषणा केली. यात श्रेणीतील प्रथम नाविन्यपूर्ण स्मार्ट ट्विन-सिलेंडर तंत्रज्ञान आहे, जे गाडीची संपूर्ण ७-सीटर रचना आणि उपयोगिता कायम ठेवते. ग्रॅव्हाइट सीएनजी १६ राज्यांमध्ये ८२,९९९/- रुपयांच्या प्रारंभीच्या किमतीत उपलब्ध असून ग्राहकांना अधिक स्मार्ट, अधिक वाजवी आणि पर्यावरण-सजग गतिशीलतेचा उपाय देण्यासाठी डिझाइन केली आहे. तसेच ती तिसऱ्या रांगेत पुरेशी जागा राखून आराम आणि दैनंदिन व्यावहारिकता देते.

## ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला ची किंमत जाहीर

मुंबई : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला ई3 ची किंमत रु. 23,60,000 (एक्स-शोरूम किंमत) जाहीर केली. यामुळे शाश्वत आणि कार्बन-न्यूट्रल भविष्यासाठी टोयोटाच्या मल्टी-पाथवे दृष्टिकोनाला अधिक बळ मिळाले आहे. दमदार एसयूव्ही स्टायलिंग,प्रशस्त इंटीरियरसह प्रीमियम केबिन अनुभव,प्रगत तंत्रज्ञान आणि स्मूथ व आत्मविश्वासपूर्ण परफॉर्मन्स यांचा सुरेख संगम साधण्यासाठी डिझाइन करण्यात आलेली ऑल-इलेक्ट्रिक अर्बन क्रूझर एबेला ही टोयोटाच्या इलेक्ट्रिफाइड मोबिलिटी क्षेत्रातील तीन दशकांच्या जागतिक अनुभवाच्या भक्कम पायावर आधारित आहे

## 'कॉस्मो सनशील्ड'कडून उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार

छत्रपती संभाजीनगर, 28 मे 2026: कॉस्मो कन्झ्युमर या कॉस्मो फर्स्ट या कंपनीच्या ग्राहककेंद्रित विभागाने आज छत्रपती संभाजीनगरमध्ये आपल्या 'कॉस्मो सनशील्ड' ब्रँडअंतर्गत उत्पादन पोर्टफोलिओचा विस्तार जाहीर केला. उन्हाळ्यात घरांत, कार्यालयांमध्ये आणि व्यावसायिक ठिकाणी अधिक आरामदायी वातावरण मिळावे, तसेच ऊर्जेचा वापर नियंत्रित राहावा, या वाढत्या गरजा लक्षात घेऊन ही नवी उत्पादने सादर करण्यात आली आहेत. या उत्पादन मालिकेमध्ये 'लस्टर सिरीज', 'रेनबो सिरीज' आणि 'अल्ट्रा कूल सिरीज' यांचा समावेश आहे. या फिल्म्स अशा प्रकारे विकसित करण्यात आल्या आहेत की, त्या आत येणारी उष्णता कमी करतात आणि नैसर्गिक प्रकाशाचाही योग्य समतोल राखतात.

## २०२६ व्हिजन एआय टीव्ही श्रेणी

गुरुग्राम, 27 मे 2026- सॅमसंग इंडियाने आज आपल्या संपूर्ण २०२६ व्हिजन एआय टीव्ही लाइनअपच्या लाँचची घोषणा केली. या लाइनअपमध्ये मायक्रो आरजीबी, ओएलईडी, निओ क्युएलईडी, द फ्रेम, मिनी एलईडी आणि युएचडी टीव्हीचा समावेश आहे. आज या लाँचसह सॅमसंग आपल्या सर्व मॉडेल्समध्ये एआय-समर्थित वैशिष्ट्यांचा विस्तार करत आहे, तसेच भारतातील अधिकाधिक ग्राहकांसाठी अधिक स्मार्ट पिक्चर, साऊंड आणि वैयक्तिकृत व्युईंग अनुभव घेऊन येत आहे. सॅमसंग सलग २० वर्षांपासून जागतिक स्तरावर पहिल्या क्रमांकाचा टीव्ही ब्रँड आहे.


## छत्रपती संभाजीनगर येथील विद्यार्थ्यांची एसओएफ आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड २०२५-२६ मध्ये उत्कृष्ट कामगिरी

छत्रपती संभाजीनगर, २०२६: सायन्स ऑलिम्पियाड फाउंडेशन (एसओएफ) द्वारे आयोजित २०२५-२६ शैक्षणिक वर्षाच्या आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड परीक्षांमध्ये औरंगाबादच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करून शहराला गौरव मिळवून दिला आहे. यावर्षी ७२ देशांतील लाखो विद्यार्थ्यांनी एसओएफ ऑलिम्पियाडमध्ये भाग घेतला होता, ज्यात छत्रपती संभाजीनगरमधील ६१,००० हून अधिक विद्यार्थ्यांचा समावेश होता. या कामगिरींमध्ये, नॉलेज वर्ल्ड शाळेतील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी अनायशा आनंद मुळे हिने आंतरराष्ट्रीय गणित ऑलिम्पियाड (आयएमओ) मध्ये प्रथम क्रमांक पटकावला, युनिक पब्लिक स्कूलमधील इयत्ता पहिलीचा विद्यार्थी शिवांश सागर कंदारे याने राष्ट्रीय विज्ञान ऑलिम्पियाड (एनएसओ) मध्ये प्रथम क्रमांक मिळवला आणि किड्स वंडर पॅलेस इंग्लिश स्कूलमधील इयत्ता तिसरीचा विद्यार्थी देवांश वाघ याने आंतरराष्ट्रीय हिंदी ऑलिम्पियाड (आयएचओ) मध्ये प्रथम क्रमांक मिळवला. सर्व विद्यार्थ्यांना सुवर्णपदके आणि उत्कृष्ट कामगिरीची प्रमाणपत्रे प्रदान केली जातील.

## शिक्षण आणि आरोग्यविषयक उपक्रमांच्या वृद्धीसाठी सामंजस्य करारावर स्वाक्षरी

छत्रपती संभाजीनगर : टोयोटा किर्लोस्कर मोटर (टीकेएम) ने आज गुजरात राज्यभर शिक्षण आणि आरोग्यसेवेची गुणवत्ता वाढवण्यासाठी गुजरात सरकारसोबत सामंजस्य करार (एमओयू) केला. हे व्यापक उपक्रम शाश्वत समुदाय विकास आणि लोकांच्या जीवनात दीर्घकालीन सकारात्मक परिणाम निर्माण करण्यासाठी

## ओल्ड स्कूल फॉरेव्हर रॉयल एनफिल्ड 'बुलेट ६५०' भारतात लाँच



छत्रपती संभाजीनगर : रॉयल एनफिल्ड या मध्यम आकाराच्या मोटरसायकल सेगमेंटमधील (२५०सीसी-७५०सीसी) जागतिक आघाडीच्या कंपनीने आज आपल्या आयकॉनिक 'बुलेट' मोटरसायकलला शक्तिशाली ६५०सीसी अवतारात भारतात लाँच करण्याची घोषणा केली, ज्याद्वारे नऊ दशकांहून अधिक काळ आपल्या प्रवासात नवीन आणि उत्साहवर्धक अध्यायाची सुरुवात झाली आहे.

१९३२ मध्ये पहिल्यांदा लाँच करण्यात आलेली बुलेट सांस्कृतिक ओळख बनली आहे. सतत उत्पादनात असणारी जगातील सर्वात प्रदीर्घ काळ चालणारी ही मोटरसायकल सध्या आपल्या ९४व्या वर्षात पदार्पण करत आहे. या मोटरसायकलने पिढ्यानपिढ्या मोटरसायकलिंगच्या जगात एक विशेष स्थान निर्माण केले आहे. या मोटरसायकलचे कधीही न चुकणारे रूप, अपराइट स्टान्स आणि आयकॉनिक आवाज (थम्प) हे अस्सल मोटरसायकलिंगची ओळख बनले आहेत. आता, या सुप्रसिद्ध ब्रँडला नवीन ताकद मिळाली आहे. बुलेट आतापर्यंतच्या सर्वात शक्तिशाली रूपात विकसित झाली आहे. बुलेटच्या मूळ आयकॉनिक वैशिष्ट्यांशी प्रामाणिक राहून ही मोटरसायकल पूर्वीपेक्षा अधिक शक्तिशाली आणि रुबाबदार झाली आहे. या नवीन ६५०सीसी अवतारासह बुलेट आपल्या उत्कृष्ट ब्रिटिश परंपरेला आणि भारतीयांच्या अतूट प्रेमाला मानवंदना देते, ज्यासह बुलेटच्या चाहत्यांना ब्रँडचा अविरत वारसा साजरा करण्याचे आणखी एक कारण दिले आहे.

बुलेट ६५० बद्दल मत व्यक्त करत आयशर मोटर्स लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर आणि रॉयल एनफिल्डचे सीईओ बी. गोविंदराजन म्हणाले, "नऊ दशकांहून अधिक काळ बुलेट अस्सलता, स्थिरता आणि कधीही न चुकणाऱ्या वैशिष्ट्यांचे प्रतीक राहिली आहे, जिथे या मोटरसायकलने रॉयल एनफिल्डच्या खऱ्याखुऱ्या मोटरसायकलिंगच्या तत्त्वज्ञानाला परिभाषित केले आहे. नवीन रॉयल एनफिल्ड बुलेट ६५० विकसित करताना आमचा दृष्टिकोन बुलेटचे रूप बदलण्याचा नव्हता, तर आधुनिकता आणि अस्सलता एकत्र करत या मोटरसायकलची प्रतिष्ठा अधिक वाढवण्याचा होता. या ऐतिहासिक मोटरसायकलचे मूळ रूप आणि स्वभाव कायम राखण्यासाठी मोटरसायकलच्या रचनेच्या प्रमाणापासून आकारापर्यंत आणि प्रत्येक छोट्या तपशिलापर्यंत सर्व गोष्टी अतिशय काळजीपूर्वक विकसित केल्या आहेत.

# राष्ट्रीय खतविक्री आराखडा; खत खरेदीचे मोबाईल ॲप

### पथदर्शी प्रकल्पात छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा समावेश

छत्रपती संभाजीनगर, दि.२९(जिमाका)- केंद्र शासनाच्या राष्ट्रीय खत विक्री आराखडा (National fertilizer sale framework) प्रकल्पांतर्गत IFMS व Agristack प्रणालीचे संयुक्तीकरण करण्यात येत आहे. त्यामुळे क्यू आर कोड द्वारे खत खरेदी करता येणार आहे. या खत वितरण प्रणालीचा पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत असून त्यासाठी राज्यात छत्रपती संभाजीनगर व कोल्हापूर या दोन जिल्ह्यांची निवड करण्यात आली आहे,असे कृषी संचालक पुणे यांनी कळविले आहे.

यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, केंद्र शासनाने Fertilzer sale application system ( FSAS) हे मोबाईल ॲप तयार केले आहे. या ॲपद्वारे QR code द्वारे शेतकऱ्यांना खतांचे बुकींग करता येणार आहे. शेतकऱ्यांनी QR code द्वारे खत बुक केल्या नंतर QR code तीन दिवस वैध राहणार असून शेतकरी त्यांच्या सोयीनुसार त्यांनी निवडलेल्या खत विक्रेत्याकडे जाऊन खत खरेदी करू शकतात. यामुळे खताचे online booking केल्याने रांगेत उभे राहावे लागणार नाही. आवश्यक खताचे booking केल्यामुळे इतर अनावश्यक खते घेण्याची सक्ती दुकानदाराकडून होणार नाही. त्यामुळे खत विक्री मध्ये सुलभता व पारदर्शकता येईल.

सद्यस्थितीत दुकानांमध्ये खत उपलब्ध आहे किंवा नाही हे समजत नसल्याने शेतकऱ्यांना नाहक त्रास होत असल्याचे दिसून येते,वरील प्रणालीमुळे या गोष्टी टाळता येणार आहेत.

या वितरण प्रणालीची केंद्र शासनाच्या टीम ने पुणे जिल्ह्यातील अष्टापुर ता हवेली येथे यशस्वीपणे चाचणी घेतली आहे. राज्यातील कोल्हापूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्याची केंद्र शासनाने निवड केली असून पथदर्शी प्रकल्प म्हणून खरीप हंगामात Fertilizer sale application system या प्रणालीद्वारे खत विक्रीची सुरुवात करण्यात येणार आहे, अशी माहिती देण्यात आली आहे.

# सर्वोच्च न्यायालयात विशेष लोकअदालत; 31 मे पर्यंत ऑनलाईन अर्ज भरण्याची मुदत

छत्रपती संभाजीनगर,दि.२९ - सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यासाठी दि.२१, २२ व २३ ऑगस्ट रोजी विशेष लोकअदालतीचे आयोजन करण्यात आले आहे. पक्षकारांनी आपली सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित असलेली प्रकरणे सामोपचाराने निकाली काढण्यासाठी दि.३१ मे पर्यंत ऑनलाईन अर्ज करावा,असे आवाहन करण्यात आले आहे.

या विशेष लोकअदालतीचा उद्देश सर्वोच्च न्यायालयातील प्रलंबित प्रकरणांचा संमती आधारीत निराकरण प्रक्रियेद्वारे सलोख्याने निपटारा करणे हा आहे. त्यासाठी पक्षकार, वकील ह्यांना ऑनलाईन अर्ज भरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. https://forms.gle/iqxefqF4BCWzukoP6 या गुगल लिंकवर अर्ज भरता येणार आहे. तसेच https://www.sci.gov.in या संकेतस्थळावरुनही अर्ज भरता येणार आहे. या लोकअदालतीत पक्षकारांना आभासी पद्धतीने उपस्थित राहण्याची सुविधा देण्यात आली आहे.

दि.३१ मे पर्यंत अर्ज भरण्याची मुदत आहे. या विशेष लोकअदालतीत सहभाग घेण्याचे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश गिरीश अग्रवाल, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव श्रीमती वैशाली फडणीस यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी आपल्या जिल्ह्यातील विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा प्राधिकरणाशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# एमव्हीपीएमच्या किर्तिश्री काबरा विद्यालयाचे सोलापूरात औपचारिक उद्‌घाटन

### किर्तिश्री काबरा फाउंडेशनच्या पाठबळाने साकारलेली आधुनिक सीबीएसई शाळा

छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी सोलापूरमध्ये आधुनिक आणि दर्जेदार शिक्षणाची नवी दिशा देणाऱ्या एमव्हीपीएमच्या किर्तिश्री काबरा विद्यालयाचे (सीबीएसई) औपचारिक उद्घाटन नुकतेच उत्साहात पार पडले. लक्ष्मीनारायण मंदिर शैक्षणिक संकुलात उभारण्यात आलेल्या या अत्याधुनिक शाळेची सुरुवात जून २०२६ पासून नर्सरी ते इयत्ता सातवीपर्यंत होत असून पुढील टप्प्यात इयत्ता बारावीपर्यंत विस्तार करण्याची योजना संस्थेकडून आखण्यात आली आहे.या उद्घाटन सोहळ्यास प्रसिद्ध आर्थिक तज्ज्ञ आणि परोपकारी आनंद राठी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांच्या हस्ते विद्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी किर्तिश्री काबरा फाउंडेशनचे मुख्य दाते व विश्वस्त श्रीगोपाल काबरा आणि श्रीमती किर्ति काबरा उपस्थित होते. त्यांच्या



सहकार्य आणि पाठबळामुळे हा महत्त्वाकांक्षी शैक्षणिक प्रकल्प प्रत्यक्षात साकार झाला आहे. या कार्यक्रमास माहेश्वरी विद्या प्रचारक मंडळ (एमव्हीपीएम) संस्थेचे अध्यक्ष, विश्वस्त, पदाधिकारी तसेच स्थानिक आमदार, खासदार आणि विविध क्षेत्रातील मान्यवर व कॉर्पोरेट दाते मोठ्या संख्येने उपस्थित होते.विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. यामध्ये कम्युनिकेशन लॅब, सायन्स एक्सपिरियन्स सेंटर, एआय-एमएल, रोबोटिक्स, ड्रोन टेक्नॉलॉजी आणि एआर/व्हीआरसाठी स्ट्रीम लॅब, अॅस्ट्रॉनॉमी व इस्त्रो लॅब, पॉडकास्ट रूम, अत्याधुनिक वर्गखोल्या, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, एनपीएव्ही क्रीडा मैदान, सभागृह तसेच खुल्या छताचे ॲम्फीथिएटर अशा सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध होणार आहेत."किर्तिश्री काबरा फाउंडेशनमध्ये आमचा विश्वास आहे की शिक्षणाची संधी आणि सन्मान हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे. या विद्यालयामध्ये विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणासोबत आधुनिक सुविधा आणि व्यक्तिमत्त्व विकासासाठी पोषक वातावरण मिळेल. जवळपास ९७ वर्षांचा समृद्ध वारसा असलेल्या एमव्हीपीएम संस्थेसोबत हा प्रकल्प साकारताना आम्हाला अभिमान वाटतो," असे श्रीमती किर्ति काबरा यांनी सांगितले. सोलापूरच्या शैक्षणिक क्षेत्रात नवा मापदंड निर्माण करणाऱ्या या विद्यालयामुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या शिक्षणाच्या नव्या संधी उपलब्ध होणार असल्याची भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केली.

## ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

छत्रपती संभाजीनगर : भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ प्रमाणे ड्रोन, रिमोट कंट्रोल्ड मायक्रो-लाइट एअरक्राफ्ट, पॅराग्लायडर, पॅरा मोटर्स, हॅण्ड लायडर्स हॉट एअर बलून इ. उड्डाण क्रियांना पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रात दि.३० मे ते दि.२८ जुलै दरम्यान प्रतिबंध करण्यात येत आहे,असे आदेश पोलीस आयुक्त प्रवीण पवार यांनी निर्गमित केले आहे. या देशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तीविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम २२३ नुसार कायदेशीर कारवाई केली जाईल असेही आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

## कै.दादाराव पाटील यांच्या उत्तर कार्यानिमित्त ह.भ.प.अजबराव महाराज आसडीकर यांचे हरीकीर्तन कार्यक्रम संपन्न




सिल्लोड : रहीमाबाद येथे उत्तर कार्य निमित्त आयोजित करण्यात आलेला हरिकिर्तन कार्यक्रम भक्तीमय वातावरणात पार पडला. कार्यक्रमात ह.भ.प.अजबराव मिरगे महाराज आसडीकर यांनी आपल्या प्रभावी वाणीमधून अध्यात्म,संस्कार व समाजप्रबोधनाचे महत्त्व विशद केले.

शेवट तो भला । माझा बहू गोड झाला । आलो निजाच्या माहेरा । भेटी रखुमाईच्या वरा !! या अभंगावरती महाराजांनी

निरूपण करताना म्हणाले,माणुस किती दिवस जगला,यापेक्षा तो कसा जगला या गोष्टीला जगामध्ये फार किंमत आहे. अनेक दिवस स्वतः करता जगण्यापेक्षा,थोडेच दिवस समाजाकरता जगल्यानंतर जगामध्ये माणसाची कीर्ती शिल्लक राहते."तुका म्हणे एका मरणची सरे । उत्तमची पुरे कीर्ती मागे। याप्रमाणे स्व.दादाराव सांडू पाटील गाढवे यांच्या सामाजिक व राजकीय जीवनपटलावरती महाराजांनी अनेक उदाहरणे देऊन प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.परिसरातून पंचक्रोशी मधून राजकीय,अध्यात्मिक, कला, क्रीडा,कृषी,आरोग्य, शिक्षण, उद्योग,अनेक क्षेत्रातले मान्यवर उपस्थित होते.गायनाचार्य ह.भ.प अमोल महाराज मिरगे. ह.भ.प दत्ता महाराज बोराडे. मृदंगाचार्य ह.भ.प विशाल महाराज बर्डे व गावातील सर्व भजनी मंडळी तसेच गावकरी बहुसंख्येने उपस्थित होते.

IIFL FINANCE

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक ३०.०६.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **परभणी –स्टेशन रोड गोल्ड लोन – 1ला मजला काबरा कॉम्प्लेक्स, लक्ष्मीनारायण मंदिर स्टेशन जवळ , परभणी–431401,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL25562631, GL25572380, GL39555704, GL39532382, GL38604537, GL38634687, GL41914759.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : ३०.०५.२०२६
स्थळ: परभणी

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

IIFL FINANCE

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक ३०.०६.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **औरंगाबाद–पैठण गेट रोड जी एल गोल्ड लोन – जोशी हाइट्स, कमर्शियल ग्राउंड फ्लोअर, राईट साईड पोर्शन, सीटीएस नं 14185, क्रांती चौक टू गुलमंडी रोड, पैठण गेट परिसर, औरंगाबाद–431001 ,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL39274000, GL39212925, GL39206803, GL39388779, GL39361968, GL27421201, GL27402230, GL37421995, GL34101257, GL34110803, GL39936354, GL36780047, GL37028769, GL37619832, GL40688285, GL37033434, GL37624378, GL37609966, GL40097616, GL38835656, GL38827402, GL37478403, GL37678004, GL40316900, GL38822609, GL38021421, GL41256024, GL35887767, GL37594219, GL41609508, GL37255897, GL39384895, GL39388017, GL44041323, GL40042753, GL37651745, GL40261149, GL35927278, GL35681711, GL35667639, GL36971817, GL42387772, GL37442127, GL37113806, GL40987534, GL38055325, GL36599675, GL39559758, GL39526246, GL39447621, GL45600309, GL39469174, GL38885842, GL36760841, GL39562964, GL39541107, GL38363461, GL36063294, GL35761492, GL37895382, GL38274669, GL35396575, GL35387771, GL38961960, GL39492054, GL39514883, GL36822693, GL36625969, GL27422879, GL27411315, GL39688930, GL48709982, GL39470583, GL39464039, GL38354312, GL39175301, GL44480229, GL39179332, GL34258253, GL38952633, GL37992224, GL36321991, GL36321772, GL36732029, GL34257487, GL41010064, GL41385011, GL33359643, GL38898285, GL37156331, GL38036960, GL38601545, GL37486703, GL37713050, GL39776949, GL33611335, GL34351869, GL33171411, GL39108141, GL37120931, GL37949636, GL37736495, GL39715417, GL38620306, GL38598527, GL38085559, GL37663034, GL36804518, GL41620313, GL37077385, GL38992823, GL34199293, GL38808694, GL41202883, GL36709481, GL36502522, GL36485858, GL38339774, GL37128359, GL37792074, GL37111567, GL37533134, GL37097657, GL38088548, GL38462985, GL38487627, GL39672988.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : ३०.०५.२०२६
स्थळ: छत्रपती संभाजीनगर

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

IIFL FINANCE

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक ३०.०६.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **जालना जीएल – पहिला मजला, कडबी मंडी , जुना मोंढा रोड आंध्र बँकेच्या मागे , जालना – 431203,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL39086573, GL39555634, GL39532358, GL39266923, GL48240175, GL39277916, GL36780202, GL41380253, GL41578415, GL38830016, GL38835813, GL39686344, GL39442191, GL39473085, GL39073107, GL38306544, GL38231075, GL38239629, GL38489629, GL39700815, GL37133556, GL39614704, GL39592199, GL39846180, GL39693511, GL43556863, GL40028219, GL38233417, GL36637894, GL38991482, GL34254930, GL39964545, GL39512461, GL39499448, GL39348699, GL46942676, GL39351171, GL39087885, GL39086039, GL39189818, GL39211531, GL43196078, GL45856915, GL39475806, GL43892607, GL39728196, GL39597816, GL39446764, GL39610039, GL39380444, GL39392326, GL44742826, GL39110661, GL46864996, GL39102713, GL36767402, GL39300890, GL36976407, GL44127547, GL43026155, GL33921113, GL38886586, GL42112601, GL37001536, GL36828140, GL37067933, GL37126407, GL39393363, GL39382141, GL39551697, GL39609672.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : ३०.०५.२०२६
स्थळ: जालना

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड

IIFL FINANCE

CIN: L67100MH1995PLC093797
Regd. Office: IIFL House, Sun Infotech Park, Road No. 16V, Plot No.B-23, Thane Industrial Area, Wagle Estate, Thane - 400604
Tel: (91-22) 41035000 • Fax: (91-22) 25806654
E-mail: reach@iifl.com • Website: www.iifl.com

सोन्याचा दागिन्यांचा लिलावाची सार्वजनिक सूचना

येथे सगळ्या संबंधित ऋणकोंना विशेषत: आणि सर्व सामान्य नागरिकांना, सामान्यपणे असे सूचित करण्यात येते की, आम्ही आयआयएफएल फायनान्स लिमिटेड (''आयआयएफएल'') येथे थकबाकी असलेल्या कर्जदारांच्या सोन्याच्या दागिन्यांचा लिलाव करणार आहोत, यामध्ये वारंवार सूचना देऊन देखील कर्जाची रक्कम न भरलेल्या किंवा कर्ज खाते सामान्य करू न शकलेल्या ऋणकोंचा समावेश केला गेला आहे. खालील कर्ज खात्यांमध्ये तारण ठेवलेल्या सोन्याच्या दागिन्यांचा सार्वजनिक लिलाव **दिनांक ३०.०६.२०२६** रोजी **सकाळी १०.००** वाजल्यापासून जिल्हा केंद्र **बीड– सुभाष रोड गोल्ड लोन – एच. क्रमांक 211290, प्रकाश हाइट्स, सुभाष रोड, बीड–431122,** येथे होणार आहे. स्थान किंवा तारखेतील कोणताही बदल (जर असल्यास) लिलाव केंद्राकडे प्रदर्शित केला जाईल. कोणत्याही कारणास्तव येथे उल्लेखित तारखेस लिलाव होऊ शकला नाही किंवा त्या दिवशी लिलाव पूर्ण होऊ शकला नाही, तर आयआयएफएलला त्याच अटी व शर्तींवर कोणत्याही पुढील तारखेस उक्त लिलाव आयोजित करण्याचा किंवा पुढे नेण्याचा हक्क आरक्षित आहे. ग्राहकाचा मृत्यू झाला, तर त्या लिलावाशी संबंधित सर्व अटीं नामनिर्देशित व्यक्ती/कायदेशीर वारसाला लागू होतील.

**गोल्ड लोन खाता क्रमांक :** GL39012554, GL39082875, GL39639225, GL32797240, GL37091183, GL37089295, GL38961201, GL38970356, GL39353249, GL39322143, GL34106446, GL36030109, GL39837318, GL39239785, GL37227756, GL37192137, GL39482580, GL39515904, GL39513995, GL39490858, GL38937045, GL36635968, GL38894258, GL38870174, GL38864733, GL39212412, GL39199766, GL44171971, GL37198382, GL44210205, GL39428381, GL39370860, GL42020728, GL36824057, GL36772235, GL39099045, GL34546328, GL39704639, GL34167936, GL44963710, GL36078212, GL43951460, GL39299630, GL33835744, GL34198153, GL33393661, GL39344460, GL38786140, GL36312506, GL35853222, GL33632085, GL39859508, GL33934251, GL33386794, GL35655720, GL35655721, GL39859399, GL33952613, GL41714961, GL33816814, GL37946878, GL36953031, GL36912784, GL36600433, GL37315028, GL37313805, GL42827415, GL42496278, GL42660946, GL42351385, GL42949085, GL42212298, GL42688824, GL42743992, GL44470275, GL39541954, GL39563561, GL46739695, GL46904634, GL42553404, GL39471046, GL39423809, GL46398863, GL47318733, GL45929452, GL36858540, GL36877785, GL38832048, GL38216944, GL44590748, GL38094676, GL38080917, GL35774282.

लिलाव हा ''जिथे आहे तसे'', ''जसे आहे तसे'' आणि ''जेवढे आहे तेवढे'' या तत्वावर केला जाईल आणि आयआयएफएल द्वारे कोणत्याही प्रकारे सोन्याच्या दागिन्यांची गुणवत्ता, शुद्धता, कॅरेट, वजन किंवा मूल्यांकनाचे प्रतिनिधीत्वं केले जाणार नाही. आयआयएफएल स्वत:हून, लिलाव पुढे ढकलू किंवा रद्द करू शकेल, लिलावाच्या यादी मधून एखाद्या खात्याचे नाव वगळण्याचा अधिकार देखील आयआयएफएल कडेच असेल आणि हे करताना त्याकरिताची पुर्व सूचना, करण्यामागची कारणे, एखाद्या बोलीचा स्वीकार किंवा रद्दीकरण केल्याची कारणे देण्याची कोणतीही आवश्यकता नसेल. थकबाकी असलेल्या ऋणकोंची यादी, त्यांनी जमा केलेले दागिने आणि इतर तपशील हा संबंधित शाखांमध्ये दिलेला असेल. अयशस्वी कर्जदारांकडे हा पर्याय आहे की त्यांनी अद्ययावत व्याज आणि सर्व लागू शुल्कांसह संपूर्ण थकबाकीची परतफेड करावी जेणेकरुन ही नोटीस प्रकाशित झाल्यानंतरही त्यांचे कर्ज खाते बंद करण्याचा किंवा नियमित करण्याचा पर्याय असतो परंतु कोणत्याही परिस्थितीत लिलावाच्या तारखेपर्यंतच हे शक्य आहे, यात ते अयशस्वी झाल्यास सोन्याचे दागिने विकले जातील आणि थकबाकी (असल्यास) व्याज आणि खर्चासह वसूल केली जाईल. ही सूचना छापून आल्यानंतर जर एखाद्या ऋणकोने आपल्या कर्जाचा व्यवहार पूर्ण केला किंवा आपली थकबाकी भरून कर्ज खाते बंद केले, तर त्याला या सूचनेच्या छपाईचा संपूर्ण खर्च मात्र उचलावा लागेल. ऋणकोंना आपल्या बँक खात्यांचा तपशील शाखेकडे जमा/अद्ययावत करण्याची विनंती केली जाते आहे जेणेकरून लिलाव प्रक्रियेमधून निघालेला परतावा असल्यास तो जमा करता येऊ शकेल.

**तपशीलवार माहिती, अटी आणि नियम जाणून घेण्याकरिता कृपया आयआयएफएल फायनान्स लिमिटेडच्या नजिकच्या शाखेशी संपर्क साधा.**

तारीख : ३०.०५.२०२६
स्थळ: बीड

स्वाक्षरीकर्ता/–
अधिकृत स्वाक्षरीकर्ता
आयआयएफएल फायनान्स लिमिटेड